



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार २० मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# इन्स्टाग्राममधून बाहेर पडा

## तुम्ही प्रश्न विचारू नये यासाठी करमणुकीत गुंतवून ठेवले जात आहे



## गुढीपाडवा मेळाव्यातून राज ठाकरेंचा हल्लाबोल

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकांनी प्रश्न विचारू नये यासाठी त्यांना सातत्याने करमणुकीत गुंतवून ठेवले जात आहे, त्यासाठी चित्रपट, आयपीएल आणि इतर अनेक माध्यमांचा वापर केला जात आहे. लोकांनी यामध्ये गुंतून जावे आणि सत्तेला प्रश्न विचारू नये यासाठी ही सोय केली जात असल्याची टीका मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली. लोकांनी आधी इन्स्टाग्राममधून बाहेर पडावे, रोज महाराष्ट्राचे अस्तित्व मिटवले जात आहे असेही राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरेंच्या उपस्थितीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा २० वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी पार्कवर झालेल्या सभेत राज ठाकरे यांनी सरकारच्या धोरणांवर टीका केली. आपण या ठिकाणी आहोत ते महाराष्ट्रासाठी आहोत. आपल्याला ही सत्ता भविष्यात हाती घ्यायची आहे आणि ती आपण घेणार म्हणजे घेणार, असा विश्वास यावेळी राज ठाकरे यांनी व्यक्त केला. जो इराण इतकी वर्षे आपल्याला साथ देत होता, त्या इराणवर हल्ले होताना आपण त्यांना साथ द्यायला हवी होती. आपल्याला इराण तेल रुपयामध्ये देतो. पण खामेनी गेल्यानंतरही आपण आपल्या देशाच्या पंतप्रधानांनी एकही निषेधाचे वक्तव्य केले नाही. इराणने जम्मू काश्मीरच्या मुद्यावर आपल्याला पाठिंबा दिला होता, पण आपण तो देश अडचणीत असतानाही त्यांना साथ दिली नाही. याचा भविष्यात आपल्याला त्रास नक्कीच होणार. या देशात काय चाललंय, लोक कुठे निघालेत कुणाला काही पत्ता नाही.

आपल्याला आज करमणुकीमध्ये गुंतवून ठेवले आहे. आयपीएल, कुठले तरी पिक्चर आणि इतर माध्यमातून गुंतवून ठेवले जात आहे. त्यामुळे पहिल्यांदा इन्स्टाग्राममधून बाहेर पडा. तुम्ही गुंतवून राहिला तर सरकारला प्रश्न विचारू नये यासाठी हे सगळे आखलेले आहे. हे फक्त भारतात नव्हे तर जगभरात सुरू आहे. सर्वसामान्य माणसांनी मोबाईलमध्ये, करमणुकीमध्ये अडकून राहावे, मग कुणीही विचार करणार नाही. पूर्वी लोक रस्त्यावर यायचे, पण आता मोबाईलवर निषेध व्यक्त केला जात आहे. माध्यमांची वाट लावून टाकली आहे. सरकारला विरोध केला तर जाहिराती बंद करू अशी धमकी दिली जाते. या अशा विचित्र परिस्थितीमध्ये देश अडकला आहे. या करमणुकीच्या गटारगंगेत वाहत जाउ नका. आपल्याला तीन ट्रिलियन इकानामी करणार असे मुख्यमंत्री होतात. पृथ्वीराज चव्हाण (पान २ वर)

## महाराष्ट्रावर आज 11 लाख कोटींचे कर्ज

दरवर्षीप्रमाणे आजही मुंबईतील शिवाजी पार्क येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढीपाडवा मेळावा पार पडला. यावेळी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केंद्र आणि राज्यातील भाजप सरकारवर जोरदार टीका करत सध्याच्या सामाजिक, आर्थिक आणि शहरी परिस्थितीवर भाष्य केले. राज ठाकरे म्हणाले की, सध्या लोकांना मोबाईल, आयपीएल, टीव्ही आणि चित्रपटांमध्ये गुंतवून ठेवले जात आहे, जेणेकरू न ते सरकारला प्रश्न विचारणार नाहीत. नागरिक आता रस्त्यावर येण्याऐवजी मोबाईलवरच आपला राग व्यक्त करतात. ही परिस्थिती केवळ भारतातच नाही, तर जगभरात दिसून येत असल्याचे त्यांनी नमूद केले. माध्यमांवरही दबाव टाकला जात असल्याचा आरोप करत त्यांनी सांगितले की, बातम्या दाखवू नयेत, यासाठी दबाव टाकला जातो आणि पत्रकारांना नोकरीवरू न काढण्याची धमकी दिली जाते. त्यामुळे नागरिकांपर्यंत खरी माहिती पोहोचत नाही. राज्याच्या आर्थिक स्थितीवर बोलताना त्यांनी सांगितले की, पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री अशताना राज्यावर सुमारे २ लाख कोटींचे कर्ज होते, ते आता वाढून ११ लाख कोटींवर पोहोचले आहे. विकासाच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित करत त्यांनी शहरांमधील वाढते ट्रॅफिक, अतिक्रमणांनी भरलेले फुटपाथ आणि कमी होत चाललेली मैदाने याकडे लक्ष वेधले. तसेच, वाढत्या अनियंत्रित शहरीकरणावर त्यांनी टीका केली. कुठेही इमारती उभारल्या जात आहेत आणि आवश्यक परवानग्या सहज दिल्या जात असल्याचा आरोप त्यांनी केला. अशीच परिस्थिती कायम राहिल्यास पुढील काही वर्षांत शहरांमधील जीवन अधिक कठीण होईल, असा इशाराही त्यांनी दिला. ग्रामीण भागातील तरु ण शेतीकडे वळत नसल्याबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. राज्यात तीन वेळा कर्जमाफी होउनही शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण कमी झाले नसल्याचे त्यांनी नमूद केले. मुंबईतील कोस्टल रोड प्रकल्पावर टीका करत त्यांनी हा प्रकल्प बाहेरील लोकांसाठी असून स्थानिकांना त्याचा फायदा होत नसल्याचे म्हटले.




# गडचिरोलीत 11 जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण, 68 लाखांचे होते बक्षीस

**गडचिरोली/प्रतिनिधी :** एकेकाळी माओवाद्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यात आता या चळवळीचे अस्तित्व संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. गुरु वार, १९ मार्च रोजी, गडचिरोली पोलीस दल आणि सीआरपीएफ (कडछ्क़) यांच्या संयुक्त प्रयत्नांना मोठे यश आले असून, ११ जहाल माओवाद्यांनी हिंसेचा मार्ग सोडून लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचा निर्णय घेतला आहे. आत्मसमर्पण केलेल्या या माओवाद्यांवर महाराष्ट्र शासनाने एकूण ६८ लाख रु पयांचे बक्षीस जाहीर केले होते. आत्मसमर्पण केलेल्यांमध्ये अनेक वरिष्ठ कॅडरच्या सदस्यांचा समावेश आहे, ज्यामुळे नक्षलवादी संघटनांच्या कार्यप्रणालीला मोठा तडा गेला आहे. आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांमध्ये सोनी उर्फ बाली वत्ते मट्टामी (DVCM): १६ लाख रु पयांचे बक्षीस (कुतुल दलम), बुदरी उर्फ रामबत्ती आयतु मट्टामी (क्षेत्र समिती सचिव): १६ लाख रु पयांचे बक्षीस, सुखलाल बोळगा कोक्सा (कमांडर): ८ लाख रु पयांचे बक्षीस, शांती उर्फ सोमरी गंगा तेलामी (PPCM): ८ लाख रु पयांचे बक्षीस, यमुनक्का उर्फ रु खमाक्का पेंदाम (ACM): ६ लाख रु पयांचे बक्षीस होते. विशेष म्हणजे, यमुनक्का पेंदाम हिच्यावर २७ गंभीर गुन्हे दाखल असून ती १९८२ पासून चळवळीत सक्रिय होती. याशिवाय गणेश कोवासी, मिनको मट्टामी, धनु वेळंजे, सुनिता होयाम, रमेश मडावी आणि किशोर वासम या सदस्यांनीही शरणागती पत्करली आहे. गडचिरोली पोलीस दलाच्या प्रभावी मोहिमांमुळे एकेकाळी जिल्ह्यातील १० उपविभागांत पसरलेली ही चळवळ आता केवळ भामरागड उपविभागाच्या सीमावर्ती भागापुरती मर्यादित राहिली आहे. विशेष म्हणजे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीत ब्युरो सदस्य, केंद्रीय समिती सदस्य, प्रवक्ता-सिपीआय माओवादी तसेच सचिव-केंद्रीय रिजनल ब्युरो मल्लोजुला वेनुगोपाल राव उर्फ भुपती उर्फ सोनू याच्यासह एकूण ६१ माओवाद्यांनी ५४ अग्निशस्त्रांसह मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर आत्मसमर्पण केल्यामुळे गडचिरोली आणि संपूर्ण दंडकारण्य विभागातील माओवादी चळवळीला मोठा हादरा बसलेला होता. सन २०२५ पासून आतापर्यंत एकूण १२३ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, तर आजवरची ही संख्या ७९४ वर पोहोचली आहे. शासनाच्या (पान २ वर)

## गुजरात- सुरतमध्ये 2.38 कोटींच्या बनावट नोटा पकडल्या

**अहमदाबाद-** अहमदाबाद क्राईम ब्रांचने बनावट नोटांच्या एका मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. बनावट नोटा छापण्याचे काम सुरतमधील एका आश्रमात सुरू होते. पोलिसांनी येथे छापा टाकून नोटा छापण्याच्या मशीनसह २.३८ कोटी रु पयांच्या बनावट नोटा जप्त केल्या. या रॅकेटचा मुख्य आरोपी आणि तथाकथित योग गुरु प्रदीप जोटांगिया यांच्यासह ७ जणांना अटक करण्यात आली आहे. आतापर्यंतच्या तपासात असे समोर आले आहे की, बनावट नोटा छापण्यासाठी वापरला जाणारा खास कागद चीनमधून मागवला जात होता. त्याचे पेमेंट क्रिप्टो करन्सीद्वारे केले गेले होते. गुन्हे शाखेचे डीसीपी अजित राजिया यांनी सांगितले की, गुन्हे शाखेला माहिती मिळाली होती की काही लोक बनावट नोटांची हेराफेरी करत आहेत. याच आधारावर एसीपी आणि पीआय यांच्या एका पथकाची स्थापना करण्यात आली आणि अहमदाबादच्या अमराईवाडी परिसरात एक फार्च्युनर कार थांबवण्यात आली. तपासणीदरम्यान, (पान २ वर)



■ आश्रमात छापल्या जात होत्या

■ योग शिक्षक क्रिप्टोमध्ये पेमेंट करून चीनमधून कागद मागवत होता


## राष्ट्रपतींनी घेतले रामलल्लाचे दर्शन

**अयोध्या :** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू नवरात्रीच्या पहिल्या दिवशी अयोध्येतील राम मंदिरात पोहोचल्या आहेत. त्यांनी रामलल्लाचे दर्शन घेतले. दुस-या मजल्यावर असलेल्या राम दरबारात श्रीराम यंत्राची स्थापना केली. त्यांनी राम मंदिराच्या परिसराचीही पाहणी केली.मुख्यमंत्री योगी यांनी राष्ट्रपतींना मंदिर बांधकामाशी संबंधित कामांची माहिती दिली. राष्ट्रपती सकाळी सुमारे साडेदहा वाजता दिल्लीहून अयोध्या विमानतळावर पोहोचल्या. येथे राज्यपाल आनंदीबेन पटेल आणि मुख्यमंत्र्यांनी त्यांचे स्वागत केले. रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेनंतर राष्ट्रपतींचा हा अयोध्येचा दुसरा दौरा आहे. यापूर्वी त्या १ मे २०२४ रोजी अयोध्येत आल्या होत्या, तेव्हा त्यांनी हनुमानगढी आणि राम मंदिरात दर्शन-पूजन केले होते. राष्ट्रपती अयोध्येत सुमारे ५ तास थांबल्यानंतर (पान २ वर)



## देशातील पहिल्या 'एलपीजी गॅस एटीएम'ची सुरुवात

**नवी दिल्ली :** मध्य-पूर्वेतील युद्धाचा थेट परिणाम इंधन आणि गॅस संकटाच्या रु पाने होत आहे. देशात पेट्रोल-डिझेल नाही तर गॅस टंचाई दिसून येत आहे. गेल्या पाच दिवसांपासून देशातील अनेक नागरिक लांबच लांब रांगेत रोज उभे राहत आहेत. त्यांना एलपीजी सिलिंडर मिळण्याची अजूनही शाश्वती वाटत नाही. तर सरकारने तुटवडा नसल्याचा दावा केला आहे. पुरवठा विस्कळीत झाल्याने गॅस एजन्सीबाहेर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा दिसून येत आहे. दरम्यान आता गॅस संकटावर अजून एक उपाय समोर आला आहे. नवी दिल्लीजवळील गुरु ग्राममध्ये भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेडने एलपीजी एटीएमची सुरु वात केली आहे. हा एक पथदर्शी प्रकल्प असून लवकरच देशातील अनेक शहरात असे एलपीजी एटीएम सुरू होण्याची शक्यता आहे.देशात एलपीजी पुरवठा विस्कळीत होउ नये आणि गरजूंना गॅस मिळवा यासाठी सरकारने एलपीजी पुरवठ्याविषयीच्या नियमात मोठे बदल केले. बुकिंगविषयीचे नियम आणि कालावधी वाढवला. त्याचा उलटा परिणाम झाला. ग्राहकांनी थेट गॅस एजन्सीवर धडक दिली. गॅस पुरवठा होणार नसल्याचा संदेशच यातून गेला. नैसर्गिक गॅसची नवीन खेप गुजरात बंदरावर दाखल झाली आहे. तर सरकारी आणि (पान २ वर)



# इराणचा कतारच्या सर्वात मोठ्या गॅस केंद्रावर हल्ला

**तेहरान/वृत्तसंस्था :** मध्य पूर्वेतील तणाव आता पूर्णपणे नियंत्रणाबाहेर गेला आहे. आत्मघाती ड्रोन हल्ल्यांनी इराकमधील अमेरिकन लष्करी तळाला लक्ष्य केले असून, त्याचवेळी कतारच्या गॅस हबवर क्षेपणास्त्रांचा मारा करण्यात आला आहे. कतारची सरकारी उर्जा कंपनी कतार एनर्जीने सांगितले की, गुरु वारी त्यांच्या अनेक लिक्विफाइड नॅचरल गॅस (एलएनजी) सुविधांवर क्षेपणास्त्र हल्ले झाले. या हल्ल्यांमुळे मोठ्या प्रमाणात आग लागली असून आधी झालेल्या नुकसानीत आणखी वाढ झाली आहे. कंपनीने स्पष्ट केले की हे हल्ले यापूर्वी झालेल्या हल्ल्यानंतरच झाले. बुधवारी रास लफान इंडस्ट्रियल सिटीवर झालेल्या हल्ल्यात गॅस-टू-लिक्विड्स सुविधेचे मोठे नुकसान झाले होते.



इराणच्या सरकारी दूरदर्शननेही या हल्ल्याची पुष्टी केली. कतारचा प्रमुख गॅस प्रकल्प रास लफान रिफायनरी पुन्हा क्षेपणास्त्राने लक्ष्य करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. हल्ल्यानंतर तेथे आग लागली असून मोठ्या प्रमाणात धूर उठताना दिसत आहे. इराणने टेलिग्रामवर पोस्ट करून रास लफान रिफायनरी जळत असल्याचे म्हटले आहे.यावरून हल्ले थांबण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत. आधीच्या हल्ल्यातही मोठ्या नुकसानीची माहिती कतारने दिली होती आणि नव्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे.

सौदी अरेबियाचे परराष्ट्र मंत्री प्रिन्स फैसल बिन फरहान यांनी स्पष्ट इशारा दिला आहे. त्यांनी म्हटले की, इराण शेजारी देशांवर हल्ले करून दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र सौदी अरेबिया या दबावाला झुकणार नाही आणि गरज पडल्यास लष्करी कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार राखून ठेवतो.रियाधमध्ये प्रादेशिक परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीनंतर प्रिन्स फैसल म्हणाले की, असा दबाव उलट परिणाम करणारा ठरेल. सौदी अरेबियाने यापूर्वीही स्पष्ट केले आहे की, तो प्रत्युत्तरात्मक (पान २ वर)

## युद्धामुळे कच्चे तेल दुप्पट, 146 डॉलरवर पोहोचले

**नवी दिल्ली-** इराणकडून आखाती देशांमधील उर्जा ठिकाणांवर नवीन हल्ल्यांनंतर आज १९ मार्च रोजी जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या आणि नैसर्गिक वायूच्या किमतीत ३०% पर्यंत वाढ झाली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून भारतात कच्च्या तेलाच्या किमती जवळपास दुप्पट होउन १४६ डालरवर पोहोचल्या आहेत. वायू आणि कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने भारतात गॅस सिलेंडर आणि पेट्रोल-डिझेलचे दर वाढू शकतात. युद्धापूर्वी २७ फेब्रुवारी रोजी ब्रेंट क्रूड ७३ डालरच्या खाली होते. आता त्याची किंमत वाढून ११४ डालर प्रति बॅरलच्या जवळपास पोहोचली आहे. तर इंडियन बास्केटच्या किमती ७१ डालरवरून वाढून १४६ डालर प्रति बॅरलपर्यंत पोहोचल्या आहेत. भारत आपल्या गरजेपैकी ८५% कच्चे तेल आणि ५०% पेक्षा जास्त गॅस (पान २ वर)

● पेट्रोल-डिझेल महाग होउ शकते ● हल्ल्यामुळे कतारचा प्लांट बंद ● युरोपमध्ये गॅसची किंमत ३०% वाढली



## ज्योतिषी सांगणा-या कॅप्टन खरातकडून बलात्कार प्रकरणी एसआयटीची स्थापना

# सापडली करोडोची माया, अनेक महिलांचे केले लैंगिक शोषण

**नाशिक/प्रतिनिधी :-** अंकशास्त्रावरून ज्योतिषी सांगणारा कॅप्टन अशोक खरात याला अटक करण्यानंतर या प्रकरणाच्या तपासाला गती आली असून राजकीय तसेच अनेक प्रतिष्ठित लोक गुंतले असल्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी महिला अधिकारी तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली एस आय टी ची स्थापना करण्यात आली आहे. दरम्यान पोलीस कोठडी मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याच्या विविध ठिकाणी छापे मारू न २०० कोटी रु पयांची मालमत्ता असल्याचे समोर आणले आहे दरम्यान अनेक स्त्रियांच लैंगिक शोषण केले असल्याची प्राथमिक माहिती या छाप्यामधून समोर आली आहे पोलीस लवकरच पुढील कारवाई करणार आहे. अनेक राजकीय नेते कलावंत आणि अधिका-यांना अंकशास्त्रावरू न आपले भविष्य सांगणा-या कॅप्टन अशोक खरात विरोधात नाशिकच्या सरकार वाडा पोलीस ठाण्यामध्ये बलात्काराचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी त्याला तात्काळ अटक केली होती. त्यानंतर त्याला २४ तारखेपर्यंत पोलीस कोठडी मिळाल्यावर अधिक गतिमान पद्धतीने पोलिसांनी तपास सुरू केला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये अनेक राजकीय नेते तसेच प्रतिष्ठित नागरिक अडकल्यामुळे या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एस आय टी ची स्थापना करण्यात आली आहे तेजस्विनी सातपुते या महिला अधिका-यांच्या मार्फत एसआयटी सर्व चौकशी करणार असून यामुळे आता अधिक काही माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशोक खरातने (पान २ वर)



## कॅप्टन अशोक खरातची अजितदादांवर काळी जादू?

### बंगल्याच्या बाहेर जादूटोण्यातील वस्तू?

**मुंबई :** राज्याच्या महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकरांच्या भोवती मोठं वादळ उठलंय. एका विकृत, भोंदू आणि कथित गुन्हेगार अशोक खरातसोबतच्या जवळीकीचे फोटो-व्हिडिओ व्हायरल झाले. त्यात आता खरातला वाचवण्याचे गंभीर आरोप सुरु झालेत. शिवसेना नेत्या सुषमा अंधारे यांनी तर उघडपणे आरोप केलाय की पत्रकारांवर दबाव टाकला गेला. हा आरोप हलक्यात घेण्यासारखा नाही. जर महिला आयोगाच्या अध्यक्षा स्वतःच सत्य दडपण्याच्या भूमिकेत असतील, तर मग सामान्य महिलांनी न्याय कुणाकडे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाताच्या अनुषंगाने विविध आरोप प्रत्यारोप सुरू आहे. यादरम्यान नाशिकच्या कॅप्टन अशोक खरात याचा संबंध अजित पवार यांच्या अपघातामागे आहे का? याचा तपास करावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. तर अजितदादांच्या बंगल्याबाहेर जादूटोण्यातील वस्तू सापडल्याचा दावा शरद पवारांच्या पक्षाचे प्रवक्ते सुनील माने यांनी व्यक्त केला.




## हायप्रोफाईल भोंदूबाबाच्या फार्म हाउसवर शस्त्रांचा साठा

**नाशिक / प्रतिनिधी-** नाशिकमधील हायप्रोफाईल भोंदू बाबा अशोक खरात उर्फ कॅप्टन याला बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यात अटक झाली आहे. त्याचे राज्यातील अनेक मंत्री आणि उच्च पदस्थांसोबत संबंध असल्यामुळे त्याच्या अटकेने राजकीय वर्तुळातही मोठी खळबळ उडाली आहे. धार्मिक आस्था, दैवी शक्ती आणि मंत्रतंत्राच्या आडून महिलांचा विश्वास संपादन करू न त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप अशोक खरातवर आहे. बुधवारी त्याला अटक झाली असून २४ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. अशोक खरात उर्फ कॅप्टनच्या अटकेनंतर त्याच्या मिरगाव येथील फार्म हाउसवर बुधवारी रात्री नाशिक गुन्हे शाखेने छापा टाकला. यामध्ये अनेक धक्कादायक गोष्टी समोर आल्या आहेत. अशोक खरातच्या फार्म हाउसमधून एक रिव्हॉल्वर आणि काही बुलेट्स पोलिसांनी जप्त केल्या आहेत. तसेच खरातची मालमत्ता आणि इतर काही महत्त्वाची कागदपत्र पोलिसांनी ताब्यात घेतली आहे. याआधी भोंदूबाबा खरातकडून एक (पान २ वर)

# सापाचे विष एनडीपीएसच्या कक्षेत येत नाही

## रेव्ह पार्टी प्रकरणातील एल्विस यादववरील खटला सुप्रीम कार्टाकडून रद्द

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्पदंश किंवा सापाच्या विषाचा वापर करणे हे अमली पदार्थ व मानसोपचार पदार्थ कायद्याच्या व्याख्येत बसत नाही, असे स्पष्ट करत सर्वोच्च न्यायालयाने दि. १९ मार्च रोजी प्रसिद्ध यूट्यूबर एल्विश यादव (उर्फ सिद्धार्थ) याच्याविरुद्ध सुरू असलेली फौजदारी कारवाई रद्द करण्याचा आदेश दिला. आम्ही अद्याप आरोपांमधील तथ्यांची सखोल तपासणी केलेली नाही. यामुळे संबंधित सक्षम प्राधिकरणाने (उदा. वन विभाग किंवा अधिकृत सरकारी अधिकारी) ठरवले तर ते वन्यजीव संरक्षण कायद्याच्या कलम ५५ अंतर्गत पुन्हा रीतसर तक्रार दाखल करू शकतात, असेही न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंग यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.



एल्विश यादववर आपल्या व्हीडीओमध्ये सापांचा वापर केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. यापूर्वी मे २०२५ महिन्यात, अलाहाबाद उच्च न्यायालयाने एल्विशने युक्तिवाद केला होता की, वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत कोणत्याही सक्षम अधिका-याने त्याच्याविरुद्ध अधिकृत तक्रार दाखल केलेली नाही. आपण एक प्रसिद्ध इन्फ्लुएन्सर आणि रिअलिटी शोमधील स्पर्धक असल्यामुळे, केवळ प्रकरणाला सनसनाटी वळण देण्यासाठीच आपल्यावर एनडीपीएस(अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा) सारखी कडक कलमे लादण्यात आली आहेत. देशाच्या कायद्यानुसार, प्रत्येक व्यक्ती कितीही लोकप्रिय असो किंवा तिचे व्यक्तिमत्त्व कितीही मोठे असो, कायद्याच्या दृष्टीने समान असते, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने कायदेशीर कारवाई रद्द करण्यास स्पष्ट नकार दिला होता. यानंतर एल्विश यादवने त्याच्याविरु द्ध वन्यजीव (संरक्षण) कायदा आणि अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत सुरू असलेल्या कारवाईविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

**आरोप खरे मानले तरी एनडीपीएस लागू होत नाही**

न्यायमूर्ती (पान २ वर)



# किरण महल्ले यांचा महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते गौरवपूर्ण सत्कार



## राष्ट्रीय स्तरावर अमरावतीचा मान उंचावला

**अमरावती/प्रतिनिधी:-** अमरावती शहरासाठी अत्यंत अभिमानाचा आणि गौरवाचा क्षण ठरला असून, माजी महापौर किरण महल्ले यांची भारत सरकारच्या राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या सदस्यपदी झालेल्या निवडीबद्दल महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देत पुष्पगुच्छ देऊन त्यांचा विशेष सत्कार केला.किरणताई महल्ले यांच्या निवडीमुळे अमरावतीच्या सामाजिक व राजकीय क्षेत्राला राष्ट्रीय स्तरावर नागरी ओळख मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. समाजातील वंचित, मागासवर्गीय आणि गरजू घटकांसाठी त्यांनी सातत्याने केलेले कार्य, त्यांची निष्ठा, जिद्द आणि समाजसेवेची अखंड तळमळ ही अनेकांसाठी प्रेरणादायी असल्याचे महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी सांगितले.'किरणताई महल्ले यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी ही केवळ वैयक्तिक यश नसून संपूर्ण अमरावती शहराचा सन्मान आहे. त्यांच्या नेतृत्वातून समाजहिताचे प्रभावी निर्णय होतील आणि राष्ट्रीय पातळीवर अमरावतीचे नाव अधिक उज्ज्वल होईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.सत्काराला उत्तर देताना किरणताई महल्ले यांनी मिळालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, मागासवर्गीय समाजाच्या हक्कांसाठी व सर्वसमावेशक विकासासाठी प्रामाणिकपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी उपस्थित मान्यवरांनीही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत पुढील कार्यकाळासाठी यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या.

पान १ व १० वरून

## इन्स्टाग्राममधून बाहेर

मुख्यमंत्री असताना दोन लाख कोटी रु पये राज्यावर कर्ज होते. आता राज्यावर ११ लाख कोटी रु पयांचे कर्ज आहे. कुठे चाललोय आपण? असा संतप्त सवाल राज ठाकरेंनी विचारला. आपल्या राज्यात तीन वेळा कर्जमाफी झाली, पण शेतक-यांच्या सर्वाधिक आत्महत्याही आपल्याच राज्यात होतात हे दुर्दैवी असल्याचे राज ठाकरे म्हणाले.

महापुरु षांच्या कार्याचा गौरव-या भाषणादरम्यान राज ठाकरेंनी महाराष्ट्रासाठी योगदान असलेल्या व्यक्तिमत्वांची यादी वाचवून दाखवली. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते शाहू महाराज, प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह अनेक महान लोकांची नावे घेतली. त्याचवेळी त्यांनी आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात ज्यांचा वाटा आहे त्यांचीही यादी वाचून दाखवली. त्यामध्ये बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, वि स पागे, संघाचे हेगडेवार, वि का राजवाडे, बाबासाहेब पुरंदरे, रणजित मेहंदळे यांच्या नावांचा आणि कार्याचा गौरव राज ठाकरे यांनी केला. आपल्याकडे या महान लोकांच्या जयंत्या साज-या केल्या जातात, पण त्यांचे विचार कधीही घेतले जात नाहीत. महाराष्ट्र हा प्रतिमेत अडकल्याची खंत राज ठाकरे यांनी व्यक्त केली. या आधी संपूर्ण देश महाराष्ट्राकडे पाहायचा, महाराष्ट्र काय नवा विचार देणार ते. पण आज काय झालंय महाराष्ट्राला. आज आम्हाला महाराष्ट्र कसा घडवायचा आहे हेच माहिती नाही. सरकार रोज काही ना काही लादत आहे, आपल्याला त्याचा काय फरक पडत नाही.

**महाराष्ट्रासाठी नवीन योजना-**त्यामुळे भविष्यातील महाराष्ट्र घडवण्यासाठी एक नवीन योजना समोर आणतोय. २००६ साली याच व्यासपीठावर मी महाराष्ट्राचा विकास आराखडा आणेन असे सांगितले होते. ती ब्लू प्रिंट मी २०१४ साली आणली. त्यानंतर आजपर्यंत त्या ब्लू प्रिंटमध्ये काय आहे हे कुणीही मला विचारले नाही. राज ठाकरेंनी यावेळी नवीन वेबसाईट सुरू करत असल्याचे जाहीर केले. महाराष्ट्र नेक्स्ट असे त्या वेबसाईटचे नाव आहे. त्यामध्ये मराठी आणि इंग्रजीचा पर्याय देण्यात आला आहे. या वेबसाईटवर एकूण २७ विषय देण्यात आले आहेत. त्यामध्ये शेतीपासून ते आरोग्य व्यवस्था, वाहतूक सुविधा अशा विषयांचा समावेश आहे. लोकांच्या ज्या कल्पना आणि विचार असतील ते सर्व या वेबसाईटवर टाकता येणार आहेत. एक नवा महाराष्ट्र घडवण्यासाठी, राज्याला आकार देण्याचे काम घडवण्यासाठी योगदान द्या असे राज ठाकरे म्हणाले.

## गडचिरोलीत 11 जहाल माओवाद्यांचे

आत्मसमर्पण योजनेअंतर्गत या सर्वांना सन्मानाने जगण्यासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे. वैयक्तिक्र मदतः आत्मसमर्पित माओवाद्यांना त्यांच्या पदानुसार ४ ते ८.५ लाख रु पयांपर्यंतचे पुनर्वसन बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. जोडीदारांसाठी अतिरिक्त मदतः सुखलाल कोक्सा-शांती तेलामी आणि गणेश कोवासी-मिनको मट्टामी या पती-पत्नी जोड्यांनी एकत्रित आत्मसमर्पण केल्यामुळे त्यांना अतिरिक्त १.५ लाख रु पयांची मदत मिळेल. गट आत्मसमर्पणः सामूहिकरीत्या शरण आल्यामुळे या गटाला १० लाख रु पयांचे अतिरिक्त बक्षीस दिले जाणार आहे. उर्वरित माओवाद्यांनीही हिंसेचा त्याग करू न, शस्त्रे खाली ठेवावीत आणि लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात सामील होउन शांततेचा मार्ग स्वीकारावा. असे आवाहन विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षलविरोधी अभियान) संदीप पाटील यांनी केले आहे. याप्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक संदिप पाटील, पोलीस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे डीआयजी अजय कुमार शर्मा, पोलीस अधीक्षक नीलोत्पल आणि इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## इराणचा कतारच्या सर्वात मोठ्या

कारवाई करण्यास मागे हटणार नाही.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रु थ सोशलवर लिहिले की, इराणच्या साउथ पार्स गॅस फील्डवर आता कोणताही हल्ला होणार नाही. मात्र जर इराणने पुन्हा कतारच्या एलएनजी प्रकल्पांवर हल्ला केला, तर अमेरिका त्या संपूर्ण क्षेत्राचा अभूतपूर्व ताकदीने नाश करेल.ट्रम्प यांनी म्हटले, या विशिष्ट हल्ल्याबाबत अमेरिकेला कोणतीही पूर्वकल्पना नव्हती आणि कतार देशाचाही त्यात कोणताही सहभाग नव्हता किंवा असा हल्ला होईल याची त्यांना कल्पनाही नव्हती. दुर्दैवाने, इराणकडे साउथ पार्स हल्ल्याशी संबंधित आवश्यक माहिती नव्हती आणि त्यांनी चुकीच्या समजुतीतून कतारच्या एलएनजी सुविधेच्या एका भागावर हल्ला केला.

ते पुढे म्हणाले की, या अत्यंत महत्त्वाच्या आणि मौल्यवान साउथ पार्स फील्डच्या बाबतीत इस्त्रायल आता कोणताही पुढील हल्ला करणार नाही, जोपर्यंत इराण पुन्हा निरपराध देश कतारवर हल्ला करण्याचा निर्णय घेत नाही. जर तसे झाले, तर अमेरिका इस्त्रायलची मदत किंवा परवानगी असो वा नसो साउथ पार्स गॅस फील्ड पूर्णपणे उद्ध्वस्त करेल, आणि ती कारवाई इतकी प्रचंड शक्तिशाली असेल की इराणने यापूर्वी कधी अनुभवली नसेल. ट्रम्प यांनी शेवटी म्हटले की, मी इतकी हिंसा आणि विनाश होउ द्यायचा नाही, कारण त्याचा इराणच्या भविष्यात दीर्घकालीन वाईट परिणाम होईल. मात्र कतारच्या एलएनजी सुविधांवर पुन्हा हल्ला झाला, तर कारवाई करण्यास मी अजिबात मागेपुढे पाहणार नाही.

## युद्धामुळे कच्चे तेल दुप्पट,

आयात करतो, त्यामुळे तेथील प्रत्येक घडामोड आपल्या खिशावर आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम करते. भारतीय बास्केटची किंमत १४६ डालर प्रति बॅरलपर्यंत पोहोचली आहे. जर कच्चे तेल याच पातळीवर राहिले, तर सरकारी तेल कंपन्यांना सध्याच्या किमतीत पेट्रोल-डिझेल विकणे कठीण होईल.

येत्या काही दिवसांत पेट्रोल-डिझेलच्या किमतीत १० ते १५ रु पयांपर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. यासोबतच, गॅसच्या तुटवड्यामुळे एलपीजी सिलेंडरचे दरही वाढू शकतात. अलीकडेच, तेल शुद्धीकरण कंपन्यांनी घरगुती एलपीजी सिलेंडरच्या किमतीत ६० रु पयांची वाढ केली होती.

**२. खाण्यापिण्याच्या वस्तूही महाग होउ शकतात**

कच्चे तेल केवळ गाड्यांच्या इंधनासाठीच वापरले जात नाही, तर पेंट, प्लास्टिक, खते आणि औषधांच्या कच्च्या मालामध्येही त्याचा उपयोग होतो. डिझेल महाग झाल्याने मालवाहतूक महाग होईल, ज्यामुळे फळे, भाजीपाला आणि धान्याचे दर वाढतील. एकूणच सर्वसामान्यांचे बजेट कोलमडेल.

**तीन मोठ्या बेंचमार्कच्या आधारावर ओळखले जाते कच्चे तेल**

जगभरात कच्चे तेल प्रामुख्याने तीन मोठ्या बेंचमार्कच्या आधारावर ओळखले आणि विकले जाते, ज्यांना ब्रेंट, ज़TI आणि OPEC बास्केट म्हणतात. ब्रेंट क्रूड उत्तर समुद्रातील (युरोप) सागरी विहिरींमधून काढले जाते आणि जगातील दोन-तृतीयांश तेल व्यापार याच दरावर अवलंबून आहे. तर ज़्क्ष अमेरिकेच्या भूभागातून काढले जाते आणि त्याच्या शुद्धतेमुळे अमेरिकन बाजाराचे मुख्य मानक आहे. ग्ध्क्ग्न बास्केट हे सौदी अरेबिया, इराण आणि इराक यांसारख्या आखाती देशांच्या संघटनेने (OPEC) उत्पादित केलेल्या वेगवेगळ्या कच्च्या तेलांचे सरासरी मिश्रण आहे. भारत कोणत्याही एका देशाकडून किंवा एकाच प्रकारचं तेल खरेदी करत नाही, तर इराक, सौदी अरेबिया, रशिया, UAE सारख्या अनेक देशांकडून वेगवेगळ्या प्रकारचं तेल खरेदी करतो. या सर्व वेगवेगळ्या प्रकारच्या तेलांच्या किमतींची जी सरासरी काढली जाते, तिलाच 'इंडियन बास्केट' म्हणतात.

## सापडली करोडोची माया,

लष्करी शिस्त आणि अंकशास्त्राच्या नावाखाली राजकीय नेते मंडळींसह प्रशासनातील बडे अधिकारी, खाकी वर्दीतील वरिष्ठांचे भविष्य सांगून गेल्या काही वर्षांत सुमारे २०० कोटींची संपत्ती जमवल्याची माहिती समोर आली आहे. यात नाशिक शहरातील गोविंद नगर परिसरातील एक अलिशान बंगला, कॅनडा कार्नर परिसरात ऑफिस, पाथर्डी परिसरात कोट्यावधींची ३० एकर जमीन आणि सिन्नर, ओझर विमानतळ परिसरासह शिर्डीतील कोट्यवधींच्या जमिनीचा समावेश आहे

दरम्यान, अशोक खरातच्या सिन्नरमधील मिरगाव येथील फार्म हाउसची नाशिक पोलिसांकडून रात्री तपासणी करण्यात आली. याशिवाय मिरगावतील इशान्येश्वर मंदिर आणि कुटीयाची देखील झाडाझडती घेण्यात आली. यावेळी तेथील स्थानिकांनी मिरगावातील फार्म हाउसवर अनेक नेत्यांसह कलाकार मंडळींचा राबता असायचा अशी माहिती पोलीसांना दिल्याचे समजते.

**कुठे किती संपत्ती?**

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक खरातची पाथर्डीत सर्व्हे क्रमांक ३३, ९३, ९७, १३२, १३८, २०३, २२०, मध्ये ३० एकर जमीन असून, याची किंमत अंदाजे १५० कोटींच्या आसपास असल्याचे बोलले जाते. याशिवाय गौळणे शिवारात त्याने पत्नी कल्पना, मुलगी सृष्टी आणि तृप्तबालाच्या नावे ३० कोटींच्या जमीनीचे खरेदी खत केल्याचे समजते. तर कहांडळवाडी, मीरगाव येथे ४५ एकर जमीन असून याची किंमत साधारणता दोन कोटींच्या आसपास असल्याची माहिती आहे. तसेच मीरगाव येथील मंदिराच्या मागे असलेल्या त्याच्या भव्य फार्महाउसची किंमत सुमारे १० कोटींच्या जवळपास असल्याचे सांगितले जाते. त्याबरोबरच ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टची वार्षिक उलाढाल दोन कोटींच्या आसपास आहे. तर ओझर विमानतळाजवळ पाच कोटींची जमीन असून, शहरातील कर्मयोगीनगरच्या आलिशान बंगल्याची किंमत ५ कोटी इतकी आहे. तर कॅनडा कॉर्नरच्या ऑफिसची किंमत १ कोटींच्या जवळपास असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे या सर्व संपत्तीची किंमत सुमारे २०० कोटी रु पयांच्या जवळपास आहे.

## हायप्रोफाईल भोंदूबाबाच्या

पेन ड्राईव्ह पोलिसांनी जप्त केला, त्यामध्ये ५८ आक्षेपा 'व्हिडिओ असल्याचे समोर आले आहे. शिवसेना खासदार संजय राउत यांनी ही महाराष्ट्रातील एपस्टिन फाईल असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष खरातच्या संस्थेवरील ट्रस्टी**

अशोक खरात याच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार) महिला प्रदेशाध्यक्ष तथा राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रु पाली चाकणकर यांचे फोटो समोर आले आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मंत्री दीपक केसरकर, मंत्री राधाकृष्ण विखे यांचे अशोक खरात सोबतचे फोटो समोर आले आहेत. रु पाली चाकणकर या खरातच्या संस्थेवर संचालक आहेत. रु पाली चाकणकर या बलात्काराचा आरोपी असलेल्या अशोक खरातची पाद्यपूजा करतानाचा व्हिडिओ देखील समोर आला आहे. यामुळे चाकणकर अडचणीत आल्या आहेत. पोलिसांनी अशोक खरात याच्याकडून एक पेन ड्राईव्ह जप्त केला आहे, त्यामध्ये राजकीय व्यक्ती, सेलिब्रिटी यांच्यासोबतचे व्हिडिओ असल्याचा दावा केला जात आहे.

अशोक खरात या भोंदू बाबाविरोधात नाशिक मधील सरकारवाडा पोलिसांत अत्याचाराचा गुन्हा दाखल झाला आहे. २८ वर्षीय महिलेने अशोक खरात या भोंदू बाबाविरोधात तक्रार दाखल केली. जप्त करण्यात आलेल्या पेन ड्राईव्हमध्ये ५८ आक्षेपा 'व्हिडिओ हस्तगत करण्यात आले आहेत. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, अशोक खरात याने त्याच्याकडे दैवी शक्ती असल्याचा दावा केला. मंत्रतंत्र यांच्या नावाखाली महिलेचा वि[illegible]ास संपादन केला. त्याने त्याच्या ऑफिसमध्ये महिलेला बोलावून गुंगी येईल असे पदार्थ तिला खायला देउन तिच्यावर अत्याचार केला. २०२२ पासून २०२५ पर्यंत हा प्रकार सुरु असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

## सापाचे विष एनडीपीएसच्या

एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंग यांच्या खंडपीठाने एल्विश यादवच्या याचिकेवर सुनावणीवेळी स्-पष्-ट केले की, एल्विश यादववर लावण्यात आलेले सर्पदंशाचे आरोप खरे मानले, तरी तांत्रिकदृष्टया त्याच्यावर अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा लागू होउ शकत नाही. भारतीय कायद्यानुसार अमली पदार्थांच्या अधिकृत यादीत सर्पदंश किंवा सापाच्या विषाचा समावेश केलेला नाही. त्यामुळे, हा खटला या कायद्याच्या कक्षेत बसत नाही. तसेच एनडीपीएस कायद्याच्या कलम २(२३) नुसार, सह-आरोपीकडून जप्-त करण-यात आलेला पदार्थ हा अमली पदार्थांच्या अधिकृत यादीत कोठेही होत नाही. त्यामुळे जप्त केलेली वस्तू मानसोपचार पदार्थ म्हणून सिद्ध होउ शकत नाही, हे मान्य करावेच लागेल.

**वन्यजीव (संरक्षण) कायद्याबाबतचा मुद्दा**

खंडपीठाने वन्यजीव (संरक्षण) कायद्याबाबत एक महत्त्वाचा तांत्रिक मुद्दा स्पष्ट करता म्हटले की, या कायद्यांतर्गत कारवाई तेव्हाच होउ शकते, जेव्हा एखाद्या अधिकृत अधिका-याने स्वतः तक्रार दाखल केली असेल. एल्विश यादवच्या प्रकरणात अशी कोणतीही अधिकृत तक्रार दाखल झाली नाही. वन्यजीव संरक्षण कायद्याचे कलम ५५ हे अनिवार्य करते की, तक्रार ही जबाबदार सरकारी यंत्रणेमार्फतच यायला हवी. या कायदेशीर प्रक्रियेचे पालन झाले नसल्यामुळे न्यायालयाने हा खटला रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्-याचे सर्वोच्-च न्यायालयाने स्पष्ट केले.

**खटला रद्दचा दिलासा-**न्यायालयाने एल्विश यादवला दिलासा दिला असला, तरी सर्वोच्-च न्यायालयाने या प्रकरणाची चौकशी पूर्णपणे थांबवलेली नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की आम्ही अद्याप आरोपांमधील तथ्यांची सखोल तपासणी केलेली नाही. यामुळे संबंधित सक्षम प्राधिकरणाने (उदा. वन विभाग किंवा अधिकृत सरकारी अधिकारी) ठरवले ते वन्यजीव संरक्षण कायद्याच्या कलम ५५ अंतर्गत पुन्हा रीतसर तक्रार दाखल करू शकतात, असेही न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन.के. सिंग यांच्-या खंडपीठाने स्पष्ट केले.

***काय होता एल्विश यादववर आरोप?***

परदेशी पाहुण्यांसाठी रेव्ह पार्ट्या आयोजित करणे आणि तिथे मनोरंजनासाठी सापाच्या विषाचा वापर केल्याचा गंभीर आरोप एल्विशवर होता. याप्रकरणी वन्यजीव संरक्षण कायदा आणि अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यांतर्गत त्याच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते.

## गुजरात- सुरतमध्ये 2.38

गाडीतून २.३८ कोटी रु पये किमतीच्या ५०० रु पयांच्या बनावट नोटा जप्त करण्यात आल्या. पोलिसांच्या तपासात असे समोर आले आहे की, सत्यम योग फाउंडेशनच्या वाहनातून बनावट नोटांची तस्करी केली जात होती. नोटांच्या पुरवठ्यासाठी गाडीवर भारत सरकार आणि आयुष मंत्रालयाची नावे लिहिलेली होती. गुन्हे शाखेने अहमदाबाद आणि सुरतमध्ये छापे टाकले असता, या संपूर्ण रॅकेटचा पर्दाफाश झाला.

**परदेशातून मागवलेले प्रिंटरही जप्त-**आश्रमात छापलेल्या या सर्व नोटा ५०० रु पयांच्या आहेत. बनावट नोटा सुरतमध्ये बनवल्या जात होत्या आणि त्या बाजारात आणण्यासाठी अहमदाबादला आणल्या जात होत्या. पोलिस आरोपींची चौकशी करू न या नोटा बाजारात आणल्या जाणा-या ठिकाणांची चौकशी करत आहेत. या रॅकेटमध्ये आणखी लोक सामील असू शकतात, जे हळूहळू नोटा बाजारात आणत होते, अशी शक्यता आहे.

या रॅकेटचा मुख्य आरोपी प्रदीप जोटांगिया याला गुरु जी या नावाने ओळखले जाते. प्रदीप सुरतमध्ये सत्यम योग फाउंडेशन नावाचा आश्रम चालवत होता. आश्रमातून बनावट नोटा छापण्याची अनेक यंत्रे, परदेशातून मागवलेले प्रिंटरही जप्त करण्यात आले आहेत. तपासात समोर आले की, आश्रमाचा वापर आध्यात्मिक कार्यांऐवजी बनावट नोटांच्या छपाईसाठी होत होता. गुन्हे शाखेकडून मिळालेल्या माहितीनुसार, हे रॅकेट सुमारे सहा महिन्यांपासून सक्रिय होते आणि या काळात २० लाख रु पयांपेक्षा जास्त किमतीच्या बनावट नोटा बाजारात खपवण्यात आल्या होत्या. नोटांच्या पुरवठ्यासाठी आयुष मंत्रालय गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या बनावट नेम प्लेट लावलेल्या कारचा वापर केला जात होता.सुरत गुन्हे शाखेने सुरत शहरातील सारथाना परिसरात कृष्णा रो हाउसच्या ७७ क्रमांकाच्या घरावर छापा टाकला. येथूनही लाखो रु पयांच्या बनावट नोटा आणि प्रिंटर जप्त करण्यात आले आहेत. या घरात योगगुरू प्रदीपचा एक साथीदार मुकेश पटेल राहत होता. मुकेश पटेलला ताब्यात घेउन रॅकेटमध्ये सामील असलेल्या इतर लोकांचा शोध घेतला जात आहे.

## राष्ट्रपतींनी घेतले रामलल्लाचे

दुपारी ३ वाजता मथुरेसाठी रवाना झाल्या. मथुरेत त्या इस्क?न आणि प्रेम मंदिरात दर्शन घेतील. शुक्रवार, म्हणजेच २० मार्च रोजी प्रेमानंद महाराजांची भेट घेतील. राष्ट्रपती म्हणाल्या भगवान श्रीरामांचा जन्म अयोध्येत झाला. या पवित्र भूमीवर पाउल ठेवणे हा माझ्यासाठी एक बहुमान आहे. भगवान रामांनी स्वतः आपल्या जन्मभूमीचे वर्णन स्वर्गाहूनही श्रेष्ठ असे केले आहे. अयोध्या नगरी ही रामाच्या सर्व भक्तांना अत्यंत प्रिय आहे. युद्धापश्चात माता सीता आणि आपल्या बंधूंसह भगवान रामांचे अयोध्येत झालेले पुनरागमन याचे एक कलात्मक चित्रणआपल्या संविधानाच्या पानांमध्ये पाहायला मिळते. हे चित्र पाहून मला असीम आनंद होतो.

## देशातील पहिल्या 'एलपीजी

खासगी कंपन्यांनी गॅस उत्पादन वाढवले आहे. तरीही परिस्थिती पूर्व पदावर येण्यासाठी कालावधी लागणार असल्याचे सध्याच्या चित्रावरू न दिसत आहे. त्यामुळे ग्राहक अधिक पॅनिक झाले आहे. त्यांना रोजच्या जेवणाची चिंता लागली आहे. यावर सरकारने अजून उपाय करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**सातही दिवस २४ तास सेवा सुरू**-सध्याच्या या परिस्थितीत बीपीसीएलने एक चांगला निर्णय घेतला आहे. गुरु ग्राममधील सोहाना येथील सेक्टर-३३ मध्ये एका रहिवासी भागात एलपीजी एटीएमची सुरु वात करण्यात आली आहे. हे ऑटोमॅटिक एलपीजी वेंडिंग सिस्टिम लोकांच्या मदतीला येणार आहे. रिकामे सिलिंडर आणून ग्राहकांना ते भरू न घेता येईल. कंम्पोझिट सिलिंडर भरण्यासाठी जास्तीत जास्त तीन मिनिटांचा कालावधी लागेल. पाण्याच्या जारप्रमाणे लोकांना आता गॅस सिलिंडर भरू न घेता येईल. त्यासाठी एलपीजी गॅस एजन्सीवर जाण्याची अथवा गॅस घरपोच येण्याची वाट पाहावी लागणार नाही. हे एलपीजी एटीएम सातही दिवस २४ तास सुरू असेल.

यूपीआय, के्रडिट-डेबिट कार्डचा वापर

गॅस सिलिंडर भरू न घेण्यासाठी ग्राहकाला त्याच्या रजिस्टर्ड मोबाईल क्रमांकावरू न नोंदणी करावी लागेल. त्यानंतर एक ओटीपी येईल. तो एटीएम मशीनच्या की बोर्डवरू न टाईप करू न नोंदवावा लागेल. त्यानंतर एक क्युआर कोड येईल. तो वढक पेमेंटद्वारे स्कॅन करू न पेमेंट करता येईल. के्रडिट-डेबिट कार्डचा सुद्धा ग्राहकांना वापर करता येईल. पण या एलपीजी एटीएमवर लोखंडी गॅस टाकी नाही तर कंम्पोझिट सिलिंडरचा वापर करता येईल.

## गारपीटसह पावसाचा वनोजा

उभ्या पिकांचे नुकसान अधिक वाढले आहे. काही शेतकऱ्यांनी काढलेला कांदा मोकळ्या जागेत वाळवण्यासाठी ठेवला होता, तोही पूर्णपणे भिजून गेला आहे.

दरम्यान, गुढीपाडव्याच्या निमित्ताने वनोजा बाग येथील लखमाजी महाराज संस्थान येथे दरवर्षीप्रमाणे यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेसाठी परिसरातील तसेच बाहेरील गावांमधून मोठ्या संख्येने भाविक येतात. मात्र, अचानक आलेल्या पावसामुळे यात्रेच्या ठिकाणी मोठी धावपळ उडाली. दुकानदार, भाविक आणि आयोजक यांना तातडीने आसरा शोधावा लागला. काही ठिकाणी तात्पुरत्या मंडपांचेही नुकसान झाल्याचे समोर आले आहे.

पावसामुळे यात्रेतील विविध कार्यक्रमांवरही परिणाम झाला. सांस्कृतिक कार्यक्रम, धार्मिक विधी आणि इतर नियोजित उपक्रम तात्पुरते थांबवावे लागले. त्यामुळे भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. तरीही पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पुन्हा काही कार्यक्रम सुरू करण्यात आले.

या घटनेमुळे शेतकरी वर्गात आर्थिक नुकसानाची भीती अधिक तीव्र झाली आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका बसला आहे. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

स्थानिक महसूल व कृषी विभागाने प्राथमिक पाहणी सुरू केली असून लवकरच नुकसानाचे सर्वेक्षण करण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. शासनाकडून योग्य ती मदत मिळावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

## पंचवटी चौकात शेतकऱ्यांचे

केला. आंदोलनच्या दरम्यान प्रकाश साबळे यांनी आत्महत्या केलेल्या शेतकरी विधवा, किसान पुत्र यांना नमन करून साडीचोळी भेट देत सांत्वना व्यक्त केली. श्रद्धांजली व संवेदना सभेच्या अध्यक्षस्थानी माजी विधानसभा उपाध्यक्ष शरद दसरे होते. यावेळी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, प्रकाश साबळे, हरिभाऊ मोहोड, डॉ. दिलीप काळे, जगदीश नाना बोंडे, गजानन अहमदाबादकर, विजय विल्हेकर, शेखर अवघड, नितीन पवित्रकार, महेश देशमुख, शरद जवंजाळ, एड.धनंजय तोटे, निलेश उबाड, समीर जवंजाळ, अशोकराव वाकोडे, अमोल भारसाकळे, राहुल तायडे, अक्षय साबळे, अमित कुचे, प्रवीण कोल्हे, गजानन भगत, सुनील पडोळे, अक्षय सरोदे, आकाश गडपाल, मिलिंद वंजारी, योगेश बोबडे आदी शेतकरी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अकोट तालुक्यात अवकाळी

मारा अधिक तीव्र होता. तसेच खारपान पट्ट्यातील काही गावांमध्येही गारांसह पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह आलेल्या या पावसामुळे काही काळ वाहतूक व दैनंदिन व्यवहारांवर परिणाम झाला. विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यामुळे नागरिकांनी सुरक्षित स्थळी आसरा घेतला.

दरम्यान, या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, मागील काही दिवसांपासून जाणवणाऱ्या उकाड्यापासून नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. मात्र, शेतीपिकांचे नुकसान लक्षात घेता शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. नुकसानीचा पंचनामा करून शासनाने तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

## केडिया नगरात दहशत

पथक नियमित गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. त्यानुसार केडिया नगर चौकात एक इसम प्राणघातक शस्त्र घेऊन संशयास्पद हालचाली करत असल्याचे कळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तेथे पोहोचताच संबंधित तरुण हातात शस्त्र घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण करत असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी परिस्थितीचा अंदाज घेत तत्काळ कारवाई करत त्या इसमाला ताब्यात घेतले. पंचांच्या उपस्थितीत विचारपूस केल्यानंतर त्याने आपले नाव प्रेम श्रीकृष्ण कुंजाम (वय २१, रा. गडगडेश्वर मंदिराजवळ, अमरावती) असे सांगितले. झडतीदरम्यान आरोपीकडून धारदार चायना चाकू जप्त करण्यात आला. या शस्त्राची लांबी सुमारे ११ इंचांहून अधिक असून त्याचे पाते अत्यंत तीक्ष्ण व टोकदार असल्याने गंभीर गुन्ह्यासाठी वापर होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी तत्काळ हा चाकू जप्त करून आरोपीविरुद्ध शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे परिसरात संभाव्य अनुचित घटना टळली असून पोलिसांच्या सतर्कतेचे कौतुक होत आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास राजापेठ पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक मिलिंद हिवरे यांच्यासह मनीष करपे, पंकज खटे, रवी लिखितकर, सागर भजगवरे, अर्जुन कदम आदींच्या पथकाने केली.

## विद्युत तारेच्या संपर्कात

मृत्यू झाला,' असा आरोप त्यांनी केला आहे.

दरम्यान, या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी विद्युत वितरण व्यवस्थेच्या सुरक्षितते बाबत प्रश्न उपस्थित केले असून संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, तसेच नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

## शेतीसाहित्य चोरी करणाऱ्या

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे देवदास शंकरराव धुर्वे (वय ४५) व शरीफ अब्दुल खान (वय २१, दोघेही रा. तळेगाव, ता. आष्टी, जि. वर्धा) अशी आहेत. मागील काही दिवसांपासून तिवसा परिसरात शेतातील केबल व स्प्रिंकलर चोरीच्या घटना वाढल्याने पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली होती.

दरम्यान, स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार संशयित ऑटोची तपासणी करण्यात आली. त्यावेळी ऑटोमध्ये चोरीचा माल आढळून आला. पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी विविध ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली.

या कारवाईत पोलिसांनी सुमारे २ लाख ३० हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात २६ किलो तांब्याचा तार, ३२ स्प्रिंकलर तसेच गुन्ह्यात वापरलेले साहित्य व वाहनांचा समावेश आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू असून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## शेगावमध्ये मातृ संस्कार

अखिल भारतीय बाल सभा सहसंयोजिका अंजली देव, रश्मी जाजोदिया, वसुधा देव, पूजा चव्हाण, स्मिता देशमुख, लता कोल्हे, रश्मी ईटकीकर आदि उपस्थित होते.

## तिवसा हद्दीतील वाढत्या

आर्थिक संकटाला सामोरे जात आहेत.

या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तिवसा पोलीस स्टेशनने तत्काळ प्रभावी उपाययोजना कराव्यात व गस्त वाढवावी, अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात पोलीस निरीक्षकांना लेखी निवेदन देण्यात आले. तालुका पक्ष सचिव कॉ. प्रकाश सोनोने व शहर सचिव कॉ. दिलीप गोहत्रे यांच्या नेतृत्वात संदिप बेलसरे, दादाराव चौधरी, विजय पाटील, सुरेश कळसकर, रविंद्र बोंद्रे, दशरथ बडवाईक, सुरेश तांबडे, अनिल मुदांने, धनराज जिरापुरे, किशोर देशमुख, भास्कर काळे, पुष्पक मुंद्रे, सुभाष खाकसे, स्वप्नील अळसपूरकर, मंगेश बिडकर आदींनी हे निवेदन दिले.

## मोर्शीत गजानन महाराजांच्या

आधारे आरोपी आढळून आला. त्याची चौकशी आणि पिशवीची तपासणी केली असता त्यात ७५० ग्रॅम वजनाची चांदीची छत्री आणि कळस सापडले. सुरुवातीला आरोपीने खोटे उत्तर दिले, मात्र संशय वाढल्यावर पोलिसांनी त्याला ताब्यात घेत पंचांसमक्ष मुद्देमाल जप्त केला. पुढील तपासात ही चोरी वर्धा जिल्ह्यातील आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या आर्वी (लहान) येथील गजानन महाराज मंदिरात घडल्याचे उघड झाले. आरोपीला पुढील कारवाईसाठी आष्टी पोलिसांच्या ताब्यात दिले गेले आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखाली पो.उपनि. आकाश शिवणकर, स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते व अथर्व कोहळे यांनी केली.

## शिरखेड येथे वंचितची

दिनेश इंगळे, पुण्यवर्धन राऊत, अंबादास राऊत, भागवतराव इंगळे , नरेंद्र खराते, प्रदिप खराते, गजानन तेलमोरे, श्रद्धानंद मोहोड, विशाखा गाडे, बंडुभाऊ वानखडे, प्रदिप नागदिवे, विक्की थोरात, आदित्य वानखडे, गोवर्धन खराते , ईत्यादी कार्यकर्ते बहुसंखेने उपस्थित होते . सागर भवते यांनी मोर्शी तालुक्यातुन शेकडो कार्यकर्ते ,महिला व नागरिकांना नागपूरच्या या विशाल मोर्च्या मध्ये उपस्थित राहण्याचे आवाहन केले . तसेच बॅनर , प्रसिद्धी पत्रकेच्या माध्यमातुन परिसरात प्रचार व प्रसारासाठी प्रयत्न करण्याचे कार्यकर्त्यांना आवाहन केले.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, २० मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# वाशिम शहरातील ९४० लक्ष रुपयांच्या रस्ता कामांना लवकरच मंजुरात मिळणार!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजनेअंतर्गत सन २०२५-२६ या वर्षात विकास योजना अंमलबजावणी मध्ये वाशिम जिल्ह्यातील ५१ कोटी रुपयांचे कामे प्रस्तावित करण्यात आली होती. यामध्ये वाशिम शहरातील ९ कोटी ४० लक्ष रुपयांच्या कामाचा समावेश आहे. सदर कामांना लवकरच मंजुरात मिळणार आहे अशी माहिती शिवसेना नेत्या आ. भावनाताई गवळी पाटील यांनी दिली आहे.**



**आ. भावनाताई गवळी पाटील यांची माहिती**

भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष अर्थसहाय्य योजना ही केंद्र सरकारने राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी दिलेली एक विशेष योजना आहे. या योजनेअंतर्गत, राज्यांना ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. या निधीचा उपयोग आरोग्य, शिक्षण, सिंचन, पाणीपुरवठा, वीज, रस्ते, पूल आणि रेल्वे यासह विविध क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी करता येते. या योजनेअंतर्गत, केंद्र सरकारने २०२३-२४ मध्ये १६ राज्यांना ५६,४१५ कोटी रुपये प्रदान केले आहेत. वर्ष २०२५-२६ करिता आ. भावनाताई गवळी पाटील यांनी १० सप्टेंबर २०२५ रोजी वाशिम जिल्ह्यातील रिसोड, वाशिम, कारंजा व मंगरूळपीर नगरपरिषद आणि मालेगाव व मानोरा नगरपंचायत अंतर्गत ५१ कोटी रुपयांची कामे संचालक, नगर रचना व मूल्य निर्धारण विभाग पुणे यांच्याकडे प्रस्तावित केली होती. यामध्ये वाशिम शहरातील पाटणी चौक ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण व अनुषंगिक कामे करणे - ५ कोटी, प्रभाग क्रमांक १५ मधील वाळकी फाटा ते वाळकी पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - १ कोटी, प्रभाग क्रमांक ८ मधील नगरपरिषद शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे - ४९ लक्ष, प्रभाग क्रमांक ५ मधील हरिओम नगरातील व्यवहारे यांचे घर ते डॉ. चरखा यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - ६० लक्ष, प्रभाग क्रमांक ४ मधील महात्मा गांधी शाळा परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे - ७० लक्ष, प्रभाग क्रमांक ७ मधील रिसोड मेन रोड ते सोनखास पर्यंतच्या ( डिपी) रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - १ कोटी आणि जुनी नगरपरिषद इमारत ते राजनी चौक पर्यंतच्या रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे - ७० लक्ष रुपये या कामाचा समावेश आहे. सदर कामाला शासनाकडून लवकरात मंजुरात मिळणार असल्याने वाशिमकरांच्या मुख्य रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

**निधी उपलब्ध करून देण्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आ. गवळी यांना आश्वासन**

महाराष्ट्रातील नगर विकास विभाग आणि नगर प्रशासन संचालनालय स्मार्ट सिटी, स्वच्छ भारत अभियान आणि पायाभूत सुविधा (रस्ते, पाणीपुरवठा) प्रकल्पांसाठी भांडवली गुंतवणूक आणि वित्तीय साहाय्य पुरवतात.

# ऑफलाईन टेंडर घोटाळ्याचा आरोप; कामे थांबवली नाहीत तर २३ मार्चला आत्मदहन!

## *नगरसेवक गणेश अहिर यांचा जिल्हाधिका-यांना इशारा*

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



मालेगाव नगरपंचायती मध्ये सुरू असलेल्या ऑफलाईन टेंडर प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नगरसेवक गणेश रामप्रसाद अहिर यांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तीन दिवसांत कामे स्थगित न केल्यास २३ मार्च रोजी आत्मदहन करण्याचा इशारा दिल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे अहिर यांनी जिल्हाधिकारी, वाशिम यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नगरपंचायतीने मागील महिन्यापासून विविध विकास कामांसाठी ऑफलाईन टेंडर (निविदा) प्रक्रिया राबवली असून ती पूर्णपणे संशयास्पद व नियमबाह्य पद्धतीने पार पडत आहे नियमाप्रमाणे अशा निविदांची माहिती वृत्तपत्रांसोबतच नगरपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर लावणे बंधनकारक असतानाही एकही निविदा फलकावर लावण्यात आलेली नाही, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे यामुळे संपूर्ण प्रक्रिया 'मॅनेज' करण्याचा प्रयत्न असल्याचा संशय बळावत असून केवळ मोजक्या ठेकेदारांना लाभ मिळावा यासाठीच गोपनीय पद्धतीने टेंडर काढण्यात आल्याचे दिसून येत आहे विशेष म्हणजे, सुमारे १८ कामांची निविदा प्रक्रिया फक्त तीनच ठेकेदारांपुरती मर्यादित ठेवण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे अहिर यांनी पुढे नमूद केले की, याबाबत १३ मार्च रोजीही अनेक नगरसेवकांनी लेखी तक्रार दिली होती, मात्र त्यानंतरही प्रशासनाने कोणतीही दखल न घेता सदर कामांना कार्यारंभ आदेश देऊन प्रत्यक्ष कामे सुरू केली आहेत त्यामुळे ही कामे आधीच 'मॅनेज' झाल्याचा संशय अधिकच गडद झाला आहे दरम्यान, काही प्रभागातील ऑनलाईन निविदा अद्याप उघडण्यात आलेल्या नसताना ऑफलाईन निविदांना प्राधान्य देण्यात येत असल्याने पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे यामुळे नगरपंचायतीच्या आर्थिक नुकसानीसह मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही अहिर यांनी स्पष्ट केले आहे तीन दिवसांचा अल्टिमेटम देत त्यांनी मागणी केली आहे की, मागील महिन्यात काढलेल्या सर्व ऑफलाईन टेंडरची कामे तात्काळ थांबवून त्यांना स्थगिती द्यावी, अन्यथा २३ मार्च २०२६ रोजी मालेगाव येथे आत्मदहन करण्याचा इशारा त्यांनी निवेदनातून दिला आहे या गंभीर प्रकरणाची प्रत नगर विकास मंत्रालय, सहआयुक्त (नगरपालिका प्रशासन), मुख्याधिकारी, तसेच पोलीस प्रशासनालाही पाठविण्यात आल्याने आता प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# वाशिम तालुक्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाचे थैमान



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तालुक्यातील ग्राम तोंडगाव तामसाळा बोराळ समवेत जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने थैमान घातले प्रचंड वाऱ्यासह गारपती गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे आंब्याचे मोठे नुकसान झाले आहे. पूर्वीच निसर्गाच्या लहरीपणामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना या अवकाळी पावसामुळे आणखी मोठा फटका बसला आहे तोंडगाव परिसरात व तामसाळा मोठ्या प्रमाणात गारपीट झाली त्यामुळे संपूर्ण शेतकऱ्यांचे पिकांचे , गहू व आंब्याचे पिकांचे नुकसान झालेले आहे प्रशासनाने शेतकऱ्यांच्या शेतीचे तत्काळ पंचनामे करून त्यांना धीर देणे जरुरी आहे. शासनाने शेतकऱ्यांचा तात्काळ मदत करण्याची मागणी आता होत आहे. वाशिम जिल्ह्यात अनेक तालुक्यात अवकाळी पाऊस व गारपीट झाली आहे शहरातही पावसाने हजेरी लावली त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला.

# गोरख बोरकर यांना राज्यस्तरीय आदर्श उपसरपंच सन्मान जाहीर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



रिसोड तालुक्यातील मौजे. नंधाना या ग्रामीण भागामध्ये राहणारा व सामान्य परिस्थिती मधून असामान्य व्यक्तिमत्व सिद्ध करणारा एक युवक लहानपणापासूनच सामाजिक राजकीय वैचारिक चळवळीमध्ये झालेली ती जडणघडण आणि आज महाराष्ट्राच्या महामंचावर सर्व सामान्य शेतकऱ्याचा मुलाला आदर्श उपसरपंच म्हणून जी संधी मिळते आहे, ती नक्कीच त्यांच्या कार्याला उजाळणी सलाम देणारी आहे, जनसेवा हीच ईश्वर सेवा हेच मनी धनी ध्यानी धरत गोरख पाटील यांनी आपल्या आयुष्याला सुरुवात केली, आपणही कुणाचे तरी काही देणे लागतो या आशेने आपले संपूर्ण आयुष्य जनसामान्य गोरगरीब, कष्टकरी कामगार, विद्यार्थी, समाजातील सर्वच घटकांना विविध राजकीय पदाच्या जवाबदाराच्या माध्यमातून न्याय देण्याचा मानस गोरख पाटील बोरकर यांचा राहिलेला आहे, अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना देखील त्यांनी समाजसेवेची नाळ कधी तुटू दिली नाही, आपल्या सामाजिक राजकीय प्रवासामध्ये आदर्श ग्रामपंचायत नंधाना येथे २०१६ मध्ये सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या थाटापाटात साजरी करून शिव विचारांचे वादळ गावामध्ये प्रस्थापित करणारा हा युवक शिवरायांचा खरा मावळा ठरला आहे, आपल्या गावातला कोणताच युवक व्यसनाच्या आहारी जाऊ नये म्हणून २०१८ मध्ये पहिला दारूबंदीचा ठराव घेऊन दारू मुक्त करणारा पहिला उपसरपंच ठरला आहे, म्हणूनच २०१९ मध्ये ग्रामस्थ मंडळींनी वयाच्या १८ व्या वर्षी बिनविरोध तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून निवड केली, त्यासोबत कोरोनाच्या काळामध्ये संपूर्ण गाव निराशा मध्ये असताना गावामध्ये पालेभाज्यांचा वाटप, गावामध्ये कोरोनाची जनजागृती केली व गावात उत्साहाचे वातावरण केले, २०१९ पासून दरवर्षी कबड्डी प्रेमी यांच्यासाठी भव्य दिव्य अशा प्रकारच्या कबड्डीच्या स्पर्धा ठेवणारा हा पहिला उपसरपंच युवक ठरला आहे, २०२२ पासून तर आजपर्यंत गावामध्ये विचारांची जयंती साजरी व्हावी प्रबोधनाची जयंती साजरी व्हावी म्हणून महापुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करून गावासमोर गोरख बोरकर यांनी आदर्श उभा केला आहे, आपल्या गावामध्ये जिल्हा परिषद शाळा वाचावी पटसंख्या वाढावी जिल्हा परिषद शाळेचा दर्जा सुधारावा म्हणून शाळेमध्ये सी सी टी व्ही कॅमेरे लॅब आरोचे पाणी अशा डिजिटल सुविधा गावामध्ये उपलब्ध करून आदर्श जिल्हा परिषद शाळा यासाठी गोरख पाटील यांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान राहिलेले आहे.

# श्रीराम जन्मोत्सवानिमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



श्री संत तुकाराम महारा मठ, करुणेश्वर मंदिर यांच्या संयुत विद्यमाने १९ ते २६ मार्च पर्यत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाजन आयोजकांनी केले आहे.

याबाबत सविस्तर असे की, १९ मार्च रोजी कलश स्थापना, अभिषेक कार्यक्रम पार पडला. २१ मार्च रोजी रात्री ८.प३० ते १० वाजेपर्यंत नामदेव महाराज यांचे प्रवचन, २२ व २३ मार्च रोजी रात्री ८.३० ते १० वाजेपर्यंत अरुणराव बोडस यांचे किर्तन, २५ मार्च रोजी रात्री ८.३० ते १० पर्यंत अरुणराव बोडस यांचे किर्तन, २६ मार्च रोजी अरुणराव बोडस यांचे सकाळी १०.३० ते १२ वाजेपर्यंत किर्तन. या कार्यक्रमास सर्व सद्भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन श्री संत तुकाराम महाराज मठ, करुणेश्वर मंदीर जवळ, वाशीम यांनी केले आहे.

# नागपूर येथे आरएसएस मुख्यालयावर मोर्चा



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने नागपूर येथील 'एए मुख्यालयावर २३ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या धडक मोर्चाच्या पार्श्वभूमीवर वाशिम येथील शासकीय विश्रामगृहात महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. ही बैठक प्रदेश उपाध्यक्ष प्रा. डॉ. धैर्यवर्धन फुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.

देशाच्या सार्वभौमत्व, स्वायत्तता व स्वातंत्र्याशी भाजप व आरएसएसने तडजोड केल्याच्या निषेधार्थ राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात हा मोर्चा काढण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने मोर्चा भव्य व यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. बैठकीस महिला आघाडी जिल्हाध्यक्ष ज्योतिताई इंगळे, जिल्हामहासचिव सोनाजी इंगळे, जेष्ठ नेते अनंत जुमडे, जिल्हाप्रवक्ता संदीप सावळे, प्रा. रंगनाथ धांडे, पारितोष इंगोले यांच्यासह विनोद भगत, सारनाथ अवचार, नारायण मिटकरी, समाधान भगत, दिलीप भगत, नरेंद्र राऊत, बाळासाहेब खंडारे, राजू दारोकर, महेश तिडके, सदानंद गायकवाड, अरविंद पडघान, कृष्णा देशमुख, सुमेध वानखेडे, संतोष सरकटे आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. फुंडकर यांनी २३ मार्चच्या मोर्चासाठी जिल्हाभरात व्यापक जनजागृती करून जास्तीत जास्त कार्यकर्ते सहभागी करून घ्यावेत, असे सांगितले. तसेच माजी पदाधिकारी, तालुका अध्यक्ष, सम्यक विद्यार्थी आघाडी, महिला आघाडी व युवक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या-आपल्या क्षेत्रात बैठका घेऊन मोर्चा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले. बैठकीत सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमताने मोर्चा भव्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पाण्याचा थेंब अन् थेंब वाचवा, भविष्य सुरक्षित करा!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

वाढत्या उन्हाळ्याची चाहूल लागताच पाणी टंचाईच्या झळा बसू लागल्या आहेत. अशा परिस्थितीत पाण्याचा अपव्यय टाळून भविष्य सुरक्षित करणे ही काळाची गरज बनली आहे. याच सामाजिक जाणिवेतून आज दि.१६ मार्च २०२६ रोजी रिसोड शहरातील पठाडे नगर भागात विठाई मायनॉरिटी बहुउद्देशीय प्रतिष्ठान, रिसोड च्या वतीने 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' या अभियानांतर्गत जनजागृती करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांना पाण्याचे महत्त्व पटवून देत, नळांना तोट्या बसवण्याचे व पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन करण्यात आले. आजच्या धावपळीच्या युगात नैसर्गिक संसाधनांचा वापर बेसुमार होत आहे. विशेषतः घरगुती वापरामध्ये नळ उघडे सोडून देणे, विनाकारण अंगण धुणे किंवा वाहने धुण्यासाठी पाण्याचा अतिवापर करणे यामुळे पाणी टंचाई गंभीर रूप धारण करत आहे. हीच बाब लक्षात घेऊन विठाई मायनॉरिटी प्रतिष्ठानने पठाडे नगरमध्ये थेट घरोघरी जाऊन महिलांशी संवाद साधला. प्रतिष्ठानचे सदस्य जियाउर खान यांनी एका गृहिणीला प्रात्यक्षिक दाखवत संदेश दिला की, 'पाणी हे केवळ संसाधन नसून ते जीवन आहे. जर आपण आज पाणी वाचवले नाही, तर उद्याच्या पिढीला भीषण संकटाचा सामना करावा लागेल.' सार्वजनिक तसेच खासगी नळांना तोट्या (टॅप) नसल्यामुळे हजारो लिटर पाणी वाया जाते.

# सण उत्सव शांततेत साजरे करा; नियमांचे पालन करा

## ठाणेदार राजेश खेरडे यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



येणाऱ्या विविध सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर मालेगाव पोलीस ठाण्याच्या वतीने शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक राजेश खेरडे यांनी सर्व नागरिकांनी सण उत्सव शांततेत, सलोख्याने व उत्साहात साजरे करावेत, असे आवाहन केले.


१८ मार्च रोजी पोलीस स्टेशनच्या प्रांगणात झालेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे होते. बैठकीत आगामी गुढीपाडवा, रमजान ईद, रामनवमी, महावीर जन्मकल्याणक , हनुमान जयंती तसेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती या सणांच्या पार्श्वभूमीवर चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना ठाणेदार राजेश खेरडे यांनी सण साजरे करताना कायद्याचे व नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. मिरवणुकांमध्ये डीजेचा आवाज नियंत्रणात ठेवावा, अश्लील गाणी वाजवू नयेत तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत माजी प्राध्यापक जिया, माजी सरपंच डॉ. विवेक माने यांनीही मनोगत व्यक्त करत नागरिकांनी एकमेकांच्या सहकार्याने सण उत्सव शांततेत पार पाडावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. पोलिसांनीही नागरिकांना सहकार्य करावे, असे मत मान्यवरांनी मांडले.

अध्यक्षीय भाषणात नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे यांनी सर्व नागरिकांना आगामी सणांच्या शुभेच्छा देत सण उत्साहात व शांततेत साजरे करण्याचे आवाहन केले.

या बैठकीस नगरपंचायत पदाधिकारी, नगरसेवक, विविध संघटनांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन, प्रस्तावना व आभार पोलीस कॉन्स्टेबल विष्णू मुसळे यांनी मानले.

# नि:शुल्क ध्यान व प्राणायाम वर्गाची वाशिममध्ये सुरुवात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील सामाजिक व ध्यान क्षेत्रात कार्यरत असलेल्या पिरॅमिड स्पिरिच्युअल सोसायटी मूव्हमेंट, वाशिम यांच्या वतीने नागरिकांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी निःशुल्क ध्यान व प्राणायाम वर्ग सुरू करण्यात येत आहेत. मंगळवार, दिनांक १७ मार्च २०२६ पासून हे वर्ग नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहेत.

आजच्या धावपळीच्या व तणावपूर्ण जीवनशैलीत मानसिक शांतता, सकारात्मक विचार आणि उत्तम आरोग्य यांची गरज अधिक जाणवत आहे. याच पार्श्वभूमीवर वाशिममधील नागरिकांना ध्यान व प्राणायामाची सवय लागावी तसेच त्यांच्या जीवनात शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक संतुलन निर्माण व्हावे या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

हे वर्ग महिला, पुरुष तसेच विद्यार्थ्यांसाठी खुले असून वाशिम शहरातील सर्व नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

हे वर्ग इंडियन बँकेजवळील पाटणी कमर्शियल कॉम्प्लेक्स, वाशिम येथे, अभियंता रुपेश लढ्ढा यांच्या कार्यालयासमोर आयोजित करण्यात येणार आहेत. वर्गामध्ये ध्यान, श्वसन तंत्र व प्राणायाम यांचे मार्गदर्शन करण्यात येणार असून आरोग्य संवर्धन, तणाव नियंत्रण तसेच नैसर्गिक पद्धतीने शरीर व मन निरोगी ठेवण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

# आजपासून कारंज्यात साईभक्तीचा महासागर उसळणार!

## संगीतमय साईचरित्र कथा ज्ञानयज्ञाने आठवडाभर शहर होणार साईमय

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा (लाड) शहरात येत्या काही दिवसांत भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिक ऊर्जेचा अभूतपूर्व संगम अनुभवायला मिळणार आहे. बालाजी परिवार चॅरिटेबल अँड वेलफेयर ट्रस्ट यांच्या वतीने संचालित श्री साईबाबा वाटिका मंदिर येथे तृतीय वर्धापन दिनानिमित्त २० ते २७ मार्च २०२६ या कालावधीत भव्य संगीतमय श्री साईचरित्र कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने संपूर्ण कारंजा शहर साईभक्तीत रंगून जाणार आहे. शहरात प्रथमच होत असलेल्या या भव्य आध्यात्मिक उपक्रमामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या आठवडाभर चालणाऱ्या महोत्सवात दररोज पहाटेपासून ते मध्यरात्रीपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांची अखंड मालिका सादर होणार आहे. सकाळी काकडा आरतीने दिवसाची सुरुवात होताच मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जाईल. त्यानंतर अभिषेक, आरती, भजन सेवा आणि सामूहिक पारायण यांमधून साईनामाचा अखंड गजर सुरू राहणार आहे. दुपारनंतरही भजन सेवा आणि हरिपाठाच्या माध्यमातून भक्तीचा उत्साह कायम राहणार असून, सायंकाळी धूप आरतीनंतर रंगणारी संगीतमय साईचरित्र कथा हा कार्यक्रम भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे. रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या शेजारतीने दिवसाचा भक्तिमय समारोप होणार आहे.



या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत साईधाम शिर्डी येथील प्रख्यात साईकथाकार ह.भ.प. अरुण महाराज रोहम, जे आपल्या ओजस्वी वाणीमधून श्री साईबाबांच्या जीवनातील प्रसंगांचे रसाळ आणि प्रभावी कथन करणार आहेत. त्यांच्या कथेमुळे उपस्थित भाविकांना श्रद्धा, सबुरी आणि अध्यात्मिक जीवनाचा संदेश मिळणार आहे. याशिवाय, संत परंपरेचा वारसा जपत विविध महिला व पुरुष भजनी मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग या महोत्सवाला लाभणार आहे. संत जनाई हरिपाठ पाऊली महिला मंडळ यांच्या हरिपाठासह अनेक मंडळे दररोज भजन-कीर्तनाच्या माध्यमातून वातावरण अधिकच भक्तिमय करणार आहेत. सौ. जयश्री गाडगे व सौ. पद्मिना वैद्य यांच्या सुरेल गायनाची साथ आणि ह.भ.प. दिपक महाराज मराठे (आळंदी) यांची मृदुंग सेवा या कार्यक्रमांना विशेष उंची देणार आहे. उत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचीही योजना करण्यात आली आहे. सकाळी कलश यात्रा आणि तीर्थस्थापना या कार्यक्रमांतून भक्तीचा शुभारंभ होणार असून, शहरातील विविध भागांतील महिला भजनी मंडळांचा यात सहभाग असणार आहे. दुपारच्या सत्रात भजन सेवा आणि कीर्तनाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच, कुटुंबातील संस्कार जपण्यासाठी आणि पालकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी भव्य मातृ-पितृ पूजन सोहळा आयोजित करण्यात आला आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. महोत्सवाचा उत्कर्षबिंदू ठरणार आहे २६ मार्च रोजी सायंकाळी आयोजित करण्यात आलेली भव्य शोभायात्रा आणि श्री साईंची पालखी. शहरातील प्रमुख मार्गांवरून निघणारी ही पालखी हजारो भाविकांच्या उपस्थितीत पार पडणार असून, साईनामाच्या गजरात संपूर्ण कारंजा भक्तीमय वातावरणाने न्हाऊन निघणार आहे. मंदिरापासून सुरू होणारी ही शोभायात्रा विविध भागातून मार्गक्रमण करत पुन्हा मंदिरात येणार असून, या दरम्यान ठिकठिकाणी भक्तांकडून पालखीचे स्वागत करण्यात येणार आहे. दि. २७ मार्च रोजी सायंकाळी ६ ते १० वाजता या वेळेत संस्थानतर्फे भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ११२ ■ शुक्रवार, २० मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## वेतनवाढीचा प्रश्न ऐरणीवर

# तळेगाव च्या सीडेटमध्ये कामगारांचे ठिय्या आंदोलन पेटले

### -प्रवेश नाकारल्याने तणाव वाढला; कामगारांचा न्यायासाठी लढा

-आश्वासनानंतरही गेट बंद; कामगार पुन्हा आंदोलनात
-कामगार-प्रशासन वाद चिघळला; तोडगा अद्याप प्रलंबित





**वर्धा जनमाध्यम :** तळेगाव (श्या.पंत.) येथील सीडेट कंपनीच्या गेटसमोर सध्या केवळ आंदोलन सुरू नाही, तर कामगारांच्या अंतःकरणात साचलेल्या वेदना, अपमान आणि अन्यायाचा जणू ज्वालामुखीच उसळला आहे, आमच्या घामाला किंमत नाही का? असा प्रश्न उपस्थित करत कामगारांनी कंपनी प्रशासनाच्या अडेलतट्टूपणाविरुद्ध उघड बंड पुकारले आहे. चार दिवसांपासून सुरू असलेले ठिय्या आंदोलन आता अधिक आक्रमक व निर्णायक टप्प्यात पोहोचले आहे.

वेतनवाढ, कामाच्या अटी सुधारणा आणि मूलभूत हक्कांसाठी ११ फेब्रुवारी रोजी माजी राज्यमंत्री बच्चु कडू यांच्या माध्यमातून कंपनी प्रशासनाला निवेदन देण्यात आले. मात्र, त्या मागण्यांकडे कंपनीने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप कामगारांनी केला आहे. आम्ही दिवस-रात्र कष्ट करतो, पण आमच्या आयुष्याची किंमत शून्य? अशी वेदना प्रत्येक कामगाराच्या शब्दांतून व्यक्त होत आहे. १४ मार्च रोजी या अन्यायाची परिसीमा गाठली, जेव्हा पुरुष कामगारांना सेकंड शिफ्टमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. यामुळे संतापलेल्या महिला व पुरुष कामगारांनी एकत्र येत कंपनी गेटवर ठिय्या आंदोलन सुरू केले. आमचा घाम वाहतो, उत्पादन वाढतं; पण आमचं पोट उपाशीच का? अशा जळजळीत प्रश्नांनी परिसर दणाणून गेला.

दोन दिवसांच्या आंदोलनानंतर चार महिला कामगारांची प्रकृती खालावली, त्यांना रुग्णालयात दाखल करावे लागले. तरीही कंपनी प्रशासनाचे हृदय वितळले नाही, असा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. त्यानंतर प्रहार संघटनेचे जय बेलखडे यांच्या नेतृत्वात आणि ठाणेदार मंगेश भोयर यांच्या मध्यस्थीने तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला. कामावर या, प्रश्न सोडवू असे आश्वासन मिळाल्याने कामगारांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. १६ मार्च रोजी कामगार पुन्हा कामावर हजर झाले असता कंपनीच्या प्रवेशद्वारालाच टाळे ठोकण्यात आले, ही फसवणूक नाही तर काय? असा प्रश्न करत कामगार पुन्हा आक्रमक झाले. त्याच दिवशी नागपूर येथे कामगार आयुक्तांच्या दालनात बैठक झाली, पण तिथेही कोणताही ठोस तोडगा निघाला नाही.

आज परिस्थिती अशी आहे की, सीडेटच्या गेटसमोर न्याय मिळाल्याशिवाय हटणार नाही, या निर्धाराने कामगार ठिय्यावर ठाम बसले आहेत. आमच्या पोटावर पाय देऊन उद्योग चालणार नाही. आम्ही कामगार आहोत, गुलाम नाही. असा इशारा त्यांनी कंपनी प्रशासनाला दिला आहे.

दरम्यान, तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेता पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. मात्र, कामगारांच्या डोळ्यांत आता भीती नाही, तर जिद्द आणि संतापाची ज्वाला आहे.

सीडेटच्या गेटवर पेटलेली ही लढाई आता केवळ वेतनासाठी नाही, तर स्वाभिमानासाठी आहे, आणि हा स्वाभिमान मिळेपर्यंत हा एल्गार थांबणार नाही अशी हाक कंपनीतील कामगारांनी केली आहे,

# सुरेल 'पाडवा पहाट'ने उजळली वर्ध्याची नववर्षाची सकाळ

### -'पाडवा पहाट'चा सुरेल सोहळा; भक्ती, भावना आणि संस्कृतीचा ओलावा

**वर्धा जनमाध्यम :** पहाट अजून डोळे चोळत होतीष्ठ आकाशाच्या कडेवर हलकीशी लालिमा दाटत होतीष्ठ आणि त्या नाजूक क्षणी वर्धा नगरी सुरांच्या साजात अलगद जागी झाली, गुढीपाडव्याच्या पवित्र निमित्ताने श्रीराम मंदिर व श्रीराम शोभायात्रा समितीच्या वतीने सोशालिस्ट चौकात रंगलेल्या 'पाडवा पहाट'ने शहराला नववर्षाची एक अविस्मरणीय, भावस्पर्शी भेट दिली,



पहाटे ५.३० वाजता 'मोरया... मोरया... गणपती बाप्पा मोरया...' या जयघोषाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वातावरणात भक्तिभाव दरवळत असताना पुण्याचे गायक चैतन्य कुलकर्णी आणि मुंबईच्या गायिका आनंदी जोशी यांनी आपल्या सुमधुर आवाजाने कार्यक्रमाला उंची दिली.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात आनंदी जोशी यांनी 'श्रीरामचंद्र कृपा रहे...', 'पायोजी मैने राम रतन धन पायो', 'मोगरा फुलला' यांसारख्या अभंग-भजनांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर चैतन्य कुलकर्णी यांनी 'काळ देहाशी आला काहो... आणि नाथाघरी नाचे माझा पांडुरंग... या अभंगांनी टाळ्यांची दाद मिळवली.

शंखनाद आणि फुलांची उधळण करत नववर्षाचे स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते कलाकारांचा सत्कार झाल्यानंतर दुसऱ्या सत्राला सुरुवात झाली. या सत्रात खेळ मांडीयेला... , हरी हरी जागा झाला... , विठ्ठला तू वेडा... , देव देव्हाऱ्यात नाही... अशा अभंगांनी वातावरण भक्तिमय झाले. चैतन्य कुलकर्णी यांनी कानडा राजा पंढरीचा... तसेच स्वामी समर्थांच्या रचनांद्वारे सादरीकरण केले. आनंदी जोशी यांनी कशी मी जाऊ मथुरेच्या बाजारी... या गवळणीने कार्यक्रमात वेगळा रंग भरला. मराठी व हिंदी गाण्यांचीही मेजवानी रसिकांना लाभली. कार्यक्रमाचे निवेदन आसावरी देशपांडे यांनी केले तर आभार राजेंद्र उमाटे यांनी मानले.

#### दमादम मस्त कलंदर'वर दाद

कार्यक्रमात मधुबन मे राधिका नाचे रे... आणि शूर आम्ही सरदार... या गाण्यांनी उत्साह वाढवला. दमादम मस्त कलंदर...आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयोस्तु ते... या गीतांनी कार्यक्रमाची सांगता झाली. साथसंगत करणाऱ्या कलाकारांनीही उत्कृष्ट साथ देत कार्यक्रम रंगतदार केला.

#### मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला माजी खासदार दत्ता मेघे, खासदार अमर काळे, माजी खासदार सुरेश वाघमारे, नगराध्यक्ष सुधीर पांगुळे, शंकरप्रसाद अग्निहोत्री यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याकरीता मुदतवाढ

**मुंबई जनमाध्यम :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. प्रवेशिका मागविण्याचा अंतिम दिनांक १५ मार्च असा होता. आता प्रवेशिका मागविण्याकरीता दि. ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून आणि मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील स्पर्धकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. तसेच अर्जाचे नमुने https://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

# गॅस माफियांवर तहसीलचा धडाका : १६ घरगुती सिलेंडर जप्त

### -स्वस्त सिलेंडरचा काळाबाजार उघडकीस -कारवाईने अवैध वापरकर्त्यांचे धाबे दणाणले'

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील व्यावसायिक आस्थापनांमध्ये स्वस्त दरातील घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास गैरवापर होत असल्याच्या पार्श्वभूमीवर तहसील प्रशासनाने गुरुवारी धडाकेबाज कारवाई करत १६ घरगुती सिलेंडर जप्त केले. या कारवाईने अवैध गॅस वापरकर्त्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, गॅस माफियांना प्रशासनाने थेट इशारा दिला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे तहसीलदार संदीप फुंडेकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली होती. शहरातील काही हॉटेल्स व व्यावसायिक केंद्रांमध्ये घरगुती (डोमेस्टिक) गॅस सिलेंडरचा वापर व्यावसायिक कारणांसाठी होत असल्याच्या तक्रारी मिळाल्या होत्या. त्यानुसार पथकाने अचानक धाड टाकत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना रंगेहाथ पकडले.



विशेष म्हणजे, केवळ बुधवारीच १२ सिलिंडर जप्त करण्यात आल्याने प्रशासनाच्या कारवाईची तीव्रता अधोरेखित झाली आहे. शहरातील हवालदारपुरा परिसरातील चौधरी भोजनालय येथून ४, पुरणपोळी हॉटेल येथून १ सिलिंडर जप्त करण्यात आला. तसेच सेवाग्राम परिसरातील काही व्यावसायिकांकडून घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर होत असल्याचे उघड झाल्यानंतर उर्वरित सिलिंडर ताब्यात घेण्यात आले.

या संयुक्त कारवाईत नायब तहसीलदार डाबेराव आणि पुरवठा निरीक्षक मनीषा माजरखेडे यांचाही सहभाग होता. विविध ठिकाणी छापे टाकून एकूण १६ सिलेंडर जप्त करण्यात आले. प्रशासनाने स्पष्ट केले की, असा अवैध वापर केवळ शासनाचा महसूल बुडवणारा नसून नागरिकांच्या सुरक्षेलाही गंभीर धोका निर्माण करणारा आहे.

सध्या जप्त सिलेंडर पुरवठा विभागाच्या ताब्यात देण्यात आले असून संबंधित दोषींवर जीवनावश्यक वस्तू कायद्यांतर्गत कारवाईची प्रक्रिया सुरू आहे. या धडक कारवाईमुळे वर्ध्यातील अवैध गॅस विक्रेते आणि व्यावसायिक वापरकर्त्यांचे धाबे दणाणले असून, प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर हा कायद्याने गुन्हा आहे. यापुढेही अशा कारवाया सुरूच राहतील. नियम मोडणाऱ्यांवर कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल.
>
> **संदीप फुंडेकर, तहसीलदार, वर्धा**

# सण उत्सव काळात स्वच्छता व रस्ते अतिक्रमणमुक्त ठेवावे-जिल्हाधिकारी वान्मथी सी

### -सण उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन



**वर्धा जनमाध्यम :** येत्या दोन महिन्याच्या काळात जिल्ह्यात विविध समाजाच्यावतीने सण, उत्सव साजरे करण्यात येणार आहे. सोबतच रॅलीचेही आयोजन करण्यात येणार आहे. त्यामुळे उत्सवादरम्यान व मंडळांच्या रॅलीमध्ये कोणतेही व्यत्यय येऊ नये व शांतेत उत्सव पार पाडण्यासाठी उत्सवाच्या ठिकाणी व प्रमुख रस्त्याचे मार्ग अतिक्रमुक्त ठेवावे व संबंधित परिसरात स्वच्छता ठेवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी दिल्या.

येत्या दोन महिन्याच्या काळात जिल्ह्यात रामनवमी, रमजान ईद, गुडीपाडवा, झुलेलाल जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असे उत्सव, जयंती साजरे करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी आज जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा स्तरीय शांतता समितीच्या बैठक घेण्यात आली. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, निवासी उपजिल्हाधिकारी संजीव जाधवर, अतिरिक्त पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आदी उपस्थित होते.

उत्सवादरम्यान अतिक्रमामुळे आयोजित रॅलीला कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी नगरपालिकांनी मुख्य मार्ग तसेच मुख्य चौकातील अतिक्रमणे काढण्याची मोहिम राबवावी. पोलिस, वाहतुक विभागांने पार्कीगची सुविधा उपलब्ध करुन द्यावी. विद्युत विभागाने सणउत्सव काळात विज पुरवठा खंडीत होणार नाही, याची दक्षता घ्यावी. उत्सव साजरा करणाऱ्या आयोजकांनी सुध्दा शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी रॅलीमध्ये उपद्रवी व्यक्ती सहभाग घेणार नाही याची दक्षता घ्यावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

डीजेच्या अतिआवाजामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित झाला. डीजेच्या आवाजाची तीव्रता जास्त होत असल्यास डीजे वापराची परवाणगी घेणाऱ्या संचालकांवर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी पोलिस विभागाला दिली.

सण उत्सव काळात शहरामधून जडवाहतुक होणार नाही याचे नियोजन वाहतुक पोलिसांनी करावे. तालुका स्तरावरील शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करुन आयोजकांशी समन्वय साधावा. अपुऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांमुळे सुरक्षेवर ताण पडत आहे. नुकतीच १४२ पोलिस कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रीया झाली असून निवड झालेले पोलिस रुजु झाल्यास त्यांची सेवा घेण्यात येईल, असे सौरभ अग्रवाल यांनी सांगितले. सण उत्सवासाठी आयोजकांनी पोलिस विभागाला सहकार्य करावे, असेही ते पुढे बोलतांना म्हणाले. प्रास्ताविक अप्पर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांनी केले. सभेला तालुक्यातील शांतता समितीचे अध्यक्ष, सदस्य, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## पिपरी (मेघे)त नववर्षाची सुरुवात 'पुस्तकांच्या गुढी'ने

### -सोशल मिडियापासून हरवलेल्या पिढीस वाचनाकडे आकर्षित करण्याचा उपक्रम

**पिपरी (मेघे), वर्धा जनमाध्यम :** गुढीपाडव्याच्या पारंपरिक उत्साहासोबत वाचन संस्कृती जपण्याचा अनोखा उपक्रम येथे उभारण्यात आला. सोशल मिडियाच्या वाढत्या प्रभावामुळे पिढी वाचनापासून दूर जात असल्याची चिंता लक्षात घेऊन, पुस्तकांची गुढी उभारून नववर्षाची सुरुवात ज्ञान व संस्कृतीच्या मार्गावर करण्याचा संदेश देण्यात आला.



हा उपक्रम गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने राबविला जात असून, यामध्ये गुढीपुजनाबरोबर ग्रंथपूजन करून नववर्षाची पारंपरिक आणि ज्ञानवर्धक सुरुवात केली जाते.

उपक्रमाचे सूत्रसंचालन राहुल विनोदराव राऊत यांच्या पुढाकारातून झाले. त्यांच्या पत्नी गौरी रा. राऊत आणि मुलगी राघवी रा. राऊत यांनीही या मोहिमेत सक्रीय सहभाग घेतला. उपस्थितांमध्ये त्यांनी वाचनानेच माणूस घडतो असा संदेश पोहचवला.

# महामार्गावर इथेनॉल टँकर उलटला; मोठा अनर्थ टळला

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील राष्ट्रीय महामार्गावर बुधवारी इथेनॉलने भरलेला टँकर अनियंत्रित होऊन उलटल्याची घटना घडली. या अपघातामुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. वडनेर पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली.



टँकरमधून इथेनॉलची गळती सुरू झाल्याने आग लागण्याचा धोका निर्माण झाला होता.

इथेनॉल हा अतिज्वलनशील पदार्थ असल्याने परिस्थिती गंभीर बनली होती. सुरक्षेच्या कारणास्तव काही काळ महामार्गावरील वाहतूकही विस्कळीत झाली.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार श्याम पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन विभागाच्या जवानांना बंबासह पाचारण करण्यात आले. क्रेनच्या साहाय्याने टँकर सुरक्षितरित्या रस्त्याच्या कडेला करण्यात आला.

या कामात सुनील डोळस, पंकज ताळवेकर, वैभव येलगंदेवार, अमित सहारे, ओम लडी यांच्यासह पोलिस व स्थानिक नागरिकांचे सहकार्य लाभले. वेळीच उपाययोजना करण्यात आल्याने संभाव्य मोठा अनर्थ टळला.

# विद्यार्थिनींशी घृणास्पद वर्तन; 'गुरु'च्या नावाला काळिमा

### -पाच विद्यार्थिनींचा धाडसी आवाज; तक्रार पेटीतून फुटला संताप!

**-शाळा हादरली, पालक संतप्त; आरोपी शिक्षकावर गुन्हा दाखल!**

**वर्धा जनमाध्यम :** शिक्षणाच्या मंदिरातच चिमुकल्या विद्यार्थिनींच्या निरागसतेचा सौदा करणारा संतापजनक प्रकार हिंगणघाट तालुक्यात उघडकीस आला आहे. ज्ञान देणाऱ्या 'गुरू'च्या रूपात लपलेल्या विकृत मनोवृत्तीच्या शिक्षकाने विद्यार्थिनींशी 'बॅड टच'सारखे घृणास्पद कृत्य केल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

एका जिल्हा परिषद शाळेत घडलेल्या या प्रकारात चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीसह आणखी चार मुलींनाही आरोपी शिक्षक दीपक याने आपल्या विकृत वर्तनाचा बळी बनवल्याचे समोर आले आहे. शिक्षणाच्या बहाण्याने जवळ बोलावून वारंवार अश्लील स्पर्श केला जात असल्याने विद्यार्थिनी भीतीच्या छायेत जगत होत्या. फेब्रुवारीपासून सुरू असलेला हा प्रकार अखेर असह्य ठरला.

मात्र या चिमुकल्यांनी धाडस दाखवत शाळेतील तक्रार पेटीत लेखी तक्रार केली. त्या तक्रारीत 'बॅड टच'चा स्पष्ट उल्लेख होताच शाळा प्रशासन हादरले. मुख्याध्यापकांनी तातडीने बैठक बोलावून चौकशी सुरू केली. विद्यार्थिनींच्या जबाबातून प्रकाराची गंभीरता अधोरेखित झाली.

यानंतर पालकांसह अल्लीपूर पोलिस ठाण्यात धाव घेण्यात आली. त्यांच्या तक्रारीवरून १८ मार्च रोजी सायंकाळी आरोपी शिक्षकाविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

या घटनेने 'गुरू-शिष्य' नात्यालाच काळिमा फासला असून संतप्त पालक व नागरिकांकडून आरोपीवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.


#### नावात बदल

माझे पूर्वी **SHAIKH HAMID SHAIKH CHOTOO** असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व बँक पासबुक वरील **SHEIKH HAMID SHEIKH CHHOTU** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- आंबेडकर गार्डन जवळ,इस्लाम पुरा वर्धा ४४२००१

# गुढीपाडव्याचा राज्यभर जल्लोष

## शोभायात्रांचा उत्सव, भगवामय वातावरण; मुंबई-ठाणे-नागपूरसह राज्यभर नववर्षाचा उत्साह



**मुंबई/प्रतिनिधी :**
राज्यात मराठी नववर्षाचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा होत असून गुढीपाडव्याच्या निमित्ताने सर्वत्र आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. मुंबई, ठाणे, नागपूरसह अनेक शहरांमध्ये भव्य शोभायात्रांचे आयोजन करण्यात आले आहे.नागपूरमध्ये आयोजित शोभायात्रेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थिती लावली. या ठिकाणी सामूहिक रामरक्षा पठण करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी गुढीपाडवा हा आपल्या संस्कृतीचा महत्त्वाचा सण असल्याचे सांगत नव्या वर्षात सकारात्मक संकल्प घेउन पुढे जाण्याचे आवाहन केले. तसेच देशाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्तकेली. पारंपरिक पोशाखात सहभागी झालेल्या नागरिकांमुळे नागपूरमध्ये भगवामय वातावरण निर्माण झाले होते.

**ठाण्यातील शोभायात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

दरम्यान, ठाण्यातील शोभायात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेतला. कोपीनोर मंदिरातून पालखी सोहळ्याची सुरु वात झाली असून यात आमदार संजय केळकर, निरंजन डावखरे आणि खासदार नरेश मस्के यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. ठाण्यातील रस्त्यांवर मोठ्या संख्येने नागरिकांनी गर्दी केली होती. पारंपरिक ढोल-ताशांच्या तालावर आणि लेझीमच्या नादात शोभायात्रा रंगतदार झाली.

**डोंबिवलीत स्वागत यात्रा-**
डोंबिवलीत गुढीपाडव्याच्या स्वागत यात्रेत आधुनिकतेची झलक पाहायला मिळाली. महिला रायडर्स आणि सायकलस्वारांनी पारंपरिक वेशात सहभागी होत मोटरसायकलवर गुढी उभारत अनोख्या पद्धतीने सण साजरा केला. नव्या पिढीकडून परंपरेचे जतन करण्याचा हा अनोखा प्रयत्न असल्याचे चित्र दिसून आले. महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

**तुळजाभवानी मंदिरात गुढी**

दरम्यान, तुळजाभवानी मंदिर येथेही गुढीपाडवा मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. पहाटे आरती करू न मंदिराच्या शिखरावर विधीवत गुढी उभारण्यात आली. मुख्य पुजारी महंत तुकोजी बुवा आणि वाकोजी बुवा यांच्या उपस्थितीत देवीची विशेष पूजा करण्यात आली. तसेच विठ्ठल रु क्मिणी मंदिर येथे आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या या दिवसानिमित्त भाविकांनी मंदिरात मोठी गर्दी केली, ज्यामुळे संपूर्ण राज्यात सणाचा उत्साह अधिकच वाढला.

**रत्नागिरीत गुढीपाडव्याचा जल्लोष; भव्य शोभायात्रांनी शहरात उत्साह**

हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी रत्नागिरीत गुढीपाडव्याचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी सकाळपासून शोभायात्रा काढण्यात येत असून जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानची भव्य शोभायात्रा विशेष आकर्षण ठरली. मारु ती मंदिर ते राम मंदिर या मार्गावर निघालेल्या या शोभायात्रेत मांगल्याचे प्रतीक असलेल्या गुढ्या घेउन महिला सहभागी झाल्या होत्या. सुहासिनींनी पारंपरिक वेशभूषेत नटूनथटून उपस्थिती लावल्याने वातावरण अधिकच मंगलमय झाले. एकूणच कोकणात गुढीपाडव्याचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत असून पारंपरिक पद्धतीने नव वर्षाचे स्वागत करण्यात येत आहे.

# जल जीवन मिशन 2.0 साठी केंद्र व महाराष्ट्र शासनात सामंजस्य करार

## मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत वरिष्ठ अधिका-यांच्या करारावर स्वाक्ष-या



**नागपूर/प्रतिनिधी-** राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीचे डिसेंबर २०२८ पर्यंत हर घर जल प्रमाणीकरण साध्य करणे तसेच पाणी पुरवठा योजनांचे सक्षम संचलन आणि देखभाल सुनिश्चित करण्याची प्रमुख उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेउन केंद्र सरकारचे जलशक्ती मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्यात गुरु वारी नवी दिल्ली येथे सामंजस्य करार पार पडला.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे नागपुरातून दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. केंद्रीय मंत्रिमंडळाने अलिकडेच जल जीवन मिशन कार्यक्रमास डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली असून या नवीन टप्प्याला जल जीवन मिशन-२.० असे संबोधण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने राज्यांनी संरचनात्मक सुधारणा, कालमर्यादेचे पालन, योजनांची शाश्वतता आणि नागरीक-केंद्रित सेवांचे वितरण सुनिश्चित करण्यासाठी हा सामंजस्य करार पार पडला.

या करारात काही प्रमुख उद्दिष्टे ठेवण्यात आली आहेत. त्यात प्रामुख्याने जल जीवन मिशन अंतर्गतच्या कामांची प्रभावी अंमलबजावणी आणि देखरेख करणे, ग्रामीण भागातील नळ पाणी पुरवठा पायाभूत सुविधा पूर्ण करू न त्या ग्राम पंचायतींकडे हस्तांतरित करणे तसेच डिसेंबर २०२८ पर्यंत राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायतीने हर घर जल प्रमाणीकरण साध्य करणे या मुद्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. याशिवाय पाणी पुरवठा योजनांचे सक्षम संचालन आणि देखभाल सुनिश्चित करण्यासह जिल्हा व राज्यस्तरावर संरचनात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी पेयजल शाश्वतता आराखडा स्वीकारणे या उद्दिष्टांचाही समावेश या सामंजस्य करारात आहे.

याप्रसंगी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील, पेयजल आणि स्वच्छता विभागाचे सचिव अशोक मीना, केंद्रीय जल जीवन मिशनचे संचालक व अतिरिक्त सचिव कमल किशोर सोन, सह सचिव (जल) स्वाती मीना नाईक, संचालक प्रदीप सिंह यांच्यासह नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राच्या निवासी आयुक्त आर. विमला यांच्यासह प्रमुख वरिष्ठ अधिका-यांची उपस्थिती होती.

# शुद्धलेखनाच्या नावाखाली दीड लाख शेतक-यांचे सातबारा उतारे बदलले

**मुंबई / प्रतिनिधी**
महाराष्ट्र राज्याच्या महसूल विभागात खळबळ उडवून देणारा एक मोठा गैरप्रकार समोर आला आहे. जमिनीचा सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज असलेल्या ७/१२ (सातबारा) उता-यात फेरफार करू न तब्बल एक ते दीड लाख शेतक-यांची फसवणूक झाल्याची धक्कादायक कबुली खुद्द सरकारने दिली. महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १५५ चा चुकीचा अर्थ लावून महसूल अधिका-यांनी हे बेकायदेशीर आदेश पारित केल्याचे उघड झाले आहे. जमीन महसूल कायद्यातील कलम १५५ चा वापर प्रामुख्याने ७/१२ उता-यावरील लेखनदोष किंवा शुद्धलेखनातील चुका दुरु स्त करण्यासाठी केला जातो. मात्र, पुणे जिल्ह्यात काही महसूल अधिका-यांनी या कलमाचा गैरवापर करू न जमिनीच्या मालकी हक्कांतच परस्पर बदल केले. जुलै-ऑगस्ट २०२५ दरम्यान हा प्रकार उघडकीस आला. आमदार अनिल परब यांनी या गंभीर विषयाकडे लक्ष वेधल्यानंतर महसूल विभागात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमण्यात आली होती.विभागीय आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालात



महसूल प्रशासनातील भोंगळ कारभाराचे वाभाडे काढण्यात आले. अनेक प्रकरणांत मूळ मालकाची संमती नसतानाही ७/१२ मध्ये बदल करण्यात आले. आमदार अनिल परब यांनी या घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार आणि सहभागी अधिका-यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली. सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार आता या घोटाळ्यातील दोषी तहसीलदारांपासून ते वरिष्ठ अधिका-यांपर्यंत कोणावर कारवाई होणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. अधिवेशन संपायच्या आत दोषींवर कारवाई करू , असे आश्वासन मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात दिले.

नियमबा पद्धतीने बेकायदेशीर आदेश पारित करू न खाजगी हितसंबंध जपले गेले. जमिनी बिगरशेती करताना आणि मालकी हस्तांतरित करताना गंभीर अनियमितता आढळली. त्यामुळे खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे राज्य सरकारने याची जाहीर कबुली दिली आहे.

**मोठ्या चुकीची विधान, परिषदेत दिली कबुली**

या प्रकरणावर विधान परिषदेत वादळी चर्चा झाली. यावेळी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासकीय स्तरावर झालेल्या या मोठ्या चुकीची कबुली दिली. शुद्धलेखनात बदल करण्याच्या नावाखाली सातबारा बदलले गेले, ही बाब गंभीर आहे. महसूल खात्याच्या इतिहासातील हा आतापर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा असू शकतो, असे विधान त्यांनी सभागृहात केले.

# सेंट्रल को-ऑपरेटिव बँकेत 1.77 कोटींचा घोटाळा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**जम्मू सेंट्रल को-ऑपरेटिव बँकेत मोठ्या आर्थिक घोटाळ्याचा प्रकार समोर आला असून, मुख्य कार्यालयातील काही कर्मचा-यांवर विविध शाखांतील खातेदारांच्या खात्यांतून सुमारे १.७७ कोटी रु पये अपहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.प्राथमिक चौकशीत असे समोर आले आहे की, संबंधित कर्मचा-यांनी डिजिटल व्यवहारांच्या माध्यमातून ही रक्कम बेकायदेशीररीत्या काढली. हा प्रकार उघड होताच बँक व्यवस्थापनाने तातडीने कारवाई करत तीन कर्मचा-यांना निलंबित केले आहे.या प्रकरणी बँकेने अधिकृत तक्रार नोंदवून हा तपास जम्मू क्राइम ब्रांचकडे सोपवला आहे. सध्या या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू असून, तपास यंत्रणांच्या मते अपहाराची रक्कम आणखी वाढण्याची शक्यता आहे.माहितीनुसार, आरोपींनी वेगवेगळ्या शाखांतील खात्यांना लक्ष्य करून नियोजनबद्ध पद्धतीने हा गैरप्रकार केला. बँक व्यवस्थापनाने खातेदारांना दिलासा देत निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले आहे.

# इराण-कतार तणावाचा थेट फटका भारताला; वीज उत्पादन धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मध्य पूर्वात भडकलेल्या युद्धाची झळ आता भारताच्या स्वयंपाकघरांपासून ते कारखान्यांपर्यंत पोहोचली आहे. इराणने कतारमधील रास लफान येथे असलेल्या जगातील सर्वात मोठ्या गॅस प्रकल्पावर केलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे भारताच्या उर्जा सुरक्षेला मोठा धक्का बसला आहे. या हल्ल्यानंतर कतारमधून होणारा गॅस पुरवठा पूर्णपणे ठप्प झाला असून भारतात इंधन संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, हा पुरवठा लवकर पूर्ववत झाला नाही तर देशातील अनेक भागांमध्ये वीज कपात आणि औद्योगिक उत्पादन ठप्प होण्याची परिस्थिती निर्माण होउ शकते.



भारत आपल्या नैसर्गिक वायू (एलएनजी) गरजांसाठी मोठ्या प्रमाणावर कतारवर अवलंबून आहे. ताज्या आकडेवारीनुसार, या हल्ल्यामुळे भारताच्या एकूण गॅस आयातीपैकी सुमारे २० टक्के पुरवठा थेट प्रभावित झाला आहे. तांत्रिक भाषेत सांगायचे झाल्यास, दररोज होणारा ४७.४ एमएमएससीएमडी (मिलियन मेट्रिक स्टँडर्ड क्यूबिक मीटर प्रति दिवस) गॅस पुरवठा अचानक बंद झाला आहे. रास लफान प्रकल्प हा कतारचा मुख्य निर्यात केंद्र असून तो बंद पडल्याने भारताकडे येणा-या गॅस जहाजांचा मार्ग सध्या थांबला आहे.

गॅसच्या या तीव्र तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने खबरदारीची पावले उचलण्यास सुरु वात केली आहे. गॅस टंचाईचा सर्वात मोठा आणि तात्काळ परिणाम वीज निर्मिती आणि खत कारखान्यांवर होण्याची शक्यता आहे. घरगुती वापरासाठीचा पाइप्ड नॅचरल गॅस (पीएनजी) आणि वाहनांसाठीचा क?म्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी) वाचवण्यासाठी उद्योगांना दिल्या जाणा-या गॅस पुरवठ्यात कपात केली जाउ शकते, असे संकेत सरकारकडून देण्यात आले आहेत. त्यामुळे कारखान्यांचा उत्पादन खर्च वाढण्याची आणि उत्पादनावर नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. इराण आणि कतारमधील वाढत्या तणावामुळे समुद्री मार्गही असुरक्षित बनले आहेत. होर्मुज सामुद्रधुनीत युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने जहाजांच्या हालचालींवर उच्च सतर्कता ठेवण्यात आली आहे. भारतातील सरकारी उर्जा कंपन्या आता पर्यायी मार्ग आणि अमेरिका तसेच ऑस्ट्रेलिया यांसारख्या देशांकडून तातडीने गॅस खरेदी करण्याचे प्रयत्न करत आहेत, जेणेकरू न देशाला संभाव्य उर्जा संकटापासून वाचवता येईल.

# कर्जमाफीवरू न शेतक-यांकडून सरकारचा निषेध, जप्तीचे नोटिसा बुडवल्या रामकुंडात

**नाशिक/प्रतिनिधी**-गुढी नवीन वर्षाची परंतु शेतक-यांच्या मागील अनेक वर्षाच्या बँकांच्या कर्जाच्या दुःखाची साजरी करू न बँकांनी पाठविलेल्या नोटिसा या नाशिक शहरातील रामकुंड या ठिकाणी पाण्यामध्ये बुडवून सरकारचा निषेध व्यक्त केला आहे सरकारने शेतक-याला दोन लाखाची कर्जमुक्ती देउन शेतक-यांच्या दु?खावरती मीठच नाही तर मिरची सोडली आहे अशी परिस्थिती आज तरी शेतक-यांसमोर दिसत आहे ! सरकारने शेतक-याला पात्र व अपात्र असा निकष लावून दोन लाख रु पये जाहीर केले परंतु यामागे सरकारने फक्त बँका वाचवल्या असल्याचे अध्यक्ष यांनी सांगितले. बँकांनी शेतक-यांच्या जमिनी जप्तीच्या आणि लिलावाच्या कारवाया करू न शेतक-यांचे मानसिक स्वास्थ्य खराब केले आहे. या विरोधात गेल्या १०२२ दिवसापासून शेतकरी कर्जमुक्ती आंदोलन सुरू आहे. तरी सरकार अजून दखल घेत नाही आंदोलनाच्या माध्यमातून शेतकरी कर्जमुक्ती समन्वय समितीच्या वतीने प्रथम बँकांनी पाठवलेल्या कर्जाच्या नोटिसा रामकुंडात बुडवून निषेध करण्यात आला त्यानंतर आमदारांच्या दारापुढे जाउन ढोल ताशा वाजवून निषेध करण्यात आला शेतकरी आंदोलन स्थळावर सरकारच्या विरोधात बोंबाबोंब आंदोलन केले. त्यानंतर सरकारने आम्हाला गाजर दाखवले म्हणून आम्ही सरकारच्या विरोधात गाजर आंदोलन देखील केले तरी सरकार अजून दखल घेत नाही रामाचे नाव घेउन सरकार सत्तेवर आले याच राम राज्याच्या काळामध्ये गुढीची प्रथा चालू झाली आम्ही आज आंदोलन स्थळावर नवीन वर्षाच्या निमित्ताने गुढी उभारू न शेतक-यांची कैफियत सरकार पुढे दुःखाची गुढी उभारू न मांडत आहोत तरी या सरकारने लवकरात लवकर शेतक-याला कर्जातून मुक्त करावे व शेतक-यांना न्याय द्यावा अन्यथा लवकरच सरकारला या गोष्टीचे स्मरण व्हावे म्हणून ५६ हजार शेतकरी आणि समितीचे सदस्य सरकारचा निषेध म्हणून डोक्यात काळी टोपी घालून निषेध करतील अशी माहिती समिती अध्यक्ष भगवान बोराडे ९३८ आदिवासी विकास संस्था समिती अध्यक्ष कैलास बोरसे समिती सदस्य दिलीप पाटील स्वाभिमान भारत पक्ष अध्यक्ष मोती नाना पाटील समिती सदस्य खेमराज कोर यांनी दिली याप्रसंगी सुनील पवार आणि गवई उपस्थित होते.

# पंतप्रधानांच्या नेतृत्वात भारताची गुढी उंचच उंच जात राहो -मुख्यमंत्री



**नागपूर/प्रतिनिधी-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारताची गुढी उंच्च उंच्च जात राहो, अशा शुभेच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरु वारी गुढीपाडवा मराठी नववर्ष दिनाच्या कार्यक्रमात सहभागी होताना दिल्यात.

श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट आणि नववर्ष अभिनंदन समारोह समितीच्या वतीने नागपुरात लक्ष्मीनगर चौकात नववर्षदिनाच्या निमित्ताने शोभायात्रा आणि रामरक्षा पठण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुप्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकर या याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.तात्या टोपे नगरातील श्री गणेश मंदिरापासून या शोभायात्रेला सुरु वात झाली. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अभिनेत्री सई ताम्हणकर, ट्रस्टचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी आणि इतर मान्यवरांसह महिलांचे ढोलपथक, रामायणातील पात्रांच्या वेशभुषा केलेले कलाकार तसेच मोठ्या संख्येने परिसरातील नागरिक सहभागी झाले होते. याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रत्येक हिंदू आणि मराठी माणसासाठी हा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. आजपासून आपण सारे आपल्या नूतन संकल्पांची सुरु वात करतो आणि आपल्या जीवनाला सामोरे जातो. ही गुढी भारताची गुढी असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात ही गुढी उंच्च उंच्च जात राहो, अशा शुभेच्छा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्यात. याप्रसंगी सामुहिक रामरक्षा पठण तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते गुढीचे पूजन करण्यात आले. तत्पूर्वी, अभिनेत्री सई ताम्हणकर यांनी सर्वांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष संदीप जोशी यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

# ईदच्या पार्श्वभूमीवर तात्पुरता संघर्ष विराम

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था-**पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाला काही दिवसांसाठी स्थगिती देण्यात आली आहे. अधिका-यांनी सांगितले की, या आठवड्यात येणा-या ईद-उल-फितर (ईद) च्या पार्श्वभूमीवर शत्रु त्वाला तात्पुरता विराम देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या प्राणघातक हिंसाचारानंतर ईदच्या सणामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.पाकिस्तानचे माहिती मंत्री अताउल्लाह तारड यांनी बुधवारी सांगितले, हा विराम गुरु वार, १९ मार्चच्या मध्यरात्रीपासून (१९:०० ग्रच्, बुधवार) ते मंगळवार, २४ मार्चच्या मध्यरात्रीपर्यंत (१९:०० ग्रच्, सोमवार) लागू राहील. पाकिस्तानच्या माहिती मंत्र्यांनी पुढे सांगितले की, सौदी अरेबिया, कतार आणि तुर्की यांच्या विनंतीवरू न हा निर्णय घेण्यात आला आहे. तारड यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत म्हटले, पाकिस्तान हा निर्णय सद्भावनेच्या भावनेतून आणि इस्लामी तत्त्वांनुसार घेत आहे. मात्र, त्यांनी इशाराही दिला की, जर सीमापार हल्ला झाला, ड्रोन हल्ला झाला किंवा पाकिस्तानमध्ये कोणतीही दहशतवादी घटना घडली, तर कारवाई अधिक वेगाने तात्काळ पुन्हा सुरू केली जाईल.पाकिस्तानने ही घोषणा



केल्यानंतर काही वेळातच अफगाणिस्तानातील तालिबान सरकारच्या एका प्रवक्त्यानेही पाकिस्तानविरोधातील लष्करी कारवाया तात्पुरत्या थांबवण्याची घोषणा केली.

काही दिवसांपूर्वी अफगाणिस्तानने पाकिस्तानवर आरोप केला होता की पाकिस्तानी सैन्याने अफगाणिस्तानची राजधानी काबुल येथे असलेल्या एका व्यसनमुक्ती केंद्रावर हवाई हल्ला केला, ज्यामध्ये शेकडो लोकांचा मृत्यू झाला.दरम्यान, पाकिस्तानने हा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. पाकिस्तानने याच आठवड्यात माध्यमांना दिलेल्या माहितीनुसार, ते फक्तदहशतवादी तळ आणि लष्करी ठिकाणांनाच लक्ष्य करतात.

# आसाम विधानसभा निवडणुकीसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भाजपने आसाम विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. या यादीत ८८ उमेदवारांच्या नावांचा समावेश आहे. भाजपच्या यादीनुसार, प्रद्युत बोरदोलोई यांना दिसपूर जागेसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. बोरदोलोई हे नागाव लोकसभा मतदारसंघाचे काँग्रेस खासदार होते आणि त्यांनी मंगळवारी काँग्रेस पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.

**मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा जलुकबारी मतदारसंघातून निवडणूक लढवणार**

बुधवारी बोरदोलोई यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि आता त्यांच्या नावाचा भाजपच्या पहिल्या यादीत समावेश करण्यात आला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा राज्यातील जलुकबारी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. भाजपने जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे की, भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक बुधवारी झाली, ज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय निवडणूक समितीचे इतर सदस्य उपस्थित होते. पक्षाध्यक्ष नितीन नवीन यांनी या बैठकीचे अध्यक्षपद भूषवले. १२६ विधानसभा जागा असलेल्या आसाममध्ये ९ एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. मतमोजणी ४ मे रोजी होईल. हिमंता बिस्वा सरमा यांनी जालुकबारी जागा सलग पाच वेळा जिंकली आहे. भाजपच्या यादीत सहा महिला उमेदवारांचा समावेश आहे. बिहपुरिया जागेसाठी आसाम काँग्रेसचे माजी अध्यक्ष भूपेन कुमार बोरा यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपच्या पहिल्या यादीत रणजित कुमार दास, अशोक सिंघल, अजंता निओग, चंद्र मोही पटवारी, रणोज पेगू, संजय किशन, पीयूष हजारिका आणि बिमल बोरा यांचाही समावेश आहे.

# श्रीरामांना वंदन म्हणजे भारतमातेचे पूजन- राष्ट्रपती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरु वारी रामनगरी अयोध्या येथे राम मंदिराच्या उभारणीशी संबंधित काही निवडक शिल्पकार (कर्मयोगी) यांचा सन्मान केल्यानंतर उपस्थित रामभक्तांना संबोधित केले. श्रीरामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट यांच्या आमंत्रणावरू न राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दीड वर्षांच्या अंतरानंतर दुस-यांदा अयोध्येला भेट देत राम मंदिरात श्रीराम यंत्राची स्थापना केली.या प्रसंगी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या की, प्रभू श्रीरामांना वंदन करणे आणि भारतमातेचे पूजन करणे हे आपल्यासाठी समान आहे.



कार्यक्रमाला संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. त्या म्हणाल्या की, आज अयोध्येत उपस्थित राहणे हा माझ्या जीवनाला कृतार्थ करणारा क्षण आहे. येथे येउन मला अत्यंत अभिमान वाटत आहे. राम मंदिर आपल्याला आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाशी जोडते.त्या पुढे म्हणाल्या की, ५०० वर्षांच्या संघर्षानंतर आपल्याला हा सौभाग्याचा क्षण प्राप्त झाला आहे. राम मंदिराची प्राणप्रतिष्ठा आणि मंदिरावरील ध्वजारोहण या आपल्या इतिहासातील सुवर्ण तिथी आहेत. मला श्रीराम यंत्र स्थापनेची संधी मिळाली, हे प्रभू श्रीरामांची माझ्यावर असलेली कृपा असल्याचे मी मानते.प्रभू श्रीरामांना वंदन करणे आणि भारतमातेचे पूजन करणे हे एकच आहे. आजच्या या पवित्र प्रसंगी आपण सर्वांनी भारतमातेचा सन्मान आणि वैभव सर्वोच्च शिखरावर नेण्याचा संकल्प करू या, असे आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केले.

राष्ट्रपती यांनी पुढे सांगितले की, आपल्या देशाचा पुनर्जागरण आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये होत आहे. देवभक्ती आणि देशभक्ती यांचा मार्ग एकच आहे. देशातील सर्व नागरिकांनी घटाघटात वास करणा-या राम या पवित्र भक्तिभावाने एकात्म होउन पुढे जावे, अशी माझी इच्छा आहे. रामराज्याच्या आदर्शांवर चालत आपण नैतिकता आणि धर्माचरणावर आधारित राष्ट्र उभारू शकतो. आपण सर्वजण समावेशक समाज आणि विकसित राष्ट्र घडविण्याच्या दिशेने पुढे जात आहोत. प्रभू श्रीरामांच्या आशीर्वादाने वर्ष २०४७ किंवा कदाचित त्यापूर्वीच आपण ही उद्दिष्टे साध्य करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## राज ठाकरेंच्या शिवतीर्थवर गुढीपाडव्याचा उत्साह

# सहकुटुंब उभारली गुढी!

**मुंबई/प्रतिनिधी-**प्रथेप्रमाणे साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडव्यानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा (मनसे) पाडवा मेळावा गुरु वारी (१९ मार्च) मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, यापूर्वी राज ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या शिवतीर्थ येथे पारंपरिक पद्धतीने ठाकरे कुटुंबीयांनी गुढी उभारली. यावेळी संपूर्ण ठाकरे कुटुंबीय उपस्थित होते.पाडवा मेळाव्यानिमित्त सकाळपासूनच शिवाजी पार्क परिसरात मनसैनिकांची गर्दी वाढत असल्याचे दिसून येत आहे. राज्याच्या कानाकोप-यातून कार्यकर्ते दादरच्या दिशेने निघाले आहेत. त्यामुळे आज संपूर्ण दिवसभर शिवाजी पार्क परिसरात मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला आहे.संपूर्ण परिसरातील पार्किंग हटवण्यास सुरु वात झाली आहे. संपूर्ण शिवाजी पार्क आणि दादर परिसरात ठिकठिकाणी मनसेच्या मेळाव्याचे पोस्टर्स आणि बॅनर्स लावल्याचे पाहायला मिळत आहे. या सर्व वातावरणात घरातील गुढी उभारल्यानंतर राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर येत सर्वांना मिठाई दिली आणि हिंदू नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## बंगालमधील राजकारण

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेला 'जय माँ काली' हा उद्घोष बदलाचा संकेत मानला जात आहे. हा बदल केवळ एका घोषणेपुरता मर्यादित नाही, तर राजकीय रणनीतीच्या नव्या अध्यायाकडे निर्देश करतो. याआधी 'जय श्रीराम' हा नारा भारतीय जनता पक्षाची ओळख बनला होता, विशेषतः उत्तर आणि पश्चिम भारतात; मात्र बंगालच्या भूमीवर हा नारा अनेकदा पक्षावर 'बाहेरचा' असल्याचा आरोप करणारा ठरला. अशा परिस्थितीत 'जय माँ काली' आणि 'जय माँ दुर्गा' यांचा वापर ही एक विचारपूर्वक आखलेली रणनीती मानली जात आहे. त्यातून भाजप स्वतःला पश्चिम बंगालच्या संस्कृती आणि भावनांशी जोडण्याचा प्रयत्न करत आहे. दीर्घकाळापासून लागलेल्या 'बाहेरचा' या ठपक्यापासून मुक्त होण्याचा हा व्यापक प्रयत्न असल्याचेही यातून दिसते. 'माँ काली' आणि 'माँ दुर्गा' या पश्चिम बंगालच्या ओळखीचा अविभाज्य भाग आहेत. दुर्गापूजा येथे केवळ सण नसून सामाजिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे. कालीपूजेलाही खोल धार्मिक आणि भावनिक नाते आहे. अशा वेळी या घोषणांद्वारे भारतीय जनता पक्ष पश्चिम बंगालच्या मातीचा आणि परंपरेचा आपण सन्मान करतो, हा संदेश देऊ इच्छितो. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी अलीकडेच कोलकात्यात महिला मोर्चाच्या सभेत महिलांना आपल्या आतली दुर्गाशक्ती जागृत करण्याचे आवाहन केले. हा उल्लेख केवळ धार्मिक संदर्भापुरता मर्यादित नव्हता, तर महिला सक्षमीकरणाच्या संदेशाशी जोडला होता. ९ ऑगस्ट २०२४ रोजी आरजी कर मेडिकल कॉलेज आणि रुग्णालयात घडलेल्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेचा तसेच ऑक्टोबर २०२५ मध्ये दुर्गापूर मेडिकल कॉलेजमध्ये घडलेल्या सामूहिक बलात्काराच्या घटनेचा उल्लेख करत त्यांनी महिलांना अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचे आवाहन केले. अशा प्रकारे त्यांनी धार्मिक प्रतिकांना सामाजिक न्याय आणि महिला सुरक्षेच्या प्रश्नांशी जोडले. देशभरात महिलांची मतदानातील भागीदारी वाढत आहे. बिहारपासून महाराष्ट्रापर्यंत महिला मतदार निर्णायक भूमिकेत दिसून आल्या आहेत आणि बंगालही याला अपवाद नाही. अशा वेळी काली आणि दुर्गेच्या माध्यमातून महिलांशी थेट संवाद साधणे ही भाजपाची महत्त्वाची निवडणूक रणनीती मानली जात आहे. पश्चिम बंगालमध्ये प्रादेशिक पक्षांचे दीर्घकाळ वर्चस्व राहिले आहे. भारतीय जनता पक्षाला अनेकदा बाहेरचा पक्ष म्हणण्यात आले. आता 'जय माँ काली' आणि 'जय माँ दुर्गा' सारख्या घोषणांद्वारे पक्षाचे नेते आपण पश्चिम बंगालच्या सांस्कृतिक ओळखीपासून वेगळे नसल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करत आहेत.या दृष्टिकोनातून पाहिल्यास 'जय माँ काली' हा नारा केवळ धार्मिक उदघोष नाही, तर तो एक राजकीय आणि सांस्कृतिक संकेत आहे. तो त्या परंपरेची आठवण करून देतो जिथे राष्ट्र, धर्म आणि सांस्कृतिक ओळख एकमेकांशी गुंफलेले असतात. भाजपचा 'जय श्री राम' पासून 'जय माँ काली' आणि 'जय माँ दुर्गा'कडे झालेला प्रवास हा केवळ विचारसरणीचा प्रश्न नाही, तर तो सांस्कृतिक समज आणि स्थानिक भावनांची ओळख पटवण्याचा प्रयत्न आहे. 'जय श्री राम' पासून 'जय माँ काली'कडे वाटचाल करणे म्हणजे पश्चिम बंगालच्या भूमीवर वेगळी रणनीती स्वीकारण्याची तयारी दर्शवणे होय; जेणेकरून लोकांशी तळागाळात नाते जोडता येईल. मात्र, खरी कसोटी ही केवळ घोषणा बदलण्याची नसून त्या शक्तिशाली प्रतीकांना प्रत्यक्ष कृतीत रूपांतरित करण्याची आहे. ही प्रतीके खरोखरच तळागाळात बदल घडवतील का, महिलांच्या सुरक्षितता, सन्मान आणि सक्षमीकरणासाठी ठोस पावले उचलली जातील का, सांस्कृतिक जोड सामाजिक न्यायात रूपांतरित होईल का असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतात. पश्चिम बंगाल विधानसभेची आगामी निवडणूक केवळ सत्तांतराची किंवा राजकीय आकडेमोडीची लढाई नाही; तर प्रतिमा, प्रतीक, अस्मिता आणि रणनीती यांच्या संगमावर उभी आहे. एकीकडे भारतीय जनता पक्ष राज्यात आपला पाया मजबूत करण्याच्या प्रयत्नात आहे, तर दुसरीकडे तृणमूल काँग्रेस (टीएमसी) आपले प्रादेशिक वर्चस्व टिकवण्यासाठी सज्ज आहे. २०१९ च्या लोकसभा आणि २०२१ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपने लक्षणीय वाढ दाखवली; परंतु सत्ता मिळवता आली नाही. त्यामुळे या वेळी पक्ष अधिक सूक्ष्म पद्धतीने काम करताना दिसतो. भाजप राष्ट्रीय सुरक्षेचे, नागरिकत्व कायद्याचे, सीमावर्ती प्रश्नांचे आणि घुसखोरीसारख्या मुद्यांचे महत्त्व अधोरेखित करत आहे. त्याचबरोबर केंद्र सरकारच्या योजनांचा लाभार्थी वर्ग विशेषतः महिला, गरीब आणि अनुसूचित जाती-जमाती यांच्याशी थेट संवाद साधण्याची रणनीती आखेल. हा पक्ष महिलांची वाढती मतदानातील भूमिका लक्षात घेता, महिला सक्षमीकरण, सुरक्षा आणि आर्थिक मदतीच्या योजनांवर विशेष भर देईल. दुर्गा आणि कालीच्या प्रतीकांद्वारे नारीशक्तीचा संदेश देत महिलांना भावनिक आणि राजकीय पातळीवर जोडण्याचा प्रयत्न होईल. ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली तृणमूल काँग्रेस 'बंगाल विरुद्ध बाहेरचा' हा संघर्ष उभा करत राहील. 'बंगालची मुलगी' ही प्रतिमा अधिक ठळक करण्यावर त्यांचा भर आहे. राबवलेल्या कल्याणकारी योजनांचे भांडवल, लक्ष्मी भंडार, कन्याश्री, रूपश्री यांसारख्या राज्यस्तरीय योजनांचा उल्लेख करून तृणमूल काँग्रेस महिला आणि गरीब मतदारांमध्ये आपला विश्वास दृढ करण्याचा प्रयत्न करेल. तृणमूल काँग्रेस भाजपवर ध्रुवीकरणाचा आरोप करत स्वतःला सर्वधर्मसमभावाची बाजू घेणारा पक्ष म्हणून सादर करू पहात आहे. मुस्लिम मतदारांचा पाठिंबा टिकवून ठेवणे हेही या पक्षाचे एक महत्त्वाचे ध्येय असेल. या निवडणुकीत प्रतिमा हीच सर्वात मोठी रणभूमी असेल. अर्थात इतिहास सांगतो, की प्रतीके प्रभावी असतात; पण ती दीर्घकाळ टिकण्यासाठी प्रत्यक्ष कामगिरीची जोड आवश्यक असते. पश्चिम बंगालमधील बेरोजगारी, उद्योग, शिक्षण, महिला सुरक्षा आणि ग्रामीण विकास हे मुद्दे निर्णायक ठरू शकतात. भाजपपुढे सांस्कृतिक आणि राष्ट्रवादी प्रतीकांना स्थानिक विश्वासात रूपांतरित करण्याचे, तर तृणमूल काँग्रेसपुढे सत्ताधाऱ्यांविषयीची नाराजी आणि भ्रष्टाचाराच्या आरोपांना उत्तर देत विश्वसनीयता दाखवून देण्याचे आव्हान असेल. मतदार त्यातून कोणाची निवड करतात, यावर दोन्ही राजकीय पक्षांचे भवितव्य अवलंबून असेल.

# युद्धाचा वणवा जलसाठ्यांकडे...

इराणच्या अण्वस्त्रांवरून सुरू झालेला हा संघर्ष आता केवळ सीमेवरील चकमकींपर्यंत मर्यादित न राहता मानवी अस्तित्वाचा पाया असलेल्या पाणीपुरवठा आणि त्याच्या सुरक्षा यंत्रणांच्या नाशापर्यंत पोहोचला आहे. इराणच्या परराष्ट्रमंत्र्यांनी नुकताच असा खळबळजनक आरोप केला की, अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील ?'केशम?' बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे (डिसेलिनेशन) मुख्य संयंत्र पूर्णपणे उद्ध्वस्त झाले. यामुळे परिसरातील सुमारे ३० गावांचा पाणीपुरवठा पूर्णपणे खंडित झाला. याला प्रत्युत्तर म्हणून इराणने बहरीनमधील

जल शुद्धीकरण प्रकल्पांना लक्ष्य केले. त्यामुळे आता हे युद्ध तेल आणि लष्करी तळांच्या पलीकडे जाऊन थेट पाण्यावर येऊन ठेपले आहे. खाडी देशांमधील मोठी लोकसंख्या ही नैसर्गिक पाण्याच्या स्त्रोतांच्या अभावामुळे याच कृत्रिम प्रकल्पांवर अवलंबून आहे. त्यामुळे या केंद्रांना लक्ष्य करणे म्हणजे संपूर्ण नागरी वस्तीला मृत्यूच्या खाईत ढकलण्यासारखे आहे.

माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते की, पुढचे जागतिक युद्ध हे पाण्यासाठी होईल. सध्या मध्य आशियामध्ये सुरू असलेली परिस्थिती पाहता हे विधान आता प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. आखाती देशांनी आता आपल्या तेल विहिरींपेक्षा या जलसंयंत्रांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यास सुरुवात केली असून या केंद्रांभोवती आधुनिक क्षेपणास्त्रे आणि ड्रोन तैनात केले आहेत.

**अमेरिकन हल्ल्यात होर्मुझ सामुद्रधुनीजवळील केशम बेटावर असलेले खारे पाणी गोड करण्याचे मुख्य संयंत्र उद्ध्वस्त झाले. हे युद्ध नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनाशाचे निमित्त ठरत आहे. परिस्थिती लवकर आटोक्यात आली नाही, तर भविष्यात शस्त्रास्त्रांपेक्षा जास्त मृत्यू हे तहानेमुळे होतील, अशी चिन्हे दिसत आहेत.**

या प्रकल्पांना होणारी थोडीशी इजादेखील संपूर्ण देशाचे जनजीवन विस्कळीत करण्यास पुरेशी आहे. विशेषतः बहरीन, कतार आणि कुवेत यांसारख्या देशांकडे पाण्याचे पर्यायी स्त्रोत अत्यंत कमी असल्याने त्यांना या युद्धाचा सर्वाधिक फटका बसण्याची शक्यता आहे. इराणसाठी हे युद्ध केवळ लष्करी नसून ते अस्तित्वाचे युद्ध बनले आहे. कारण, त्यांच्या स्वतःच्या जल साठ्यांवरही मोठे संकट आहे.

अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानवर केलेल्या रासायनिक 'टॉक्सिक बॉम्ब'च्या हल्ल्यामुळे तिथली स्थिती अत्यंत भयावह झाली. या हल्ल्यात तेहरानमधील ३० मोठे जलसाठे निकामी झाले असून हवेत विषारी धूर पसरला. या प्रदूषणामुळे शहरात 'सिड रेन'ची भीती निर्माण झाली. नैसर्गिक जलाशयांच्या पृष्ठभागावर तेलाचा आणि रसायनांचा जाड थर जमा झाल्यामुळे ते पाणी पिण्यायोग्य राहिले नाही. या संकटामुळे तेहरानमधील सुमारे ९० लाख नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी व्याकुळ झाले असून शहरात अघोषित संचारबंदी लागू केली आहे. केवळ इराणच नाही, तर लेबनॉनमधील हिजबुल्लाच्या तळांवरदेखील असेच टॉक्सिक बॉम्ब टाकले जात आहेत, जे पिकांचा नाश करण्यासोबतच जमिनीखालील पाण्याचे साठे कायमचे दूषित करत आहेत.

सौदी अरेबिया, कुवेत, ओमान आणि कतार यांसारख्या देशांच्या अर्थव्यवस्थेचा कणा तेल असले, तरी त्यांच्या अस्तित्वाचा आधार जल शुद्धीकरण संयंत्रे हाच आहे. या देशांतील ९० टक्के पिण्याचे पाणी समुद्राच्या खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून मिळवले जाते. एका जुन्या अमेरिकन राजनैतिक दस्तावेजात असा इशारा दिला होता की, सौदी अरेबियातील ?'जुबेल?'जल केंद्राला किंवा तिथल्या पाईपलाइनला हानी पोहोचली, तर राजधानी रियाधला अवघ्या सात दिवसांत रिकामे करावे लागेल. यावरून या देशांची पाण्याची गरज आणि त्यांची हतबलता लक्षात येते. खाडी देशांनी तलावांमध्ये आणि पाणीपुरवठा साखळीत मोठी गुंतवणूक केली असली, तरी युद्ध काळात हे सर्व साठे असुरक्षित ठरत आहेत.

इस्रायलने मात्र जल व्यवस्थापनात स्वतःला जागतिक महाशक्ती म्हणून सिद्ध केले आहे. इस्रायलकडे समुद्राचे पाणी पिण्यायोग्य बनवण्याचे जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान आहे. त्यांनी केवळ कायमस्वरूपी प्रकल्पांवर



विसंबून न राहता ?'गेलमॉबाईल वॉटर फिल्ट्रेशन प्लांट?' विकसित केले. हे संयंत्र म्हणजे एका ट्रकमध्ये बसवलेले फिरते शुद्धीकरण केंद्र असून ते कोणत्याही नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीच्या काळात अत्यंत प्रभावी ठरते. संकटग्रस्त भागात जिथे पाणी दूषित झाले आहे, तिथे हा ट्रक पोहोचून लोकांना तत्काळ शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देऊ शकतो.

पृथ्वीच्या एकूण रचनेचा विचार केला, तर ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील ९७ टक्के पाणी महासागरांमध्ये असून ते मानवी वापरासाठी थेट योग्य नाही. उरलेल्या ३ टक्के गोड्या पाण्यापैकी २.४ टक्के पाणी उत्तर आणि दक्षिण धुवांवर बर्फाच्या रूपात साठलेले आहे. मानवाकडे उपलब्ध असलेले भूजल आणि नद्यांमधील पाणी हे एकूण पाण्याच्या तुलनेत १ टक्क्यापेक्षाही कमी आहे. भारतात विशेषतः मुंबई, चेन्नई, कोलकाता, गोवा, वापी, दमण, तिरुवनंतपुरम, पुरी आणि कोझिकोड यांसारख्या किनारपट्टीवरील शहरांमध्ये भूजल पातळी झपाट्याने खालावत आहे. मुंबईची स्थिती तर सर्वात चिंताजनक असून ज्या गतीने तिथला जलसाठा उपसला जात आहे, त्यावरून २०३० पर्यंत मुंबईत गोड्या पाण्याचे मोठे संकट निर्माण होऊ शकते.

जमिनीची नैसर्गिक रचना अशी असते की, पावसाचे पाणी एका मर्यादेपर्यंतच जमिनीत मुरते; मात्र अतिउपशामुळे जमिनीखाली पोकळी निर्माण होत असून तिथे समुद्राचे खारे पाणी शिरू लागले आहे. यामुळे जमिनीतील गोड्या पाण्याचे साठे खराब होत आहेत. जागतिक तापमानवाढीमुळे अंटार्क्टिकातील बर्फाचे थर वेगाने वितळत असून समुद्र पातळी वाढत आहे. याचा धोका मुंबईसारख्या महानगरांनाही आहे. वाढत्या समुद्र पातळीमुळे किनारपट्टीवरील निवासी भागांतील विहिरी आणि कूपनलिकांमध्ये समुद्राचे खारे पाणी मिसळत आहे. यामुळे भविष्यात या शहरांमध्ये पिण्याच्या पाण्याचा भीषण दुष्काळ पडू शकतो.

इराण आणि अमेरिका संघर्षामुळे किनारपट्टीवरील आणि आखाती देशांतील पिण्याच्या पाण्याचे संकट आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चिले जात आहे. हे युद्ध केवळ दोन विचारसरणींमधील किंवा सत्ता संघर्षाचे राहिलेले नाही, तर ते नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विनाशाचे निमित्त ठरत आहे. ही परिस्थिती लवकर आटोक्यात आली नाही, तर भविष्यात शस्त्रास्त्रांपेक्षा जास्त मृत्यू हे तहानेमुळे होतील.

पाण्याचे हे राजकारण आणि त्यावरून होणारे हल्ले मानवी संस्कृतीसाठी घातक असून, जल साठ्यांचे रक्षण ही आता काळाची गरज बनली आहे. जगाला आता जल संवर्धनाचे आणि शुद्धीकरणाच्या नवनवीन तंत्रज्ञानाचे महत्त्व नव्याने समजून घेण्याची वेळ आली आहे.

**- राजीव मुळ्ये**

# बोगस मतदारयादी, सदस्यत्वाचे गौडबंगाल

विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने प्रारंभापासूनच तमाशाचा एकेक प्रयोग आम्हाला दिसायला सुरुवात झाली?

**प्रयोग पहिला :** अनाकलनीय मतदारयादी ! इतकी वाईट मतदारयादी मी उभ्या आयुष्यात पाहिली नाही.गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ सर्व प्रकारच्या निवडणुका पत्रकार म्हणून मी जवळून पाहिल्या. ग्रामपंचायतपासून लोकसभेपर्यंत, सहकारी संस्था, शिक्षण संस्था वगैरे वगैरे.त्यांच्या यादीतही त्रुटी असतात. पण त्या इतक्या बोगस नसतात. वि. सा. संघाच्या मतदार यादीत अनेकानेक मतदारांची नावे नीट नाहीत,पत्ते चुकीचे आहेत, दोन-तीनदा नावे आली आहेत, मृत झालेल्या मतदारांची नावे आहेत, मधल्या काळात घर बदलणाय्रा अनेकांचे २५-३० वर्षे जुने पत्ते आहेत...

अशा सर्व मतदारांचे postal ballot योग्य व्यक्तीला पोचणार कसे अनेक लोक स्वर्गवासी झाले. अशांच्या मतपत्रिका मधल्यामध्ये दुसराच कोणी हडपणार नाही, याची हमी काय? गडचिरोलीच्या आरमोरीतील पोस्टमनने तर कमालच केली. Speed Post द्वारे येणारी प्रत्येक मतपत्रिका ज्याची त्यालाच देण्याचा नियम असताना या बहाद्दराने १०



**खलबत्ता**
**विनोद देशमुख**

मतपत्रिकांचा एक गठ्ठा भलत्याच माणसाला दिल्याचे पुराव्यानिशी सिद्ध झाले? उजेडात न आलेली अशी कितीतरी प्रकरणे असू शकतात. ही स्थिती बोगस मतदानाला मदत करणारीच नाही का? यातूनच मतपत्रिका परस्पर पळविण्याचे प्रकार घडल्याचे आरोप झाले. याला जबाबदार कोण? विद्यमान पदाधिका-यांनी आणि आधिच्यांनीही मतदारयादी वेळच्या वेळी अद्ययावत का केली नाही? साडेसात हजार मतदारांची छोटीशी यादी एवढ्या मोठ्या संस्थेला नीट ठेवता येत नाही? की, प्रत्येक वेळच्या सत्ताधार्य़ांनी स्वत:चे हितसंबंध जपण्यासाठी मतदारयादीला दुय्यम महत्त्व दिले?

**प्रयोग दोन :** कोण आजीव सदस्य (मतदार) असावा, याला तर काही धरबंदच नाही. साहित्याशी दूरदूरपर्यंत काहीही संबंध नसलेले शेकडो मतदार यादीत आहेत. एक उदाहरण- 'खान' आडनावाची १४ नावे काय संबंध यांचा मराठीशी, साहित्याशी, वि. सा. संघाशी? एखाद दुस-याचा असूही शकतो. अशी गठ्ठा मतांची इतरही अमराठी नावे खूप आहेत. कोणीतरी त्यांना सदस्य करून यादीत घुसवले, हे उघड आहे. असे 'सदस्य करणे' यातच सारी मेख आहे. आजवर पदाधिकारी राहिलेल्या किंवा त्यांच्या संबंधातील कोणीतरी (शक्यतो स्वत: शुल्क भरून) अशा लोकांना 'भविष्यातील बेगमी' म्हणून सदस्य बनवून घेतले असले पाहिजे. म्हणूनच 'माझी इतकी मते आहेत' असे सांगणारे काही महाभाग वि.सा.संघाच्या वर्तुळात आहेत. त्यांच्या भरोशावरच आजवर निवडणूक व्यवहार झाला. यंदा फरक एवढाच की, यावेळी मतपत्रिका ताब्यात घेण्यासाठी तीन प्रमुख पॅनल्समध्ये चुरस असल्याने मोठा गदारोळ झाला. मतदानाची ही कोणती पद्धत म्हणायची? अगदी गावखारीतील अशिक्षित मतदार सुद्धा स्वत: एव्हीएमपर्यंत जाऊन मतदान करतो अन् साहित्य संस्थेचा मतदार मात्र मतपत्रिका दुस-याच्या हाती देतो. यात मतचोरीला, मतविक्रीला, हेराफेरीला वावच वाव आहे, हे शेंबड्या पोरालाही सांगण्याची आवश्यकता नाही.

(क्रमशः)

# कार्बन जिरवा, कार्बन मुरवा...

**हवामान बदलांचे दुष्परिणाम रोखण्यासाठी कार्बनचा पर्यावरणातील उत्सर्ग कमी करण्यासाठी जगभर प्रयत्न केले जात आहेत. परंतु कार्बोत्सर्ग कमी करण्याबरोबरच कार्बशोषण वाढवण्याच्या उपायालाही तेवढेच महत्त्व आहे.**

हरितगृह वायूंच्या उत्सर्गामुळे मानवी आरोग्याला धोका उद्भवत नाही, अशी भूमिका अलीकडेच घेणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकीकडे आणि आयात उत्पादनांवर कार्बनकर लावणारा युरोप दुसरीकडे. ग्रीनलंडमधील तीन-तीन किलोमीटर उंचीच्या हिमशिखरांखाली दडलेल्या खनिज साधनसंपत्तीतून आपले उखळ पांढरे कसे होईल, याचे डावपेच आखण्यात मग्न असणारे ट्रम्प एकीकडे आणि ती हिमशिखरे वितळून जागतिक पर्यावरण धोक्यात येईल, याची चिंता करणारे जग दुसरीकडे... अशा दोन टोकांच्या धारणा आणि धोरणे यांना सामोरे जात आपण सर्व हवामान बदलांच्या संकटांचा मुकाबला करत आहोत. हा विषय जेवढा चिंतेचा आणि तातडीचा, तेवढी त्यावरील कृती मात्र तीव्र आणि व्यापक राहिली नसल्याने उद्याच्या विकासवाटांभोवती प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहेत.

हवामान बदलांच्या समस्येचे गांभीर्य आता स्पष्टपणे समोर येऊ लागले आहे. औद्योगीकरणपूर्व स्तरापेक्षा जागतिक तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसहून अधिक होऊ नये, असे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट घेऊन या समस्येचा जग मुकाबला करू पाहात आहे. त्यासाठी इ.स. २०५०पर्यंत कर्बभाररहित स्थिती (नेट झिरो)



गाठण्याचे सर्व देशांनी मान्यही केले आहे. भारताने इ.स. २०७०चे उद्दिष्ट ठेवले आहे. प्रत्यक्षात मात्र २०२४मधील सरासरी जागतिक तापमान हे औद्योगीकरणपूर्व स्तरापेक्षा १.६० अंश सेल्सिअसने, तर २०२५मध्ये ते १.४७ अंश सेल्सिअसने अधिक होते. म्हणजे जग ज्याकडे भविष्यातील धोका म्हणून पाहात आहे, त्या उंबरठ्यावर तर आपण सामूहिक अनास्थेतून पोचलोही आहोत!

### चार पदरी उपाययोजनेची गरज

या पार्श्वभूमीवर, विकसित देशांकडून अपेक्षित मदतीची वाट न पाहता भारत एका जबाबदार देशाची भूमिका पार पाडत आहे. ही वाटचाल चार मार्गांनी करावी लागणार आहे.

ऊर्जा संक्रमण : प्रत्येकाला सहज सुचणारा आणि जगाने स्वीकारलेला हा स्वाभाविक मार्ग आहे. हरितगृह वायूंचा उत्सर्ग वाढवणाऱ्या खनिज ऊर्जेपासून दूर जाऊन स्वच्छ अशा सौर, पवन, आण्विक किंवा हायड्रोजन अशा पर्यायांकडे वळणे त्यात अपेक्षित आहे.

वनीकरण : झाडे कार्बन डायऑक्साइड हवेतून शोषतात आणि कर्बशोषणाचा सर्वाधिक जुना व नैसर्गिक स्त्रोत म्हणून मानवसमाजाच्या मदतीला धावून येतात, हे सर्वज्ञात आहे. असे हरित आच्छादन वाढवून अडीच ते तीन अब्ज टनांनी कर्बशोषणाची क्षमता वाढवण्याचे भारताने २०३०पर्यंतचे उद्दिष्ट ठेवले आहे.

चक्रीय अर्थव्यवस्था : वापरा आणि फेकून द्या, हा मार्ग न पत्करता रीड्यूस, रीयूज, रिसायकल या चक्रीय व्यवस्थेचा स्वीकार हा जागतिक प्रदूषणातील वाटा कमी करणारा ठरू शकतो. आपले सरकारही मिशन लाइफ (लाइफस्टाइल फॉर एनव्हायरन्मेंट) या उपक्रमातून त्याला प्रोत्साहन देत आहे.

कर्बशोषण आणि विलगीकरण : आधीचे तीनही मार्ग कर्बोत्सर्ग कमी करण्यावर भर देतात, त्याजोडीला होणारा कर्बोत्सर्ग शोषून नक्त कर्बभार कमी करण्यासाठी हा मार्ग उपाय सुचवतो. विशेषतः औद्योगिक प्रकल्पांच्या चिमण्यांमधून बाहेर पडणारा धूर शोषून त्याचे द्रवात रूपांतर करणे आणि त्यापासून खते, कृत्रिम इंधने आणि हरित काँकिट तयार करणे किंवा जमिनीत खोलवरच्या वापरबाह्य झालेल्या तेलविहिरींत किंवा खडकांमध्ये ते साठवून विल्हेवाट लावणे असे उपाय करता येतात.

### कर्बशोषण प्रकल्पांसाठी ठोस तरतूद

कर्बशोषण, कर्बरूपांतर आणि कर्बोपयोजन यांसाठी भारत आता खात्रीशीर पावले उचलू लागला आहे. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात त्यासाठी पुढील पाच वर्षांसाठी वीस हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यांपैकी पाचशे कोटी रुपये आगामी आर्थिक वर्षात ऊर्जा मंत्रालयाच्या यासंबंधीच्या पथदर्शी प्रकल्पासाठी वापरले जातील. पोलाद, सिमेंट, शोधन प्रकल्प, रसायने आणि ऊर्जा या क्षेत्रांसाठी या निधीचा प्राधान्याने विनियोग केला जाईल. कर्बशोषणाच्या या प्रकल्पांची सुरुवात गुजरात आणि ओडिशा या राज्यांतील औद्योगिक वसाहतींमध्ये समाईक पायाभूत सोयींच्या उभारणीतून केली जाईल. या व्यवस्थांची उभारणी स्वतः करण्याऐवजी खासगी क्षेत्रातून करून घेण्याकडे सरकारने लक्ष वळवले आहे. परंतु त्यातील आर्थिक व्यवहार्यतेवर सरकार लक्ष ठेवेल आणि जेथे तो बोजा अतिरिक्त होईल, तेथे सरकार निधी (व्हाएबिलिटी गॅप फंडिंग) पुरवेल.

कर्बशोषणाच्या उपाययोजना सरकारच्या विषयपत्रिकेवर असल्या, तरी त्यांना चालना मिळण्यास युरोपातील एक ताजा निर्णय महत्त्वाचे कारण ठरला आहे. युरोपीय महासंघाने आयात मालासाठी कार्बन सीमा समायोजन व्यवस्था या नावाखाली १ जानेवारी २०२६पासून कर्बशुल्क लागू केले आहे. पोलाद उत्पादक याचे बळी ठरू शकतात, ही शक्यता गृहीत धरून भारताने ओमानसोबत व्यापार करार करून त्या देशाची दारे भारतीय पोलाद उत्पादकांना खुली केली आहेत.या प्रयत्नातून नवी कर्बअर्थव्यवस्थाही उभी राहणार आहे. हवामान बदल रोखण्यासाठीची उद्दिष्टे गाठतानाही आपल्याला कोळशावर आधारित आणि अन्य काही प्रदूषणकारी औद्योगिक प्रकल्प पूर्ण गुंडाळून ठेवता येणार नाहीत. कर्बशोषणाच्या उपायांमुळे हे प्रकल्प देशाच्या जीडीपीमध्येही भर घालत राहतील आणि रोजगारनिर्मितीमध्येही.नीती आयोगाच्या अंदाजानुसार, या क्षेत्रात इ.स. २०५०पर्यंत ८० लाख ते एक कोटी नवे रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे. कर्बरूपांतर हादेखील ही समस्या कमी करण्याचा एक मार्ग आहे. त्यामध्ये कार्बन डायऑक्साइडपासून कृत्रिम इंधन व मिथेनॉलसारखी रसायने यांची निर्मिती करता येते. त्या मार्गाने आपण खनिज इंधनांवरील, विशेषतः ती आयात करण्यावरील अवलंबित्वही कमी करू शकतो.

**-डॉ. रवींद्र उटगीकर**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# साहेबराव करपे स्मृतिदिनी यवतमाळात सामूहिक अन्नत्याग आंदोलन



जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - देशातील सरकारी नोंदीत पहिल्या शेतकरी आत्महत्येचे प्रतीक ठरलेले स्व. साहेबराव पाटील करपे (रा. चिलगव्हाण, ता. महागाव, जि. यवतमाळ) यांच्या स्मृतिदिनानिमित्त गुरुवारी (दि. १९) यवतमाळ शहरातील आझाद मैदान येथे सामूहिक अन्नत्याग आंदोलन करण्यात आले.शेतकरी चळवळ, यवतमाळ व यवतमाळ जिल्हा युवक काँग्रेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या आंदोलनातून शेतकऱ्यांच्या समस्या, अन्याय व संघर्ष समाजासमोर मांडण्यात आले. तसेच शासनाने शेतकरी प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.

**शेतकरी प्रश्नांवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी**

आंदोलनाची सुरुवात स्व. साहेबराव करपे व त्यांच्या पत्नी स्व. मालतीताई करपे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी "साहेबराव करपे अमर रहे" या घोषणांनी परिसर दुमदुमला आणि शेतकरी संघर्षाला सलाम करण्यात आला. याप्रसंगी नंदकुमार बुटे, ज्ञानेश्वर गायकवाड, 'दैनिक अजिंक्य भारत'चे आवृत्ती प्रमुख राजकुमार भितकर, शोभाताई पारधी, प्रवीण भोयर, पापा इंगोले तसेच शेतकरी चळवळीचे प्रा. पंढरी पाठे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाने ठोस धोरण राबवावे, अशी भूमिका मांडली. आंदोलनात कॉ. सचिन मनवर,युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रमोद बगाडे, सोशल मीडिया काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा पुसनाके, प्रा. डॉ.अनिल देशमुख,जनसंग्राम जिल्हा प्रमुख जय राठोड, जनमाध्यम जिल्हा प्रमुख विवेक वानखडे, स्वप्नील खोब्रागडे, प्रवीण आडे, सविता गजभिये, विशाल पावडे, विनोद दोदल, यांच्यासह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या आंदोलनातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष वेधत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी एकमुखी मागणी करण्यात आली.

## शहीद शेतकरी साहेबराव करपे पाटील स्मृतिदिनानिमित्त चिलगव्हाण येथे अन्नत्याग आंदोलन!



जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - शहीद शेतकरी साहेबराव करपे पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त महागाव तालुक्यातील चिलगव्हाण येथे सामूहिक अन्नत्याग आत्मक्लेश आंदोलन करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

१९ मार्च १९८६ रोजी आर्थिक नैराश्याला कंटाळून करपे पाटील यांनी कुटुंबासह जीवन संपविले होते. त्यापूर्वी त्यांनी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांना पत्र लिहून कृषी क्षेत्रातील बिकट परिस्थिती मांडली होती.

या घटनेनंतर ही शेतकरी समस्यांकडे शासनाचे दुर्लक्ष कायम राहिल्याची खंत यावेळी व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नसून या आत्महत्या नसून शासन व्यवस्थेने घडविलेल्या हत्या असल्याचा गंभीर आरोप आंदोलकांनी केला. केंद्र व राज्य शासनाच्या कृषी धोरणांवर टीका करत, शेतकरी विरोधी कायदे रद्द करून दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. २०१७ पासून सुरू असलेल्या या अन्नत्याग आंदोलनात दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वपक्षीय नेते, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

खासदार संजय भाऊ देशमुख, शेतकरी नेते मनीष जाधव, विनायकराव देशमुख, डॉ. संदीप शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी ग्रामस्थांनी करपे पाटील यांच्या स्मृतींना अभिवादन करत शेतकरी प्रश्नांवर संवेदनशीलतेने विचार करण्याचे आवाहन केले.

हा दिवस शेतकऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा असून, त्यांच्या वेदनांचा जागर कायम ठेवण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.



## ४ वर्षांच्या चिमुकल्याचा पहिला रोजा

आर्णी - येथील नवाज समीर शेख वय वर्ष 4 या चिमुकल्याने आपल्या जीवनातील पहिला रोजा गुरुवारी 19मार्चला पूर्ण केला आहे. त्याचे सर्वत्र कौतुक केले जाते आहे. स्थानिक शनी मंदिर चौक परिसरात राहणारे वसीम शेख यांचा हा पुतण्या आहे. सध्या उन्हाळ्याचा मार्च महिना सुरु असून, होळी नंतर उन्हाची तीव्रता अधिकच वाढली आहे. त्यामुळे खाऊन पिऊन असलेल्या थोर मोठ्यांच्या जिव्हाची लाही लाही होत आहे. अश्यातच केवळ 4वर्षे वय असलेल्या नवाज ने दिवसभर निरंक रोजा पूर्ण केल्याने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. रोजा ठेवण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत हे आता विज्ञान ने सिद्ध केले आहे. 12महिन्यात 1महिना निरंक रोजा ठेवायचा ही शिकवण पैगंबरांनी दिली आहे. त्यामुळे 5वेळचा नमाज व पवित्र कुराण पठण केल्याने,मन पवित्र तर होतेच, याशिवाय शारीरिक दृष्ट्या आरोग्यदायी सुद्धा रोजा ठरतो.

# शिक्षण विभागातील दिव्यांग महाघोटाळ्यातील शिक्षकांची चौकशी कधी होणार ?

## बनावट प्रमाणपत्राच्या आधारे बदल्या/पदोन्नती लाटल्या, पुसद पंचायत समिती अंतर्गत अनेक बोगस दिव्यांग शिक्षक!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - यवतमाळ जिल्हा परिषद शिक्षण विभागात एका मोठ्या घोटाळ्याचा पर्दाफाश होणार असून, दिव्यांगत्वाचा खोटा आधार घेऊन सोयीच्या बदल्या व पदोन्नती लाटणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर निलंबनाची टांगती तलवार कायम आहे. शिक्षण सारख्या पवित्र क्षेत्रात दिव्यांग नावाखाली सुरू असलेल्या या गोरखधंद्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

जिल्हा परिषद अंतर्गत होणाऱ्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये दिव्यांग संवर्गाला विशेष सवलत दिली जाते. याच सवलतीचा गैरफायदा घेण्यासाठी काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी चक्क बोगस दिव्यांग प्रमाणपत्रे सादर केली. या प्रमाणपत्रांच्या आधारे अत्यंत सोयीच्या ठिकाणी आपल्या बदल्या करून सोबत पदोन्नत्या सुद्धा घेतल्या आहे मात्र,तक्रारी प्राप्त होताच प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली आहे. मागील एक दोन महिन्यात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली



सुरू झालेल्या चौकशीत शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद आणि बोगस असल्याचे सर्व जिल्हाभर चर्चेला उधान आले होते. कर्तव्यात कसूर आणि फसवणूक केल्याचा ठपका या कारवाईत होणार होता परंतु काही कारणास्तव ही चौकशी पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षण विभागातील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. घोटाळ्याची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही? हा केवळ हिमनगाचे टोक असून, यवतमाळ जिल्ह्यात अशा प्रकारे किती शिक्षकांनी किंवा कर्मचाऱ्यांनी बनावट प्रमाणपत्रांच्या आधारे सवलती उपभोगल्या आहेत, याची चौकशी आता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग किंवा विशेष समितीमार्फत होण्याची मागणी अनेक सामाजिक संघटना व राजकीय पक्षाच्या वतीने जोर धरत आहे. यामध्ये पुसद तालुक्यात पंचायत समिती अंतर्गत बरेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या प्रमाणात बोगस दिव्यांग प्रमाणपत्राच्या आधारे दहा ते पंधरा वर्षापासून तालुक्यात ठाण मारून बसले आहे, एवढेच नाही तर या दिव्यांग बोगस प्रमाणपत्राच्या आधारे पदोन्नती सुद्धा घेतल्या आहेत. याचीही चर्चा रंगत आहे. वरदहस्त असलेल्या या बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या पाठीशी कोणत्या राजकीय नेत्यांचा हात आहे याची सुद्धा चर्चा पुसद तालुक्यात मोठ्या प्रमाणात होत आहे, त्यामुळे पुढील काळात या बोगस दिव्यांग शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कधी कारवाई होणार याकडे पुसद तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# • वेचक

## आंतरराष्ट्रीय ख्यातीचा रॅप स्टार विपिन आज यवतमाळात



यवतमाळ - ऐतिहासिक महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या स्मरणार्थ आयोजित समता महोत्सवात आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेला रॅप स्टार विपिन तातड यांचा भव्य कार्यक्रम २० मार्च रोजी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील शिवतीर्थ येथे होणार आहे. या कार्यक्रमाकडे यवतमाळकरांचे लक्ष लागले आहे. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी असलेला विपिन तातड रॅपच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण करत आहे. दलित कुटुंबात व झोपडपट्टीत वाढलेल्या विपिनने गेल्या आठ वर्षांत आपल्या जीवनातील अनुभवांवर आधारित रॅप सादर करून जातीवाद, भेदभाव, महिला हक्क व स्वातंत्र्य यांसारख्या विषयांवर प्रभावी भाष्य केले आहे. "YouTube" वरील "Raptoli" चॅनेलद्वारे त्याने अनेक रॅप प्रसिद्ध केले असून त्याला जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी, टाटा इन्स्टिट्यूट व सोशल सायन्स,बालगंधर्व पुणे, हैदराबाद विद्यापीठ आदी ठिकाणी सादरीकरणाची संधी मिळाली आहे. दिल्ली सरकारकडून त्याचा सन्मानही करण्यात आला आहे. तसेच 'झुंड' चित्रपट व 'Murder in the Courtroom' मालिकेत त्याच्या रॅपचा समावेश आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजिका प्रमोदिनी रामटेके यांनी केले आहे.

## सातव्या वर्षी अनाबिया सलमान शेखचा पहिला रोजा ; पवित्र रमजानमध्ये श्रद्धेचा संदेश



पांढरकवडा - येतील मौलाना आझाद वॉर्ड मध्ये राहणारी अनाबिया सलमान शेख (वय ७ वर्षे) हिने पवित्र रमजान महिन्यात आपला पहिला रोजा पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधले आहे.
लहान वय असूनही अनाबियाने दिवसभर संयम, श्रद्धा आणि शिस्त राखत रोजा पूर्ण केला. तिच्या या प्रयत्नामुळे कुटुंबीय आणि शेजारी आनंदित झाले असून तिचे कौतुक केले जात आहे. पालकांनीही तिच्या पहिल्या रोज्याचा आनंद साजरा करून तिला प्रोत्साहन दिले. विशेषज्ञांचे मत आहे की, बालवयात धार्मिक संस्कार रुजवल्याने आयुष्यभर त्याचा सकारात्मक परिणाम होतो. अनाबियाच्या या कृतीतून इतर मुलांनाही प्रेरणा मिळत असून समाजात एक सकारात्मक संदेश पोहोचला आहे. रमजानमधील रोजा हा केवळ अन्नत्याग नसून आत्मसंयम, सहनशीलता आणि गरजूंबद्दल संवेदनशीलता वाढवण्याचा मार्ग मानला जातो. अनाबियाने पहिल्याच प्रयत्नात रोजा पूर्ण करून या मूल्यांचे सुंदर उदाहरण दिले आहे.



## पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडून गुढीपाडवानिमित्त नागरिकांना शुभेच्छा

यवतमाळ - गुढीपाडव्याच्या मंगलमय पर्वावर आज गुरूवारी राज्याचे मृद वजलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी यवतमाळ येथील निवासस्थानी गुढी उभारून नागरिकांना सुख, समृद्धी आणि निरामय आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या. हिंदू नववर्ष सर्वांच्या आयुष्यात आनंद, आरोग्य आणि भरभराट घेऊन येवो, अशी प्रार्थना मंत्री संजय राठोड यांनी यावेळी केली. याप्रसंगी पोहरादेवी येथील महंत जितेंद्र महाराज, जिल्हा बँकेचे संचालक राजुदास जाधव यांच्यासह कुटुंबीय, कौटुंबिक स्नेही आदी उपस्थित होते.

# समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नेहमी तत्पर : मंत्री संजय राठोड

जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - तालुक्यातील मोवाडा येथे १९ मार्च रोज गुरुवारला गुडीपाडवाच्या पर्वावर माता जगदंबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा आणि संत सेवालाल महाराज पादुका व पगडी लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्यानिमित्त आयोजित जाहीर सभेला संबोधित करतांना राज्याचे मंत्री तथा बंजारा समाजाचे नेते ना. संजय राठोड यांनी बंजारा समाज अजूनही विकासापासून कोसू दूर असून समाजाचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास पूर्णपणे झालेला नाही त्यामुळे समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी माझे प्रयत्न असून मी नेहमी तत्पर असल्याचे मत व्यक्त केले. सोबतच समाजाच्या प्रश्नाकरिता आपसातील मतभेद विसरून समजबांधवानी सेवालाल महाराजांच्या पांढरा झेंड्याखाली एकत्र येण्याचे आवाहन उपस्थित समाजबांधवाना केले. जाहीर सभेपूर्वी मंत्री संजय राठोड व पोहरागड येथील महंत श्री जितेंद्रजी महाराज यांच्या शुभहस्ते,श्री देवानंद पवार



यांच्या प्रमुख उपस्थितीत माता जगदंबा व संत सेवालाल महाराज मंदिरात रीतसर पूजा करून भोग लावुन आरती केली नंतर सभास्थळी उपस्थित राहून सभेला संबोधित केले.

सभास्थळी मंत्री संजय राठोड यांच्यासह सर्व मान्यवरांचे मोवाडा तांड्यातील नायक, कारभारी आणि डाव यांच्याहस्ते शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी महंत श्री जितेंद्रजी महाराज पोहरागड, यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सभापती देवानंद पवार, राजूदास जाधव, संचालक जि. म. बँक, मारोती पवार माजी पंचायत समिती सदस्य, मोहन जाधव, प्रविना दीपक राठोड प्रशासक (सरपंच) ग्रामपंचायत मोवाडा प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

सदर कार्यक्रमात समाजातील शासकीय सेवा प्रदान केलेल्या रमेश आडे, देविदास राठोड, रोहीदास राठोड, प्रमेदास राठोड, ठाकुरसिंग आडे या समाज बांधवांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी आडे यांनी केले. तर आभार किरण राठोड यांनी मानले यावेळी शेकडो समाज बांधव, महिला बघिणी उपस्थित होत्या.

# जागृत ग्राहक हाच सुरक्षित ग्राहक : प्रा. केशव चेटुले

## एसडीओ कार्यालयात जागतिक ग्राहकदिन समारंभ संपन्न!

जनमाध्यम प्रतिनिधी

पुसद - प्रत्येक व्यक्ती हा कुठल्या ना कुठल्या प्रकारे ग्राहक असतो. अन्न, वस्त्र, औषधे, मोबाईल, इंटरनेट सेवा अशा विविध वस्तू व सेवा आपण दररोज वापरत असल्यामुळे ग्राहक म्हणून आपली भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. बाजारपेठेचा केंद्रबिंदू ग्राहक असला तरी अनेक वेळा ग्राहकांची फसवणूक होते. निकृष्ट दर्जाच्या वस्तूंना अधिक दर आकारणे, भ्रामक जाहिराती, कालबाह्य वस्तूंची विक्री तसेच ऑनलाईन खरेदीत होणारी फसवणूक यामुळे ग्राहकांचे शोषण होत असल्याचे प्रतिपादन प्रा. केशव चेटुले यांनी केले.

जागतिक ग्राहक दिनानिमित्त उपविभागीय कार्यालय येथे दि.१८ मार्च रोजी आयोजित कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. ग्राहकांना न्याय मिळावा यासाठी १९८६ चा जुना व २०१९ चा नवीन




ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आल्याचे त्यांनी सांगितले. विशेषतः डिजिटल युगात ऑनलाईन खरेदी वाढल्याने ग्राहकांनी अधिक सतर्क राहणे आवश्यक आहे.

ॲमेझॉन, फ्लिपकार्ट यांसारख्या ॲप्सवरून खरेदी करतांना उत्पादनाची माहिती नीट वाचणे, ग्राहकांचे अभिप्राय (रिव्ह्यू) पाहणे, परताव्याच्या अटी तपासणे आणि बिल घेणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे "जागृत ग्राहक हाच सुरक्षित ग्राहक" असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार रेखा वाणी मॅडम होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पुरवठा निरीक्षण अधिकारी अमोल महाजन, प्रा.कृष्णा कडसकर, सहाय्यक बीडीओ संजय राठोड, अनिल विरखेडे, उत्तमराव जाधव, उपस्थित होते तर सौ.सुनिता हळदे, ॲड. विश्वास भवरे,ललीत सेता, प्रा रमेश वाघमारे, निळकंठ घाडगे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# ऑनलाइन व्यवहार करताना नागरिकांनी सजग राहणे गरजेचे उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - ग्राहक म्हणजे बाजारपेठेचा राजा आजच्या जागतिकरण स्पर्धात्मक युगात हा ग्राहक राजा अतिशय महत्वाचा भाग झाला आहे ग्राहक बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल आणि खरेदी विक्रीचा केंद्रबिंदू आहे. सध्या ऑनलाइन व्यवहार मोठ्या प्रमाणात होत आहे.त्यामुळे यूपीआय अंतर्गत ऑनलाइन वस्तूची खरेदी करताना ग्राहकांनी सजग राहणे आवश्यक आहे तसेच गॅस सिलेंडर मिळत नसल्याची अफवा सर्वत्र पसरवली जात असून गॅस सिलेंडर साठा उपलब्ध आहे त्यामुळे नागरिकांनी अशी अफवा पसरवू नये असे प्रतिपादन आज राळेगाव तहसील कार्यालयात झालेल्या जागतिक ग्राहक दिनानिमित्त अध्यक्षीय भाषणात बोलताना उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी आपले मत व्यक्त केले.




जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. के एस वर्मा, तालुका अध्यक्ष प्राचार्य मोहन देशमुख उपाध्यक्ष डॉ. अश्विनी थोडगे पुरवठा निरीक्षण अधिकारी चंद्रकांत पाटील यांनी जागतिक ग्राहक दिन निमित्त आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर राळेगाव शहरातील उत्कृष्ट ग्राहक सेवा देणारे पोस्टमन विनोद नहाते यांचा उपस्थित मान्यवरांच्या वतीने शाल श्रीफळ व सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित तहसीलदार अमित भोईटे जिल्हा ग्राहक पंचायत चे उपाध्यक्ष डॉ. के एस वर्मा, तालुकाध्यक्ष प्राचार्य मोहन देशमुख, उपाध्यक्ष डॉ.अश्विनी थोडगे उपाध्यक्ष विनय मुनोत, सदस्य हेमंत निंबुळकर, अमर ठाकरे, राष्ट्रपाल भोंगाडे, नायब तहसीलदार किरणताई किन्नाके, पुरवठा निरीक्षण अधिकारी चंद्रकांत पाटील, पुरवठा निरीक्षक संघप्रिय भवरे, कनिष्ठ लिपिक अमोल मंगाम तसेच तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानदार दुकानदार उपस्थित होते.

# लिंगायत पाडवा पहाट उत्साहात साजरी!

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ - चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या निमित्ताने मराठी नववर्षाचे स्वागत करत "लिंगायत पाडवा पहाट" हा भक्तिमय व संगीतमय कार्यक्रम उत्साहात पार पडला. वीरशैव हितसंवर्धक मंडळ, वसुधा प्रतिष्ठान, बसव क्लब व लिंगायत महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर सांस्कृतिक भवन येथे पहाटेच्या प्रसन्न वातावरणात हा उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. अध्यक्षस्थानी डॉ. अशोकराव मेनकुदळे होते. तर चंद्रशेखर उमरे, सुधाकर केळकर, प्रा. तेजश्री मानेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ. जयेश हातगांवकर, निलेश शेटे, बाळासाहेब दिवे, विजयराव



देशमुख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिला तेले यांच्या भूपाळीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर विविध गायक-गायिकांनी अभंग, भक्तिगीते व भावगीते सादर करत वातावरण भक्तिरसात रंगवले. "कानडा राजा पंढरीचा", "अमृताहुनी गोड", "अच्युतम केशवम", "आरंभ है प्रचंड" यांसारख्या सादरीकरणांनी रसिकांची दाद मिळवली. शेवटी संजय माटे यांच्या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देत सांस्कृतिक परंपरा जपण्याचा संदेश देणारा हा उपक्रम भक्ती, संस्कृती व सामाजिक एकात्मतेचा सुंदर संगम ठरला.

## आरटीई अंतर्गत 25% नवीन लादलेल्या अटी अखेर रद्द

महागाव - आर टी ई अंतर्गत 25% मोफत प्रवेशाबाबत नवीन जाचक अटी रद्द करून विध्यार्थ्यांना सुलभ प्रवेश मिळावा या न्याय मागणीचे निवेदन शिक्षणमंत्री महाराष्ट्र शासन यांना संध्या संदेश रणवीर यांनी पाठवून विद्यार्थी हिताची मागणी केली होती. आरटीई 25%अंतर्गत गरीब,गरजू व सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना शिक्षणाची मोफत प्रवेशाची संधी आहे.यात नवीन जाचक अटी टाकण्यात आल्या त्यामुळे या अटीला महाराष्ट्रभरातून विरोध झाला व संताप व्यक्त होऊन उच्च न्यायालयात प्रकरण गेल्याने अखेर सरकारला नमावे लागले.यात पूर्वीची 3 किलोमीटर हवाई अंतराची अट काढून 1 किलोमीटर केल्याने अनेक विध्यार्थ्यांना या प्रवेशापासून वंचित राहावे लागणार होते ती अट रद्द करून नवीन सुधारणा करून 1 किलोमीटर, 1 ते 3 किलोमीटर, व 3 किलोमीटर पेक्षा जास्त असे तीन ऑपशन लॉगिन मध्ये नव्याने टाकण्यात आले आहेत.

# वकिल महिलेवर भरदिवसा चाकू हल्ला

## कोलफील्ड युनियन लिडरवर शिरपूर ठाण्यात गुन्हा दाखल

जनमाध्यम प्रतिनिधी

वणी - उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात वकिली करणाऱ्या एका महिलेवर चक्क भरदिवसा चाकू हल्ला करण्यात आला. या प्रकरणी शिरपूर पोलिस ठाण्यात दाखल तक्रारीवरून सुनील भाऊराव मोहितकर (५५), रा. जैन लेआऊट,वणी याच्यावर विनयभंग व चाकूहल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुनील मोहितकर हा वेस्टर्न कोलफील्ड खाणीत युनियन लीडर आहे. तक्रारदार ॲड. सोनिया गजभिये (४२), रा. भालर टाउनशिप,वणी या नागपूर खंडपीठात वकिली करत असून 'भीमराज की बेटी' या संघटनेमार्फत महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत आहेत.त्यांनी एका महिला पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी आरोपीविरुद्ध तक्रार दाखल करण्यास मदत केली होती.याच कारणावरून आरोपी सुनील भाऊराव मोहितकर हा सूडभावना ठेवून होता. १७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता ॲड.गजभिये आपल्या दोन वर्षांच्या मुलीला घरासमोर फिरवत असताना आरोपी अचानक समोर आला. त्याने चाकूने २ ते ३ वेळा हल्ला करण्याचा प्रयत्न केला.तसेच अश्लील शिवीगाळ करत केस मागे घेण्याची धमकी दिली. स्वतःचा बचाव करताना गजभिये यांनी आरोपीचा प्रतिकार केला.या झटापटीत त्यांच्या हाताला दुखापत झाली. आरोपीने ओढणी ओढत खाली पाडून पुन्हा धमक्या दिल्या. दरम्यान,परिसरात वाहनाचा आवाज ऐकून आरोपी तेथून पळून गेला, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.या घटनेनंतर गजभिये यांनी शिरपूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली.त्यांच्या तक्रारीवरून आरोपी सुनील मोहितकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ७४, ३५२, ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास शिरपूर पोलीस करत असून आरोपीचा शोध सुरू आहे.

# ५ आरोपी ताब्यात ; शेतकऱ्यांच्या १७ पाण्याच्या मोटारी जप्त

जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - वडकी पोलीस स्टेशन हद्दीत शेतकऱ्यांच्या विहिरीवरील पाण्याच्या मोटारी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले असून या प्रकरणी ५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच चोरीस गेलेल्या एकूण १७ पाण्याच्या मोटारी जप्त करण्यात आल्या आहेत.


याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, वडकी परिसरातील बापूराव पांडुरंग डोमकावळे (वय ५०, रा. वाढोणा बाजार, ता. राळेगाव) यांनी दिनांक १३ मार्च २०२६ रोजी त्यांच्या शेतातील विहिरीवरील पाण्याची मोटार चोरीस गेल्याची फिर्याद वडकी पोलीस स्टेशन येथे दाखल केली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा क्रमांक १५७/२०२६ अन्वये भारतीय दंड संहितेच्या कलम ३०३(२), ३(५) नुसार गुन्हा नोंदविला होता. तपासादरम्यान पोलिसांनी सापळा रचून मिलिंद सातवरे, अमोल शिरसुपकर, मंगेश शिरसुपकर, प्रमोद पोंहणकर आणि महेंद्र गोसावी (सर्व रा. वाढोणा बाजार, ता. राळेगाव) यांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपींनी वाढोणा बाजार, लाडकी आणि टाकळी परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातून मोटारी चोरी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून एकूण १७ पाण्याच्या मोटारी जप्त केल्या असून त्यांची किंमत अंदाजे १ लाख २५ हजार रुपये आहे. याशिवाय एक होंडा कंपनीची ड्रीम युगा (क्रमांक MH 33 K 4399) ही दुचाकीही जप्त करण्यात आली असून तिची किंमत सुमारे ३० हजार रुपये आहे. एकूण १ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंथा, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक रोबिन बनसल यांच्या मार्गदर्शनाखाली वडकी पोलीस स्टेशनच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस करत आहेत.

# स्व. साहेबराव करपे व आत्महत्याग्रस्त शेतक-यांन बद्दल संवेदना !

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - आज १९ मार्च सरकारी दप्तरात नोंद झालेली महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील पहिली कौटुंबिक शेतकरी आत्महत्या महागाव तालुक्यातील चिलगव्हाण येथील स्व.साहेबराव करपे यांची पत्नी मालतीताई तीन मुली सारिका मंगला आणि विश्रांती आणि एक मुलगा भगवान अशा सहा जणांनी १९ मार्च १९८६ रोजी वर्धा जिल्ह्यातील दतरामपुर येथील गांधी आश्रमात सामूहिक आत्महत्या केली आत्महत्या करण्यापूर्वी स्व.साहेबराव करपे यांनी सतत होत असलेल्या नापिकी कर्जबाजारीपणा व शेतकरी विरोधी धोरणामुळे मला सामूहिक आत्महत्या करण्यास भाग पाडले आहे असे स्टॅम्प पेपरवर लिहून ठेवले ही आत्महत्या देशातील पहिली शेतकरी

## विनम्र अभिवादन : प्रमोद जाधव



आत्महत्या म्हणून सरकारी दप्तरी नोंद झाली आज तब्बल ४० वर्ष झाली परंतु शेतकरी विरोधी धोरणामुळे १९ मार्च १९८६ पासून सुरू झालेले शेतकरी आत्महत्या सत्र अजूनही थांबायचं नाव घेत नाही मी एक शेतकऱ्याचा मुलगा म्हणून शपथ घेतो की माझ्या जीवात जीव असेपर्यंत मी या जगाच्या पोशिंदाच्या न्याय हक्कासाठी मरेपर्यंत लढा देत राहील. स्व.साहेबराव करपे व त्यांच्या कुटुंबीयांना व देशभरातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना विनम्र अभिवादन करतो.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### विदा देणार मानवता आणि बंधुभावाचा संदेश

**अमरावती-** रमजानच्या पवित्र महिन्यात मोनवता, बंधुभाव आणि प्रेमाचा संदेश समाजात पोहोचविण्याच्या उद्देशाने गोर-गरिबांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेली व्हिजन इंटेग्रिटी डेव्हलपमेंट असोसिएशन या संस्थेतर्फे आयोजित 'मोहब्बत-ए-रमजान' या उपक्रमांतर्गत खोलापुरी गेट, सागर नगर परिसरातील ८० हून अधिक गरजू मुस्लिम कुटुंबांच्या घरोघरी जाऊन त्यांना ईदच्या शुभेच्छा देत खजूर, रूह अफजा आणि फळांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद या उपक्रमाला अधिक अर्थपूर्ण ठरविणारे ठरले.उपक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष प्रितेश वाघमारे, महासचिव शेख नुरुद्दीन, सदस्य आमिर नाईम, प्रविण शेरेकर, शेख रिजवान (केलेवाले), कोषाध्यक्षा अंकिता वाघमारे तसेच सूर्यांशी वाघमारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने सीसीटीव्ही कॅमे-याची गरज

**अंजनगाव सुर्जी-** कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने अंजनगाव



सुर्जी शहरात काही महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा ची अत्यंत गरज आहे. अंजनगाव सुर्जी शहर शासन दरबारी संवेदनशील शहर म्हणून ओळखल्या जाते. या शहरात गणेशोत्सव , दुर्गा उत्सव, आणि धार्मिक मिरवणुका सुरू असतात कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे अतिशय गरजेचे आहे. अनेकदा शांतता समितीच्या सभेत जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांसमोर सीसीटीव्ही कॅमेरे बाबतचा मुद्दा शहरातील अनेक मान्यवरांनी मांडला. परंतु त्यावर मात्र अंमलबजावणी झाली नाही. अंजनगाव सुर्जी शहराची शांतता अबाधित राहवी तसेच पोलीस प्रशासनासाठी सुद्धा सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाचे आहे. अंजनगाव सुर्जी शहरातील दोंद लकर चौक, चावडी चौक, शनिवारा चौक , लकी मेडिकल, पानअटाई चौक, मोमीनपुरा मज्जित, समोर, जुने बस स्थानक ,नवीन बस स्थानक, पोळा चौक, आलम चौक, टाकरखेडा चौक, लेंघे मार्केट, सराफ लाईन तसेच सुर्जी मधील लाला चौक, डब्बी पुरा कॉर्नर, कुरेशी मज्जित समोर, बुधवारा चौक, तहसील बंगला, तीन पुतळे समोर तर ग्रामीणमध्ये तीन पुतळे चौक पांढरी , जिल्हा परिषद शाळा चौक पांढरी, बस स्टॅन्ड कारला, बस स्टॅंड भंडारज, मुख्य स्टॅन्ड लखाड अशा एकूण ५७ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेराची शहरात तसेच ग्रामीण भागात गरज असून शासनाने याकडे लक्ष देण्याची मागणी नागरिक करीत आहे.

### सर्वज्ञ् फॉउंडेशनच्यावतीने प्याऊचे उदघाटन

**अमरावती-** सर्वज्ञ् फाउंडेशन्चे वतीने पाणपोई लावण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्ष दिपक हुंडीकर, डॉ गोविंद कासट, पुरुषोत्तम मुंदडा, अभिनंदन पेंढारी, महेंद्र देशमुख, जगदीश सायसिकमल, गोवर्धन गावन्डे, प्रा संजय शिरभाते, अरुण बनारसे, मोहन धोटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.सर्वप्रथम दिपक हुंडीकर व उपस्थितांनी श्री संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर पाणपोई चे उदघाटन करण्यात आले.गांधी चौक येथील या पाणपोईचा शुभारंभ जागतिक ग्राहक दिना निमित्य जेष्ठ समाजसेवक दीपक हुंडीकर यांचे हस्ते झाले.संचालन अभिनंदन पेंढारी तर आभार सर्वज्ञ् पावडे यांनी केले.





**अमरावती :** नवयुवक विद्यार्थी संघटना व अमरावती शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने स्थानिक राजकमल चौक येथे गुढीपाडव्याच्या पर्वावर गुढी उभारण्यात आली यावेळी काँग्रेसचे नेते सुनील देशमुख, विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, यशोमती ठाकूर, पप्पू महाराज, संजू देशमुख, बबन रडके अतुल टाले, छोटू जाधव, विकास पाध्ये, दिलीप मेहेरे, जगदीश गवळी, महेश साहू, राजेंद्र वर्मा, नंदू देशमुख, राजभाऊ जाधव, विनोद मोदी, बंडू पेटकर, प्रेम राज कुची, प्रवीण जाधव, सलीम सौदागर, राजूभाऊ परिहार, राजेंद्र बाळापुरे, बाळासाहेब देशपांडे, बाळासाहेब देशमुख, सुरेश कपूर, अतुल बिजवे, प्रदीप इंगोले, राजू खैर, राजेश आसेगावकर, अशोक नेमाडे, सतीश भुंगे, नितीन गोड भूषण परिवार, लालू रावत, संतोष साहू, मिलिंद लेंगे, प्रतीक देशमुख, शितल मुंडेगावकर, प्रवीण सोलेकर, प्रतीक सवयी, प्रवीण अग्रवाल, आकाश माहुलकर, ऐश्वर्या देशमुख, राधे देशमुख, निदान हांडोकार यांच्यासह शहरातील नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# जळका जगताप जि.प.शाळेत 'गुढीपाडवा-शाळा प्रवेश वाढवा' उपक्रम

## शिक्षणाची गुढी; अभिनव उपक्रम



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
तालुक्यातील जळका जगताप येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत गुढी पाडवा निमित्त शिक्षणाची गुढी उभारण्यात आली. शाळेत प्रवेश वाढवा हा अभिनव उपक्रम गुढी राबविण्यात आला. या अभिनव उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शैक्षणिक सत्र २०२५-२६ करिता तालुक्यात 'गुढीपाडवा-शाळा प्रवेश वाढवा' हा अभिनव राबविण्यात आला. अधिकाधिक विद्यार्थी शाळेत दाखल व्हावेत याकरिता हा उपक्रम यशस्वीपणे राबविला.गुढीपाडवा उपक्रम अंतर्गत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. उपक्रम अधिक यशस्वी व परिणामकारक करण्यासाठी जळका जगताप येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांनी त्यांच्या कल्पकतेने भर घातली. गटविकास अधिकारी डॉ. प्रफुल्ल भोरखडे, गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ, शिक्षण विस्तार अधिकारी रवींद्र दिवाण, किरण पाटील, गटसमन्वयक मंगेश उल्हे, साधनव्यक्ती श्रीनाथ वानखडे, अश्विनी पोकळे आदींच्या मार्गदर्शनात हा उपक्रम राबविण्यात आला. तसेच शाळेत शिक्षणाची गुढी उभारुन त्याचे महत्व जनसामान्यांना पटवून देण्यात आले. या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रवेशात वाढ होईल आणि ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, पालक, शिक्षक, ग्रामस्थ व आदी उपस्थित होते.

'गुढीपाडवा-शाळा प्रवेश वाढवा' या अभिनव उपक्रम कौतुकास्पद आहे.असे अभिनव उपक्रम ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक सातत्याने प्रयत्न करत असून या अभियानामुळे जिल्हा परिषद शाळांवरील विश्वास अधिक वाढेल.

**प्रसाद संकपाळ,**
गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती चांदूर रेल्वे

विद्यार्थ्यांचे प्रवेश वाढवण्यासाठी 'गुढीपाडवा,शाळा प्रवेश वाढवा' हा प्रेरणादायी उपक्रम आहे. या उपक्रमाचा उद्देश एकही विद्यार्थी शिक्षणाबाहेर राहू नये हा आहे. यासाठी शिक्षक प्रयत्नशील आहे.

**किरण पाटील,**
शिक्षण विस्तार अधिकारी
पंचायत समिती चांदूर रेल्वे

पालकांना जिल्हा परिषद शाळांच्या गुणवत्तेबाबत जागरूक करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. २० मार्च ते ३० एप्रिल या कालावधीत इयत्ता पहिलीच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी वर्ग घेण्यात येणार आहेत. या वर्गामध्ये लहान मुलांना खेळ, गाणी, गोष्टी यांद्वारे शाळेच्या वातावरणाशी परिचित करून दिले जाईल. त्यामुळे मुलांना शाळेत राहण्याची सवय लागेल आणि शिक्षणाची आवडही निर्माण होईल.

**शकील अहमद,**
उच्च श्रेणी मुख्याध्यापक,
जळका

# विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेत सुधारणा करा



## कुलसचिव डॉ. असनारे यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**
उच्च शिक्षण व्यवस्थेत समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने विद्यापीठ अनुदान आयोग यांनी १३ जानेवारी २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत सुधारणा करण्याची गरज असल्याचे निवेदन देण्यात आले. हे निवेदन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्यामार्फत सादर करण्यासाठी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांना देण्यात आले. राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चाच्या वतीने जिल्हा संयोजक प्रफुल्ल मंदा श्रीधर यांच्या अध्यक्षतेखाली हे निवेदन देण्यात आले.या वेळी नरेंद्र धर्माळे (अध्यक्ष, शिक्षण बचाव समन्वय समिती, अमरावती), विजय डवरे (संविधान जागर अभियान, अमरावती), संदीप यादव, मो. अफसर भाई (अमरावती) तसेच सामाजिक कार्यकर्ते महेश ढवळे (यवतमाळ) उपस्थित होते. या निवेदनात नमूद करण्यात आले की, सदर अधिसूचनेत 'अधिनियम, आयोग, समता, पीडित व्यक्ती, जातीय आधारित भेदभाव, संस्था प्रमुख, कर्मचारी, उच्च शिक्षण संस्था, लोकपाल, विद्यार्थी' अशा महत्त्वाच्या संज्ञांचा अर्थ स्पष्टपणे नमूद केलेला नाही. त्यामुळे अधिसूचनेची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.तसेच आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना उच्च शिक्षणात समान संधी मिळण्यासाठी आवश्यक तरतुदी स्पष्टपणे समाविष्ट करण्याची मागणी करण्यात आली. उच्च शिक्षण घेत असताना एखाद्या विद्यार्थ्यावर किंवा व्यक्तीवर भेदभावाची घटना घडल्यास त्याबाबतची चौकशी व कार्यवाही जास्तीत जास्त ३० दिवसांच्या आत पूर्ण व्हावी, अशीही सूचना या निवेदनाद्वारे करण्यात आली.यासंदर्भात सविस्तर चर्चा करून अधिसूचनेत आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# चैत्र नवरात्रात उलगडणार रामकथा

**अमरावती/प्रतिनिधी**
जनकल्याण सेवा संस्थाद्वारा संचालित' संवेदना आरोग्यसेवा प्रसार उपक्रम आणि 'डॉ. हेडगेवार हॉस्पिटल'च्या वतीने वाल्मिकी रामायणाच्या अभ्यासक प्रा. डॉ . अलका बेडेकर यांचे 'वाल्मिकी रामायणावर' आधारित 'रामायण – आदर्श जीवनाचा मार्ग' या विषयावर विशेष व्याख्यानमाला १९ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत अंबागेटच्या आत, रुग्णसेवा सदन, एकमुखी दत्त मंदिराजवळ येथे रोज दुपारी ३.४५ ते ४. ४५ या वेळेत आयोजित केली आहे.



या प्रसंगी माजी नगरसेविका कंचन विजय (दादाजी) उपाध्याय आणि संस्कृत तज्ञ अपर्णा गंधे यांची प्रमुख उपस्थिती राहिल .चैत्र प्रतिपदा ते नवमी या कालावधीत अंबागेटच्या आत, रुग्णसेवा सदन,श्रीमती लक्ष्मीबाई वाठोडकर सभागृह , श्री एकमुखी दत्त मंदिराजवळ , रितेश मेडिकलच्या गल्ली जवळ येथे १९ ते २६ मार्च या कालावधीत दु . ३.४५ वा.आयोजित रामायणाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कन्याकुमारीत अमरावतीचा डंका



**अमरावती/का.प्र.**
आयुषी पांडे व विनय सोनी यांनी Vivekananda Kendra, Kanyakumari येथे पार पडलेल्या Yoga Sastra Sangamam २०२६ या आंतरराष्ट्रीय परिषदेत उल्लेखनीय यश संपादन करत प्रथम क्रमांक पटकावून अमरावती च वाढविला. ही परिषद स्पर्धेमध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती येथील योगशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्या महाविद्यालयातील विनय सोनी (एम.ए. योगशास्त्र – प्रथम वर्ष) आणि आयुषी पांडे (बी.ए. योगशास्त्र – तृतीय वर्ष) यांनी प्रा. प्रतिक पाथरे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट पोस्टर सादरीकरण करून प्रथम पारितोषिक पटकावले व महाविद्यालयाचा गौरव वाढविला.

पोस्टर प्रेझेंटेशनची थीम 'योगश्चित्तवृत्ति निरोधः' ही होती. विद्यार्थ्यांनी सादर केलेले पोस्टर Patanjali Yoga Sutras यावर आधारित असून त्याची सुरुवात 'अथ योगानुशासनम्' या पहिल्या सूत्रापासून करण्यात आली. त्यानंतर अष्टांग योगातील यम, नियम, आसन, प्राणायाम व प्रत्याहार या बहिरंग साधनांचे वर्णन करण्यात आले, जे साधकाच्या साधनेची प्रारंभीची पायरी मानली जाते. पोस्टरमध्ये कमळपुष्पाच्या माध्यमातून भौतिक सुख व चार पुरुषार्थांचे प्रतीकात्मक दर्शन घडविण्यात आले. साधक जर भौतिक सुखात अडकला तर त्याला दुःखाचा अनुभव येतो, हे दाखवण्यासाठी पंचक्लेशांचेही चित्रण करण्यात आले.

पुढे, साधक भौतिक आसक्तीपासून मुक्त झाला तर तो अंतरंग साधनेचा अधिकारी होतो, हे एका मानवी आकृतीद्वारे दर्शविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना हनुमंत रावजी (उपाध्यक्ष, Vivekananda Kendra) यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. अमरावती येथे परतल्यानंतर पद्मश्री प्रभाकररावजी वैद्य व सचिव माधुरी चेंडके यांनी दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी विद्यार्थ्यांनी त्यांच्या पोस्टरचे सादरीकरण उपस्थितांसमोर केले. तसेच मार्गदर्शक प्रा. प्रतिक पाथरे, योगशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनील लबडे, प्रा. नितिन काळे व प्रा. प्रवीण अनसाने उपस्थित होते.

# महिला नगरसेविकांच्या सत्कारातून सशक्त समाजाची प्रेरणा

## आरोग्यम मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल चा उपक्रम : जागतिक महिला सप्ताहाचा समारोप

**अमरावती/का.प्र.**
सामाजातील प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांचा वाढता सहभाग स्त्री शक्तीच्या कर्तृत्वाची जाणीव करून देत आहे. नुकताच पार पडलेल्या मनपा निवडणुकांमध्ये ४७ महिला नगरसेविकांनी आपल्या कर्तृत्वाची साक्ष समाजाला दिली आहे. त्यांच्या कार्यातून शहराच्या विकासाला एक नवा अध्याय जोडला जाईल हे निश्चित ! एक नगरसेविका, एक महिला म्हणून त्यांचे विचार आणि कार्याला शुभेच्छा म्हणून आरोग्यम मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल अँड रिसर्च इंस्टीट्युट येथे पार पडलेला महिला नगर सेविकांचा सामुहिक सत्कार सोहळा सशक्त सामजाची ओळख करून देणारा ठरला.

अमरावती-बडनेरा मार्गावरील सातुर्णा परिसरातील डिपीएस मार्गावर नव्याने स्थापित झालेले आरोग्यम मल्टीस्पेशालीटी हॉस्पीटल व रिसर्च इंस्टीट्युट वैद्यकीय क्षेत्रामध्ये आरोग्य सेवेच्या नवीन संकल्पनांचा आदर्श समाजासमोर ठेवत आहे. सप्ताहाचा समारोप महिला नगरसेविकांच्या सत्कारातून पार पडला. आरोग्यम हॉस्पीटलच्या प्रशस्त सभागृहात आयोजित या सत्कार सोहळ्याला अध्यक्ष म्हणून हॉस्पीटलचे संचालक किरण हातगावकर,ओलावा फाऊंडेशनचे राजेंद्र टेंबे,शुभदा पोतदार, डॉ.रोहित हातगावकर यांचेसह सत्कारमुर्ती नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.यामध्ये प्रभाग क्रं.२ सुरेखा लुंगारे, प्रभाग ८ ब डॉ.अर्चना आत्राम, प्रभाग १० अ डॉ. मधुरा कहाळे, प्रभाग १२ ब प्रीती रेवणे, प्रभाग १३ अ लविना हर्षे, प्रभाग १३ क स्वाती कुलकर्णी, प्रभाग १८ अ नंदा सावदे, प्रभाग १८ क पद्मजा कौंडण्य, प्रभाव १९ ब मंजुषा



जाधव, प्रभाग १९ क लता देशमुख, प्रभाग २२ अ रजनी डोंगरे, प्रभाग २२ गौरी मेधवानी यांचा पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष किरण हातगावकर यांनी आरोग्यम हॉस्पीटल उभारण्यामागील सामाजिक ध्येय विषद करीत आरोग्य सेवेला आरोग्यमचे प्राध्यान राहील अशी ग्वाही त्यांनी दिली.डॉ. रोहित हातगावकर यांनी प्रास्ताविक द्वारे आरोग्यम हॉस्पीटल व ओलावा फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरू असलेले विविध सामाजिक उपक्रम, हॉस्पीटलमधील अद्ययावत सुविधा या बाबत माहिती दिली. संचालन आहारतज्ञ डॉ. ऋतुजा शिंगरूप तर आभार डॉ. श्रावणी भुगुल यांनी मानले.

# जनगणनेच्या कामामुळे शिक्षकांच्या उन्हाळी सुट्टीवर संक्रांत?

**अमरावती/का.प्र.**
शिक्षकांना यंदा सुट्टीमध्ये जनगणनेच्या कामाला जुंपले जाणार आहे. त्यामुळे यंदाच्या उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये गुरुजींना जास्तीचे काम लागणार आहे.शाळांच्या शैक्षणिक वर्षाचे शेवटचे दिवस सुरु आहे.३०एप्रिलला शैक्षणिक सत्र संपणार आहे.शाळांना २मे पासुन सुटया लागणार आहे.२६जून पासुन नविन शैक्षणिक सत्र सुरु होणार आहे.पण या उन्हाळ्यात शिक्षकांना सुटिचा लाभ मिळणार नाही.या दीर्घ सुटीत या वर्षाला डीजीटिल जनगणला होणार आहे.या करीता शिक्षकांचे प्रशिक्षण होणार आहे. त्यामुळे शिक्षकांच्या आनंदावर विरजण पडणार आहे.

जनगणनेसाठी नियुक्त केलेल्या शिक्षकांना १६ मे ते १५ जून या कालावधीमध्ये मुख्यालयात हजर राहण्याचे आदेश शिक्षण अधिकाऱ्यांनी काढले आहेत.त्यामुळे आता या शिक्षकांच्या सुट्ट्या रद्द केल्या आहेत.गेल्या दोन वर्षांत लोकसभा,विधानसभा, नगरपरिषदा, जिल्हा परिषदांच्या निवडणूक कामकाजात गुरफटलेल्या शिक्षकांना आपली सरकारी कामातून सुटका झाल्याचे वाटले असताना पुन्हा एकदा येऊ घातलेल्या जनगणनेच्या कामकाजाकडे त्यांना डोळ्यात तेल घालून काम करण्यासाठी सज्ज राहावे लागणार आहे.

१ मेनंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी असली तरी शिक्षकांना मात्र जनगणनेच्या कामासाठी प्रशिक्षणाचे धडे गिरवल्यानंतर १६ मे पासून ते १५ जूनपर्यंत जनगणनेच्या कामकाजासाठी शिक्षकांना आपले मुख्यालय सोडता येणार नाही. बाहेर गावच्या शिक्षकांनी मूळगावी मे महिन्यात केलेल्या नियोजनावर पाणी पडणार असून, उन्हाळ्याच्या सुट्टीतील पर्यटन, देवदर्शन, लग्नकार्य आदी कार्यक्रमावर गदा येणार असल्याने शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. राष्ट्रीय जनगणनेच्या कामासाठी जिल्ह्यातील शिक्षकांच्या नेमणुका केल्या आहेत. या कामासाठी शिक्षकांना १६ मे ते १५ जून या कालावधीमध्ये त्यांच्या मुख्यालयात उपस्थित राहावे लागेल. त्यांची सुट्टी रद्द करण्यात आली आहे.

उन्हाळ्यात शिक्षकांना दीर्घ सुटी असते.पण यावर्षा जनगणेचे कार्य शिक्षकांना करावे लागणार आहे.या दीर्घ सुटीतील कामाच्या बदल्यात शिक्षकांना विशेष रजा देण्यात याव्या कारण शिक्षक दीर्घ सुटीत काम करणारे कर्मचारी यात मोडतात म्हणून बदली रजा मिळणे आवश्यक आहे.अमरावती येथे जिल्हास्तरीय जनगणेबाबतचे अधिकारी,कर्मचारी यांचे प्रशिक्षण पार पडले आहे.या नंतर तालुकास्तरीय प्रशिक्षण होणार आहे.त्या नंतर प्रत्यक्ष जनगणनेला सुरुवात होणार आहे.

# 'मी सावित्री बोलतेय' ने केले उपस्थितांना मंत्रमुग्ध

**मोर्शी/वार्ताहर**
जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथे 'मी सावित्री बोलतेय' हा प्रभावी एकपात्री प्रयोग सादर करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या महिला तक्रार निवारण कक्ष व सांस्कृतिक विभागाच्या वतीने च्या वतीने आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमात विधिशा साठवणे बि. ए. भाग ३ या विद्यार्थीनीने 'मी सावित्री बोलतेय' हा एकपात्री प्रयोग सादर करत सावित्रीच्या धैर्य, निष्ठा आणि स्त्रीशक्तीचे प्रभावी चित्रण केले. तिच्या सशक्त अभिनयामुळे कथानकातील भावनांचा आविष्कार प्रेक्षकांपर्यंत पोहोचला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. आगरकर यांनी भूषविले, तर उद्घाटन वैशाली मगर्दे संचालिका, मिरॅकल कम्प्युटर इन्स्टिट्यूट मोर्शी यांच्या हस्ते झाले. मोर्शी शहराच्या प्रथम नागरिक प्रतीक्षा गुल्हाने या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन व मार्गदर्शन महिला तक्रार निवारण कक्षाच्या प्रमुख डॉ. लाजवंती टेम्भूर्णे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.प्रयोगाकरीता विधिशाला डॉ. लाजवंती टेम्भूर्णे व ग्रंथपाल प्रा. अरविंद एस. पाझारे यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थी, प्राध्यापक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काव्या मारन आणि 'दि हंड्रेड लीग' वाद

**है**दराबाद सनराईझर्सच्या सर्वेसर्वा आणि को ओनर असलेल्या ३३ वर्षीय काव्या मारन सध्या वादाच्या भोव-यात सापडल्या असून भारतीय जनता आणि क्रिकेट प्रेमींच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागत आहे. देशाची अस्मिता, जनभावना पायदळी तुडवत त्यांनी व्यवसायिकतेला प्राधान्य दिल्याने क्रिडा जगतात त्यांच्याविरूद्ध क्षोभ उसळला आहे. टी ट्वेंटी विश्वचषकाचे कवित्व नुकतेच संपले असून आयपीएल ची चाहूल लागली असतानाच काव्या मारनला पाक प्रेमाचा पान्हा फुटल्याने त्याचा प्रतिकूल परिणाम आयपीएल मध्ये तिच्या संघावर होण्याची चिन्हे दिसत आहेत. शिवाय सनराईझर्स हैदराबादचे ट्विटर हॅंडल सस्पेंड झाल्याने हा वाद लवकर मिटण्याची शक्यता वाटत नाही.

क्रिकेट आता केवळ एक खेळ राहिला नसून तो सोन्याची अंडी देणारी कोंबडी झाली आहे. आयपीएल याचे सर्वोत्तम उदाहरण आहे. यांत बड्या व्यावसायिकांनी धनराशी ओतल्याने त्याला ग्लॅमरस रूप आले आहे. मात्र असे असले तरीही आपल्या देशातील संघ मालकांना व्यवसायिकता टिकवून ठेवतांना देशाशी नाळ जोडून ठेवणे गरजेचे आहे आणि इथेच खरी गोम आहे. भारतीय खेळाडू विदेशी लीगमधून खेळत नाहीत. पण भारतीय मुळाचे संघमालक विदेशी लीग मध्ये त्यांच्या संघांना सहभागी करतात. अर्थातच यात वावगे काहीच नाही. पण असे करत असताना कोणत्या देशांचे खेळाडू त्यांच्या संघात सामील करून घ्यायचे यात तारतम्य बाळगणे जरूरी आहे आणि इथेच वादाची ठिणगी पडली आहे.

दी हंड्रेड लीगच्या ८ संघांपैकी आयपीएल संघातून प्रसवलेले मॅंचेस्टर सुपर जाएंट्स, एमआय लंडन, सदर्न ब्रेव्ह आणि सनराईझर्स लीड्स हे चार भारतीय मालकांचे संघ आहेत. या लीग साठी १२ मार्च २०२६ ला झालेल्या ॲक्शन मध्ये काव्या मारनने सनराईझर्स लीड्स संघासाठी पाक खेळाडू अब्रार अहमदवर जवळपास दोन करोड चौतीस लाखांची बोली लावली. भारतीय संघमालक असूनही त्यांनी पाक खेळाडूवर बोली लावल्याने त्या क्रिकेट प्रेमींच्या रडारवर आल्या आणि वादाला तोंड फुटले. सतत भारता विरुद्ध भूमिका घेणाऱ्या पाकिस्तानी खेळाडूंवर दौलतजादा करताच भारतीय जनमानस खवळले आणि सोशल मिडियात बॉयकॉट सनराईझर्सचा ट्रेंड चालू झाला.

खेळ आणि राजकारण यांची गल्लत करू नये हे कितीही सांगितले तरी देशभावनेचे काय हा प्रश्न उरतोच. ज्या पाक ने आपल्या देशावर १९४६-४७, १९६५, १९७१ आणि १९९९ अशी चार युद्ध लादली,



अपरिमित जीवित आणि वित्तहानी झाली, २००८ मुंबई, २०१६ उरी, २०१९ पुलावामा आणि २०२५ पहलगाम असे दहशतवादी हल्ले केले, त्या हल्लेखोर देशाच्या खेळाडूंसाठी पायघड्या घालण्यात काय अर्थ आहे? सैन्याची अतोनात हानी, निरपराधांचे रक्त सांडवणार्या शत्रू देशाच्या खेळाडूंना भाव देणे कितपत योग्य आहे? केवळ व्यवसायिक फायद्यासाठी देशभावनेला तिलांजली देण्याचा नीचपणा सनराईझर्स कडून झाला आहे. भलेही यांत संघ प्रशिक्षक म्हणून न्यूझीलंडचा डॅनियल वेट्टोरी, काव्या मारन सोबत उपस्थित होता परंतु संघ मालकांपुढे, त्यांच्या आवडीनिवडी पुढे कोणाचेही चालत नसते.

सनराईझर्सनी केवळ अब्रार अहमदच नव्हे तर उस्मान तारीक, फहीम अशरफ आणि सैम अयुब साठी पण फिल्डिंग लावली होती, त्यात अब्रार अहमद त्यांच्या गळाला लागला. या अब्रारच्या लीला काय वर्णाव्या, चॅम्पियन्स ट्रॉफीत शुभमनला क्लीन बोल्ड करताच घुंगरू सेठ सारखी मान हलवत सेलिब्रेशन केले होते. तर आशिया चषकात साहबजादे फरहान, हॅरीस रौफने खेळभावना न दाखवता ऑपरेशन सिंदूरची खिल्ली उडवली होती. याच अब्रारने यापुर्वी एअर स्ट्राईकच्या पार्श्वभूमीवर भारतीय वायुसेना आणि विंग कमांडर अभिनंदन वर्धमान यांची थट्टा केली होती. तर एसीसी आणि पीसीबी अध्यक्ष मोहसीन नक्वी यांनी भारतीय संघाने त्यांच्या हस्ते आशिया चषक स्वीकारण्यास नकार देताच ते आशिया चषक स्वतःसोबत घेऊन गेले.


जनक्षोभ काय असतो याचा तडाखा केकेआर संघाला यापूर्वी बसला आहे. बांगलादेशमध्ये हिंदूंवर अत्याचार होत असताना केकेआर संघाने आयपीएल साठी बांगलादेशी मुस्तफिजूर रहमानला करारबद्ध केले होते. मात्र त्यांना आपली चूक कळली आणि त्यांनी मुस्तफिजूरला बाहेरचा रस्ता दाखवला. याच नाट्यात बांगलादेशने टी ट्वेंटी विश्वचषकावर बहिष्कार टाकला परंतु त्याचा काही परिणाम स्पर्धेवर झाला नाही. उलट बांगलादेश याप्रकरणी एकाकी पडला. भलेही त्याला पाक ने पाठिंबा दिला पण स्वतः पाक संघ स्पर्धेत सहभागी होऊन नामनिराळा राहिला. तसेही भारत पाक द्विपक्षीय मालिका २००८ पासून बंद आहे, केवळ आयसीसी स्पर्धांमध्ये दोन्ही संघांची गाठ पडते. क्रिकेट सामन्याला धर्मयुद्ध समजणाऱ्या आणि सातत्याने भारता विरुद्ध आतंकवादी कारवाया करणाऱ्या पाकिस्तानशी यामुळेच द्विपक्षीय क्रिकेट मालिका बंद असून आयपीएलची कवाडे पाक खेळाडूंना २००८ पासून बंद आहेत.

या प्रकरणी काव्या मारन यांनी खुलासा केला आहे की, पाक खेळाडूंना निवडण्याचा निर्णय हा संघाची गरज, क्रिकेटींग मेरीट यावर आधारित आहे. तसेच दी हंड्रेड लीग ही भारतीय लीग नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. यावर क्रिकेट महर्षी सुनिल गावसकर यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. त्यांच्या मते पाक खेळाडूंना देण्यात येणाऱ्या पैशाचा उपयोग भारताविरूद्ध होण्याची शक्यता असून यातून पुन्हा आपल्या सैनिकांचे,निरपराध नागरिकांना रक्त वाहणार. एखाद्या लीग चे विजेतेपद मिळवण्याची किंमत भारतीयांचे प्राण देऊन चुकवणार काय हा त्यांचा प्रश्न आहे. हाच पैसा आयुधं, शस्त्रे विकत घेऊन आपल्याच विरुद्ध वापरण्यात येत असेल तर हे कितपत योग्य आहे? सनराईझर्सचा पाक खेळाडूं प्रतीचा स्नेह क्रिकेटवर अतोनात प्रेम करणाऱ्या चाहत्यांच्या जखमांवर मीठ चोळणारा आहे. क्रिकेट, क्रिकेटपटू, आयपीएल संघ, त्यांचे संघ मालक यापेक्षा इथल्या जनतेचे, चाहत्यांचे देशप्रेम सर्वतोपरी आहे आणि याचा मान राखला जावा हे काव्या मारन, सनराईझर्सला कळायला हवे.

**डॉ.अनिल पावशेकर**
मो. ९८२२९३९२८७
anilpawshekar159@gmail.com

# चिमणी वाचवा..

**२०** मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश चिमणी या पक्षाचे निसर्गातील महत्त्व अधोरेखीत करण्यासाठी..ज्याची सुरुवात २०१० मध्ये झाली. ज्या चिमण्यांच्या गोष्टी ऐकून आपण लहानाचे मोठे झालो. आई आपल्या बाळाला घास भरवताना पहिले वाक्य म्हणायची चिऊ ये ,काऊ ये, दाना खा ,पाणी पी ,भुर्कन उडून जा आणि मग मोठ्या प्रेमाने ती आपल्या बाळाला घास भरवायची. परंतु आज ती छोटीशी चिमणीच कुठे दिसेनाशी झाली काय कारण असावे? जी चिमणी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग होती तीच आज दिसेनाशी झाली आहे.अंगणात भिरभिर नजर टाकावी पण चिमणी कुठे दिसतच नाही कुठे हरवली ?कुठे गेली चिऊताई ?काही दिवसानंतर तर चिमणी येणाऱ्या पिढीला फक्त चित्रांमध्येच पहावी लागणार का?अशी परिस्थिती निर्माण होत आहे.



आजच्या काळात मोबाईल टॉवर्सचे रेडिएशन, सिमेंटची जंगले, शेतामध्ये होत असलेला रासायनिक खतांचा भरमसाठ वापर या सर्व गोष्टींमुळे आज चिमण्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.चिमण्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे हे सांगण्यासाठी दरवर्षी २० मार्च जागतिक चिमणी दिन साजरा केला जातो. चिमणी पर्यावरणासाठी किती महत्त्वपूर्ण आहे याचे उदाहरण द्यायचे झाल्यास चीनची 'ग्रेट स्पॅरो कॅम्पेन' ही एक प्रसिध्द ऐतिहासिक घटना आहे. चीनचा हुकूमशहा माओ त्से तुंग यांनी चिमण्यांना पिकांचे शत्रू मानून लाखो चिमण्यांना मारण्याचे आदेश दिले. त्यामुळे चीनमध्ये प्रचंड प्रमाणात टोळधाळ वाढून पिकांचे प्रचंड नुकसान झाले. शेतातील तोडधाळ आणि कीटक खाणारे कुणीही उरले नाही. यामुळे टोळधाळ आणि इतर कीटकांनी पिके फस्त केली. त्यामुळे चीनमध्ये अन्न धान्याचा प्रचंड तुटवडा पडला.अन्नधान्याच्या प्रचंड कमतरतेमुळे चीनमध्ये 'ग्रेट चिनी फ्रेमिन' नावाचा प्रचंड दुष्काळ पडला. ज्यामध्ये लाखो लोकांचा भुकेमुळे मृत्यू झाला. या घटनेनंतर चीनला चिमण्यांचे पर्यावरणातील महत्त्व समजले आणि चिमण्या मारणे थांबून चीनला रशियातून चिमण्या आयात कराव्या लागल्या. एवढे या छोट्याशा चिमणीचे पर्यावरणातील महत्त्व आहे .आज आपण चिमण्यांचे पर्यावरणातील हे महत्त्व जाणून चिमण्यांचे संवर्धन करणे हे आपले कर्तव्य आहे. आज चिमण्यांची संख्या प्रचंड कमी झालेली आहे याला कारणीभूत आपणच आहोत. आणि म्हणूनच २० मार्च जागतिक चिमणी दिनानिमित्त आपण संकल्प करूया चिमणीचे रक्षण करण्याची शपथ घेऊया. उन्हाळ्यामध्ये घरी लाडक्या चिऊताई साठी चारा पाणी ठेवूया.. चिमणीचे घरटे जर आपल्या आजूबाजूला कुठे असेल तर त्या घरट्याचे रक्षण करूया ! या छोट्याशा जीवाला अभय देऊया! आणि चिमणी खऱ्या अर्थाने जागतिक चिमणी दिन साजरा करूया !

**राजेश एच मुंगसे**
सहा शिक्षक शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी

# महाड चवदार तळे सत्याग्रह
# समतेच्या हक्कासाठीची जलक्रांती

**भा**रतीय समाजाच्या इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांनी केवळ एका प्रश्नाचे निराकरण केले नाही, तर संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या पाया हलवून टाकला. २० मार्च १९२७ रोजी घडलेला महाड चवदार तळे सत्याग्रह हा असा एक ऐतिहासिक टप्पा आहे, ज्याने भारतीय समाजातील अस्पृश्यतेच्या अमानुष प्रथेला उघडपणे आव्हान दिले आणि समानतेच्या लढ्याला एक नवीन दिशा दिली. हा सत्याग्रह पाण्यासारख्या मूलभूत हक्कासाठी होता, परंतु त्यामागे असलेली भावना ही मानवी सन्मान, स्वाभिमान आणि न्याय यांची होती. त्यामुळेच हा प्रसंग भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.



पाणी ही जरी सर्वांसाठी समान असणारी नैसर्गिक संपत्ती असली तरीही त्या काळात त्यावरही जातीय बंधने घालण्यात आली होती. त्यामुळे पाण्याचा प्रश्न हा केवळ जीवनावश्यक गरजेचा प्रश्न नव्हता, तर तो सामाजिक प्रतिष्ठेचा आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न होता. याच अन्यायकारक परिस्थितीविरुद्ध आवाज उठवण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुढाकार घेतला. त्यांनी अस्पृश्य समाजातील लोकांना शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आपल्या हक्कांसाठी लढण्याचे आवाहन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली समाजातील वंचित घटकांनी स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहण्याचा निर्धार केला. महाड येथे असलेले चवदार तळे हे सार्वजनिक जलस्रोत असूनही अस्पृश्यांना त्याचा वापर करण्यास मनाई होती. १९२४ मध्ये महाड नगरपालिकेने सर्वांना या तळ्याचे पाणी वापरण्याचा अधिकार देणारा ठराव मंजूर केला होता, परंतु प्रत्यक्षात हा ठराव अंमलात आणला गेला नाही.

या पार्श्वभूमीवर १९ आणि २० मार्च १९२७ रोजी महाड येथे एक ऐतिहासिक परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेला हजारो बहिष्कृत बांधव उपस्थित होते. या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण अत्यंत प्रभावी होते. त्यांनी उपस्थितांना आत्मसन्मानाची जाणीव करून दिली आणि अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा दिली. त्यांनी स्पष्ट केले की, 'आपण माणूस आहोत आणि माणूस म्हणून जगण्याचा आपला पूर्ण हक्क आहे.' त्यांच्या या विचारांनी उपस्थितांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला.

२० मार्च १९२७ रोजी हजारो लोकांनी एकत्र येऊन चवदार तळ्याकडे मोर्चा काढला. त्यांनी तळ्याचे पाणी प्राशन करून आपल्या हक्काची घोषणा केली. हा प्रसंग भारतीय सामाजिक इतिहासातील एक क्रांतिकारी क्षण होता. या कृतीमुळे अस्पृश्य समाजाने आपल्या हक्कांसाठी प्रत्यक्ष कृती केली आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध उभे राहण्याचे धैर्य दाखवले. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एक आंदोलन नव्हते, तर तो सामाजिक परिवर्तनाचा प्रारंभ होता.

महाड चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित नाही. या आंदोलनाने भारतीय समाजात समतेच्या विचारांना चालना दिली. या चळवळीच्या पुढील टप्प्यात २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृतीचे दहन करण्यात आले, ज्यामुळे सामाजिक विषमतेच्या विचारसरणीविरुद्ध एक ठोस संदेश दिला गेला. या घटनांनी भारतीय समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली आणि सामाजिक न्यायाच्या चळवळीला बळ मिळाले.


महाडचा हा सत्याग्रह भारतीय सामाजिक क्रांतीचा दीपस्तंभ आहे. त्याने आपल्याला दाखवून दिले की, बदल घडवून आणण्यासाठी धैर्य, संघटन आणि नेतृत्व आवश्यक असते. या घटनेचे स्मरण म्हणजे केवळ इतिहासाचे पुनरावलोकन नाही, तर भविष्यासाठी मार्गदर्शन आहे. चला, या ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधून आपण सर्वजण सामाजिक समतेसाठी कटिबद्ध होऊया आणि एक न्याय्य, समतावादी समाज निर्माण करूया.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# श्री स्वामी समर्थ दत्त परंपरेतील चौथा अवतार

**श्री** स्वामी समर्थ महाराजांचा श्री साईबाबा, श्री गजानन महाराज शेगाव, सद्गुरू हरिबाबा , महाराज फलटण व शंकर महाराजांवर विशेष प्रभाव पडला.श्री स्वामी समर्थ अक्कलकोट महाराजांचा अवतार हा श्री दत्त परंपरेत चौथा मानला जातो. दत्तसंप्रदायात ही परंपरा पुढीलप्रमाणे आहे. वेद आणि पुराणकाळात श्रीदत्त ही विभूती होऊन गेली. अत्रिऋषी आणि अनसूया यांचा पुत्र म्हणजे श्रीदत्तगुरू हे होत. ऐतिहासिक दृष्टीने पाहता दत्तपरंपरेतील पहिले सत्पुरुष म्हणजे श्रीपाद श्रीवल्लभ होत. पूर्वेकडील प्रांतात पीठापूर येथे १४व्या शतकात त्यांचा जन्म झाला. त्यांनी आपला अवतार संपविताना 'पुन्हा-भेटेन' असे अभिवचन भक्तांना दिले आणि त्याप्रमाणे तेच पुढे नृसिंहसरस्वती या नावाने कारंजानगर येथे (कारंजा-वऱ्हाड) जन्मास आले. त्यांच्या अवतारकार्याचा कालावधी इ.सन १३७८ ते १४५८ हा आहे. त्यांनी गाणगापूर येथे श्रीपाद श्रीवल्लभांच्या पादुकांची स्थापना केली. इ. सन १४५७च्या सुमारास ते श्रीशैल यात्रेच्यावेळी कर्दळीवनातून गुप्त झाले आणि त्यानंतर सुमारे ३०० वर्षांनी कर्दळीवनातून ते पुन्हा प्रकट झाले. तेच स्वामी समर्थ अक्कलकोट महाराज होत. ऐतिहासिकदृष्ट्या ते तिसरे सत्पुरुष असून दत्ताच्या विभूतिमत्वाचा ते 'चौथा अवतार' मानले जातात. श्री दत्तसंप्रदायात जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, माणिकप्रभू, नारायण-महाराज जालवणकर, चिदंबर दीक्षित, वासुदेवानंद सरस्वती ऊर्फ टेंबे स्वामी असे अनेक थोर सत्पुरुष होऊन गेले. श्री स्वामी समर्थांनी स्वत:च 'मूळ पुरुष वडाचे झाड, दत्तनगर हे वसतिस्थान आणि नाव 'नृसिंहभान' असे भक्तांना सांगितल्याने दत्तसंप्रदायात श्री स्वामी महाराजांचे स्वरूप श्रीदत्ताचे 'चौथे अवतारित्व' मानण्यात आले. त्यामुळे दत्तभक्त हे स्वामीभक्त झाले.

श्रीदत्तात्रयांचे तिसरे अवतार म्हणून अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ मानले जातात. आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी श्रीनृसिंहसरस्वती श्रीशैल्य येथून कर्दळीवनामध्ये गेले. तेथे ते तपश्चर्येला बसले. मध्ये साडेतीनशे वर्षे गेली. त्यांच्याभोवती वारूळ तयार झाले. एके दिवशी एक लाकूडतोडया लाकूड तोडताना त्याचा घाव चुकला आणि तो वारुळावर पडला. त्या वारुळातून श्रीस्वामी समर्थ प्रकट झाले, असे सांगितले जाते. लाकडे तोडताना कुऱ्हाडीचा घाव वारुळावर बसला व तो श्रीस्वामी समर्थांचे मांडीवर लागून श्रीस्वामी समर्थ समाधीतून जागे झाले. तो कुऱ्हाडीचा वार त्यांचे मांडीवर स्पष्ट दिसत असे. श्रीस्वामी समर्थ तेथून श्रीकाशीक्षेत्री प्रकट झाले. तेथून गंगाकाठाने कलकत्ता, जगन्नाथपुरी मार्गाने गोदावरी तीरावर आले. प्रथम श्रीस्वामी समर्थ मंगळवेढे ग्रामी प्रकट झाले. ते रानात वास्तव्य करीत. क्वचित गावात येत. गावात एक ब्राह्मण कुटुंब होते. ते श्रीस्वामी महाराज गावात आले की भोजन देत. मंगळवेढे येथील वास्तव्यानंतर श्रीस्वामी समर्थ पंढरपूर, मोहोळ, सोलापूर ह्या ठिकाणी वास्तव्य करून 'श्री' अक्कलकोट येथे आले त्या वेळी तीन दिवस स्वामींनी अन्नग्रहण केले नव्हते. चोळाप्पा यांनी स्वामींना आपल्या घरी नेले व त्यांना भोजन दिले. त्या वेळेपासून श्री चोळाप्पा स्वामींचे एकनिष्ठ शिष्य झाले.



**प्रकट दिनानिमित्य**

चोळाप्पांचे घरातील मंडळी त्यांना 'एक वेडा घरात आणून ठेवला आहे' असे म्हणत. श्री स्वामींच्या दिव्यत्वाची प्रचिती अक्कलकोट येथील मंडळीस येऊ लागली व लोक स्वामीदर्शनास येऊ लागले. राजेसाहेब भोसले यांचीही श्रीस्वामींवर दृढ भक्ती झाली. श्रीस्वामी समर्थ राजवाडयात कधी कधी जात व एखादे वेळी त्यांचा राजवाड्यातच चारचार दिवस मुक्काम असे. अक्कलकोट येथे स्वामी महाराज प्रथम आले ते खंडोबाच्या देवळातील कट्टयावर स्थानापन्न झाले. (हे खंडोबाचे देऊळ सध्याच्या एस. टी. स्टॅंडसमोर आहे.) तेथून पुढे वटवृक्षाखाली येऊन त्यांनी तप:साधना केली. बालोन्मत्तपिशाच्चवृत्तीचे ते सिद्ध पुरुष होते. आपल्या वास्तव्यात त्यांनी अनेकविध चमत्कार केले. राजापासून रंकापर्यंत अनेकांवर प्रेमाचा वर्षाव केला. 'आपण यजुर्वेदी ब्राह्मण, गोत्र काश्यप, रास मीन,' असल्याची माहितीही त्यांनी स्वत:च सांगितली आहे. शिष्यद्वय श्रीबाळप्पा व श्री चोळप्पा यांचेवरही त्यांनी कृपा केली. श्री स्वामी समर्थांची कांती दिव्य, तेज:पुंज होती. शरीराचा वर्ण गोरा होता. ते अजानुबाहू होते.

तेथून स्वामींनी संपूर्ण देशात सर्वत्र भ्रमण केले. विविध ठिकाणी ते विविध नावांनी प्रसिद्ध होते. नंतर ते मंगळवेढय़ात आले. त्यानंतर ते अक्कलकोट या ठिकाणी आले आणि शेवटपर्यंत तेथेच होते. सर्वसामान्य भाविक भक्तांना त्यांनी आपलेसे केले. सर्व जातीपातीचे, बहुजन समाजाचे आणि धर्माचे लोक त्यांच्याभोवती गोळा झाले. त्यांचे बाहय़ आचरण काही वेळा बालक भावाचे तर काही वेळा अतिशय रुद्र असे होते.त्यांनी अनेकांचा अहंकार दूर केला. अनेकांना सन्मार्गाला लावले. ज्याचा जसा अधिकार त्याप्रमाणे त्याच्यावर कृपा केली. निर्भीडता, स्पष्टवक्तेपणा आणि आत्मीयता यामुळे लाखो भक्तांना त्यांनी आपलेसे केले. त्यांच्या कार्यकाळात देशात इंग्रजांचा अंमल होता. इंग्रज शासनाच्या वरवंटय़ामध्ये जनता भरडत होती. तिचा आत्मसन्मान त्यांनी जागृत केला. त्यांच्या भक्तांमध्ये हिंदूप्रमाणेच मुसलमान, ख्रिश्चन इ. धर्माचे लोकही सामील होते. त्यांच्याभोवती मोठा शिष्य परिवार तयार झाला होता. प्रत्येक शिष्याला त्यांनी त्याच्या त्याच्या क्षमतेनुसार कार्य दिले आणि परंपरेची पताका दिली. श्रीस्वामी समर्थाच्या विविध शिष्यांद्वारे श्रीस्वामी समर्थ परंपरेचा विस्तार फार मोठय़ा प्रमाणावर झालेला आहे. यातील प्रमुख शिष्य कोल्हापूरचे कुंभार स्वामी, पुण्याचे बिडकर महाराज, मुंबईचे श्रीतात महाराज, आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वती, श्रीशंकर महाराज श्रीवामनबुवा, श्रीगुलाबराव महाराज, श्री केळकरबुवा, श्रीस्वामीसुत, श्रीआनंदभारती, श्रीगजानन महाराज, श्रीमोरेदादा, श्रीआनंदनाथ महाराज हे आहेत. या शिष्यांनी विविध ठिकाणी श्रीस्वामी समर्थाचे मठ स्थापन केले आहेत. तसेच श्रीस्वामी मंदिरे आणि सेवा केंद्रे सुरू केली आहेत.

## श्री स्वामी समर्थ

भगवान श्री विष्णूंनी जगाच्या कल्याणाकरता अनेकविध अवतार धारण केले. त्यातील श्री दत्तात्रय हा अवतार, जगाचे गुरुपद घेऊन अखिल विश्वाला मार्गदर्शन करण्यासाठी घेतला. गुरुदेव दत्त यांनी स्वतः २४ गुरू केले. विश्वात प्रत्येकाकडून काही ना काही शिकण्यासारखे असते हा संदेश दत्तगुरूंनी दिला. अनेक वर्ष कार्य करून त्यांनी पुढील कार्यासाठी पिठापूर येथे( आंध्र प्रदेश) श्रीपाद श्रीवल्लभ या नावाने अवतार धारण केला. या अवतारात अंधश्रद्धा दूर करून खऱ्या देवाची ओळख विश्वाला करून दिली. त्यानंतर १५२८ मध्ये कारंजा येथे( विदर्भ) श्री नृसिंहसरस्वती अवतारात शंभर वर्षे कार्य केले. याच काळात औदुंबर, वाडी, गाणगापूर यासारखी महान तीर्थक्षेत्रे तयार केली. श्रीगुरुचरित्र ग्रंथासारख्या दिव्य ग्रंथाची अनुभूतीयुक्त निर्मिती केली.

संपूर्ण भारतात धर्मजागृती करून हिंदू साम्राज्याची स्थापना केली. त्यानंतर नृसिंहसरस्वती स्वामी कर्दळीवनात गुप्त झाले. जिथे गुरु महाराज गुप्त झाले, त्यानंतर तीनशे वर्षांनी त्याच कर्दळीवनात एका लाकूडतोड्याच्या कुऱ्हाडीच्या घावाने मुंग्यांच्या वारुळातून श्री स्वामी समर्थ महाराज प्रकट झाले. त्यांनी भारतभर भ्रमंती केली. हैदराबाद, मंगळवेढे करत ते प्रज्ञापुरी आले. म्हणजे आत्ताच्या अक्कलकोटी आले. तेथे त्यांनी २२ वर्षे आगळ्यावेगळ्या पद्धतीने जो जो भेटेल त्याला दुःखमुक्त करून स्वयंभू बनवले. जो कोणी अनन्य भावाने चिंतन करेल त्याच्या सर्व प्रकारच्या योगक्षेमाची हमी स्वामींनी दिली.स्वामी महाराज राव- रंक, स्त्री - पुरुष असा भेद न करता, तसेच कुणाच्याही पूर्व संचिताचा मागोवा न घेता स्वामींनी सर्वांचे सर्वार्थाने कल्याणच केले. मात्र हे करताना वाऱ्या किंवा खेटया घालावयास लावल्या नाहीत. कुठेही प्रचार अथवा प्रवचने न करता संस्कृती आणि सदाचार याविषयीचे मूळ विचार मांडले. स्वामींनी हरिभाऊ नावाच्या भक्ताला पुत्र मानले होते. तसेच बाळाप्पा हा त्यांचा प्रिय शिष्य होता. त्याने ही गुरुपरंपरा अखंड चालू ठेवली. स्वामी नेहमी शिवाचा जप करीत. वटवृक्ष हा मूळ पुरुष, असे ते मानत. नेहमी ते वटवृक्षाखालीच बसायचे . स्वामींची भक्ती साधी आणि सोपी आहे. त्यांच्या अखंड नामस्मरणानेही त्यांची कृपा भक्तांवर होते. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' असे अभिवचनच स्वामींनी भक्तांना दिले. चैत्र शुद्ध द्वितीया म्हणजे स्वामीं समर्थ महाराजांचा प्रकट दिन आहे. स्वामींनी शिकवल्यानुसार सतत साधनारत राहिलो तरच या कलियुगात तरून जाणार आहोत.

**माधवी पत्की**

# डाबकी रोड खूनप्रकरणी तिघांना अवघ्या सहा तासांत ठोकल्या बेड्या

■ प्रतिनिधी | अकोला ■

*डाबकी रोड परिसरातील खूनप्रकरणाचा अकोला पोलिसांनी अवघ्या सहा तासांत छडा लावत तीन आरोपींना अटक केली. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून ही धक्कादायक घटना बुधवारी रात्री घडली असून या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली होती.*



पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना १८ मार्च २०२६ रोजी मध्यरात्री सुमारे १२ वाजताच्या सुमारास घडली. फिर्यादी शेख तनवीर शेख नासीर (वय १९, रा. भगतवाडी गल्ली क्र. ७, डाबकी रोड) हा आपल्या मित्रासह सिगारेट पिण्यासाठी डाबकी रोडवरील मुख्य रस्त्यावर असलेल्या पानटपरीवर गेला होता. त्यावेळी तेथे आरोपी अर्जुन नरेंद्र धनावत व इतर साथीदारही उपस्थित होते.

सिगारेट पित असताना आरोपी अर्जुन धनावत याने मृतक शेख मविस अमन मो. आजम (रा. जोगळेकर प्लॉट) याला 'तु मेरे तरफ क्या देख रहा' असे म्हणत वाद घातला. हा वाद चिघळताच आरोपींनी फिर्यादी व मृतकास मारहाण केली. यानंतर आरोपींनी धारदार चाकूने मविसच्या पोटात वार करून त्याला ठार मारले.

या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून डाबकी रोड पोलीस ठाण्यात अप.क्र. २३४/२०२६ अंतर्गत कलम १०३, ११५(२), ३(५) बीएनएसनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्वतः डाबकी रोड पोलीस ठाण्यात हजर राहून तपासाची सूत्रे हाती घेतली. आरोपींचा शोध घेण्यासाठी विविध पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेची मिळून एकूण आठ पथके तयार करण्यात आली. तांत्रिक माहिती व गोपनीय सूत्रांच्या आधारे पोलिसांनी वेगाने तपास करत आरोपींचा माग काढला.

या कारवाईदरम्यान खदान पोलीस ठाण्याच्या पथकाने आरोपी अर्जुन नरेंद्र धनावत (वय २३, रा. आश्रय नगर), अनिकेत संजय बाळापुर (वय १८, रा. रेणुका नगर) व विशाल दिलीप सिरसोले (वय २३, रा. गायत्री नगर) यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना पुढील कारवाईसाठी डाबकी रोड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी व उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच पोलीस निरीक्षक मनोज केदारे (खदान), पोलीस निरीक्षक दीपक कोळी (डाबकी रोड), सहायक पोलीस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस हवालदार गिरीश वीर, पोलीस कॉन्स्टेबल संदीप काटकर व भूषण मोरे यांनी या कारवाईत महत्त्वाची भूमिका बजावली. दरम्यान, क्षुल्लक कारणावरून घडलेल्या या खूनप्रकरणामुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.

# माऊंट कार्मेल अकोला शाखेला राज्यस्तरीय मूल्यमापनात 'अ +' श्रेणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

येथील माऊंट कार्मेल माध्यमिक शाळा आणि माऊंट कार्मेल प्राथमिक शाळा अकोला यांनी राज्यस्तरीय शालेय गुणवत्ता मूल्यमापनात उल्लेखनीय यश संपादन करत 'अ +' श्रेणी प्राप्त केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या 'एसक्यूएएफ' (शालेय गुणवत्ता मूल्यमापन व हमी आराखडा) अंतर्गत घेतलेल्या बाह्य मूल्यमापनात या दोन्ही शाळांनी ही मानाची श्रेणी मिळविली.



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने राज्यातील शाळांमधील शिक्षणाची गुणवत्ता तपासण्यासाठी व ती उंचावण्यासाठी 'एसक्यूएएफ' ही योजना सुरू केली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यातील १ लाख २ हजार ६७५ पेक्षा अधिक शाळांनी स्वमूल्यमापन प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यापैकी कामगिरीच्या आधारे २०२५-२६ या कालावधीत १० हजार ७१२ शाळांची बाह्य मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली. त्यापैकी १० हजार ६४४ शाळांचे मूल्यमापन यशस्वीरीत्या पार पडले. या सर्व शाळांमधून महाराष्ट्रातील केवळ ४२९ शाळांना 'अ +' श्रेणी मिळाली असून, अकोल्यातील माऊंट कार्मेल माध्यमिक व प्राथमिक शाळांनी या मानाच्या यादीत स्थान मिळविले आहे. शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या उच्च दर्जामुळे हे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. हेमंत वासेकर (आयएएस), संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी अधिकृत अभिनंदन पत्र पाठवून शाळांचे कौतुक केले आहे. या यशामागे शाळेच्या कार्यसंघाचे मार्गदर्शन लाभले असून, डॉ. फादर जोसलीन, कधिरवेल पलानी, निना मोरे, साक्षी चिंतावर, गीता सांगाणी आणि मंजू साकला यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच संपूर्ण शिक्षकवर्गाच्या सहकार्यामुळे हे यश शक्य झाल्याची भावना शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केली आहे. या यशामुळे शाळा परिवारात आनंदाचे वातावरण असून, भविष्यातही शिक्षणातील उत्कृष्टता टिकवून ठेवण्याचा व इतर शाळांसाठी मार्गदर्शक संस्था म्हणून कार्य करण्याचा संकल्प शाळेने व्यक्त केला आहे.

# हिवरखेडमध्ये गुटखा-पानमसाला विक्रेत्यावर एलसीबीची कारवाई

## त्र्याहत्तर हजारांचा मुद्देमाल जप्त ; एक ताब्यात



■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यात सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने हिवरखेड येथे गुटखा व पानमसाला विक्री-साठवणुकीविरोधात मोठी कारवाई करत ७३,२४० किमतीचा प्रतिबंधित मुद्देमाल जप्त केला.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यासाठी जिल्हाभर ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने १९ मार्च रोजी दुपारी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार हिवरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेठपुरा येथील एका घरावर छापा टाकण्यात आला.

या कारवाईत अब्दुल मुसद्दिक अब्दुल नजीक (वय २३) याच्या ताब्यातून शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व पानमसाला असा एकूण ७३,२४० किमतीचा साठा जप्त करण्यात आला.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २२३, २७४, २७५, १२३ अन्वये तसेच अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वात पार पडली.

यामध्ये पोलिस उपनिरीक्षक विष्णू बोडखे, पोलिस उपनिरीक्षक गिलबिले, हेड कॉन्स्टेबल गोकुळ चव्हाण, उमेश पराये, सुलतान खान, तसेच पोलीस कॉन्स्टेबल अन्सार अहमद, श्रीकांत पातोंड, देवानंद खरात आणि हिवरखेड पोलीस ठाण्याचे प्रमोद चव्हाण यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

# राजेश्वर कॉन्व्हेन्ट येथे नोबेल फाउंडेशनचे जयदीप पाटील यांचे मार्गदर्शन सत्र



■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक रेणुका नगर येथील राजेश्वर कॉन्व्हेन्ट येथे दि. १८ मार्च रोजी हाय स्कूल च्या विद्यार्थ्यांसाठी जळगाव येथील नोबेल फाउंडेशन चे संचालक जयदीप पाटील यांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना भविष्यातील करियर ची आव्हाने, ए आय चे वाढते स्वरूप, आजच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानांची आवश्यकता, भारताच्या विज्ञानाच्या भविष्यात विद्यार्थ्यांची भूमिका , स्पर्धा परीक्षांची तयारी यासोबत अनेक महत्त्वपूर्ण विषयांना हात घालत पाटील यांनी अतिशय प्रेरणादायी असे उद्बोधन विद्यार्थ्यांना केले. त्यांच्या सोबत रमेश पाटील उपस्थित होते. यावेळी मंचावर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विष्णू मेहरे, अध्यक्ष नंदकिशोर मेहरे, संचालिका कांचन पटोकार, मुख्याधपिका सरिता वरणकर, बालसमुपदेशक डॉ.प्रदीप अवचार, अमोल सावंत तसेच शिक्षक, विद्यार्थी, पालक प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शीतल ठाकूर तर आभार डॉ. अवचार यांनी मानले. या उद्बोधन सत्रातून मुलांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन झाल्याचे मत पालक ,शिक्षक आणि विद्यार्थी यांनी व्यक्त केले.

# धनश्री ताळेची नवोदय साठी निवड



**हिवरखेड :** जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा सौंदळा येथील इयत्ता पाचवी मध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. धनश्री बळीराम ताळे हिने सन २०२६ मध्ये घेण्यात आलेली जवाहर नवोदय विद्यालय परीक्षा उत्तीर्ण केली असून ती नवोदय प्रवेशास पात्र झाल्याबद्दल कुमारी धनश्री बळीराम ताळे हिचे सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

# शेजारी फाऊंडेशन नारी शक्तीकडून साहित्यिक पंजाबराव वर सन्मानित



■ प्रतिनिधी | अकोला ■

महिलांनी आदर्श घ्यावा असे त्यागी व्यक्तीमत्वाचा अर्थात 'गाथा रमाईची' ग्रंथ प्रकाशित करून माता रमाईचे जीवन चरीत्र रेखाटले आहे. तसेच नारी शक्तीचा आवाज बुलंद करण्यासाठी 'नारी ललकार' वृत्तपत्र चालवणारे साहित्यिक/ संपादक पंजाबराव वर यांचा शेजारी फाऊंडेशन नारी शक्तीकडून रविवार दि. १५ मार्च २०२६ रोजी त्यांना मोमेंटो व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उपशिक्षणाधिकारी प्रकाश अंधारे होते. तर मुख्य अतिथी म्हणून खदान पो.स्टे. चे ठाणेदार मनोज केदारे, उपायुक्त मनपा विजय पारतवार, डॉ. प्रज्ञा वरठे, नगरसेवक पंकज गावंडे, योगिता पावसाळे, गजानन सोनवणे, मंगला सोनवणे, अॅड. काशिद, शेजारी फाऊंडेशनचे अध्यक्ष विजयकुमार गडलिंगे आदींची उपस्थिती होती.

जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८९/२०२६ — प्रोसेस नं. १७७०/२०२६

चौ.ता. ०२/०४/२०२६ — दिनांक : ०९/०२/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती कुसूम अभिमान मोहोड २. सुनिल अभिमान मोहोड दोघेही रा. आखतवाडा, पो. आपोती खुर्द, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : अभिमान बळीराम मोहोड

**पत्ता :-** रा. व्दारा श्रीमती कुसूम अभिमान मोहोड रा. मु. आखतवाडा, पो. आपोती खुर्द, ता. जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अभिमान बळीराम मोहोड यांचे दि. १५/०८/२०२५ रोजी राहते घरी, आपोती खुर्द, आखतवाडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**

I **Shaikh Babbu Shaikh Sultan** declare that My name Is mentioned On my School Leaving Certificate is **Babbu Sk Sultan** And Mentioned on My Adhar card Is **Shaikh Babbu Shaikh Sultan** Both the Name is Belongs to Single Person that Me. From Now And Today My all entities Will Belongs to Only My name which is mentioned on Adhar card that **Shaikh Babbu Shaikh Sultan.**
Please take note.

**-Sign**
**Shaikh Babbu Shaikh Sultan**
S/o Shaikh Sultan, Uttam Chand plot,
Taar fail, Akola .

# महाराष्ट्र योग शिक्षक संघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | अकोला ■

गुढीपाडव्याच्या मंगलमय वातावरणात जानोरकर मंगल कार्यालय अकोला येथे आस्था योग फाउंडेशन व महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या वतीने गुढीपाडवा उत्सव तसेच संघाचा चौथा वर्धापन दिन १९ मार्च २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार यांच्या प्रेरणेने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत अवचार हे होते. यावेळी जिल्हाध्यक्ष सुभाष तायडे, डॉ. उल्हासराव मोकळकर तसेच प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद मुरूमकर मंचावर उपस्थित होते.

# चित्ररथाच्या संकल्पनेला अपेक्षेनुसार मिळाला प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

'वंदे मातरम' या राष्ट्रगानाचे शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी (१५०वे) वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी (१००वे) वर्ष यावर आधारित एक सांस्कृतिक परिवाराने २ चित्ररथ साकारले होते. हे चित्ररथ यंदाच्या स्वागतयात्रेचे विशेष आकर्षण ठरले. यामुळे यंदाच्या स्वागतयात्रेत सांस्कृतिक संचितासोबतच राष्ट्रीयत्वाच्या विचारधारेचेही दर्शन घडले. हा दुर्मिळ असा दुग्ध शर्करा योग आल्याने यंदा डोंबिवलीकर परिवाराने याच राष्ट्रीयत्वाच्या विषयाला अनुसरून चित्ररथ साकारले. वंदे मातरमचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव आणि रास्व संघाच्या पंचसूत्रीवर आधारित चित्ररथाच्या



संकल्पनेला अपेक्षेनुसार उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला याचा आनंद असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली. या वर्षीचे अजून एक खास आकर्षण ठरले ते म्हणजे नेहरू मैदानात उभारलेली महाकाय दीडशे फुटांची गुढी. विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. तसेच यंदाच्या वर्षी देशभक्तीची अनेक रूपं अशा आशयाची संकल्पना राबवली त्यास प्रचंड प्रतिसाद लाभला. 'क्रांतिकारी देशसेवक' या संकल्पनेवर आधारित वेशभूषा स्पर्धा झाली. त्यामध्ये ५ वर्षांच्या चिमुकल्यांपासून ७५ वर्षांच्या आजी आजोबांपर्यंत सहभाग घेतला. विजेत्यास २५,००० रुपयांची रोख रक्कम देण्यात आले तर उपविजेत्यास १५,००० पारितोषिके देण्यात आली.

# प्रभातचा नील अंभोरे राज्यात अव्वल!



**अकोला :** प्रभात किड्स स्कूलचा विद्यार्थी नील प्रवीण अंभोरे याने नॅशनल स्टँडर्ड एक्झामिनेशन इन ज्युनिअर सायन्स (NSEJS) २०२५ या प्रतिष्ठित परीक्षेत महाराष्ट्रातून टॉप १ टक्केमध्ये स्थान मिळवत राज्य टॉपर होण्याचा मान मिळवला आहे. ही परीक्षा इंडियन असोसिएशन ऑफ फिजिक्स टीचर्स (IAPT) तर्फे घेण्यात आली होती. नीलने ३८९४ विद्यार्थ्यांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या गुणवत्ता, मेहनत आणि विज्ञानातील प्रावीण्य सिद्ध केले आहे.

# रामनवमी शोभायात्रा समितीचा मातृशक्ती सन्मान

■ प्रतिनिधी | अकोला ■

माजी आ.स्व गोवर्धन शर्मा प्रणित विहीप-श्रीराम नवमी शोभायात्रा समिती व जानकीवल्लभो मातृशक्तीच्या वतीने भक्तिमय सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला.स्थानीक खंडेलवाल भवनात बुधवारी संपन्न झालेल्या या सोहळ्यात मातृशक्तीच्या वतीने गजर गजानना चा हा सांस्कृतिक सोहळा संपन्न झाला.यात विविध महिला मंडळाच्या वतीने अनेक रंगारंग कार्यक्रम संपन्न झाला.यात कथक नृत्य व विविध भक्तीमय सादरीकरण करण्यात येऊन मान्यवरां च्या हस्ते उल्लेखनीय सामजिक,सांस्कृतिक व धार्मिक सेवाकार्य करणाऱ्या महिला मंडळाचा सत्कार करण्यात आला.



श्रीमती गंगादेवी शर्मा, सुहासिनी धोत्रे,सौ मंजुषा सावरकर,जानकी वल्लभो मातृशक्तीच्या अर्चना शर्मा,पुष्पाताई वानखडे,सौ खंडेलवाल,शोभायात्रा समितीचे स्थायी अध्यक्ष कृष्णा गोवर्धन शर्मा,अध्यक्ष अरुण शर्मा, विहिप महानगर अध्यक्ष राजू मंजुळकर, राहुल राठी, मनीष बाछुका,संदीप वाणी,नितीन जोशी,गुप्ता आदीं उपस्थित होते.मातृशक्तीच्या या सोहळ्याचा प्रारंभ भगवान श्रीराम व माजी आ गोवर्धन शर्मा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आला. या कार्यक्रमात उल्लेखनीय सेवा देणाऱ्या महिला मंडळांचा सत्कार करण्यात आला.यात कराळ महिला मंडळाच्या डॉ मंजुषा उजवणे, ब्रम्हांड नायक माऊली परिवार गीता नगरच्या मुक्ता ढोले, देशमुख महिला मंडळाच्या राजश्री देशमुख,गीता परिवारच्या कल्पना भूतडा, माहेश्वरी महिला मंडळच्या वंदना हेडा, अग्रवाल महिला मंडळाच्या निशा लोहिया, मराठी ब्राह्मण महिला मंडळाच्या मंजुषा घोटीकर,खंडेलवाल महिला मंडळाच्या आरती खंडेलवाल, गुजराती ब्रह्म समाजाच्या भावना याज्ञिक,गीता परिवारच्या कल्पना भुतडा,विश्व मांगल्य सभा,नारी शक्ती,राजस्थान ब्राह्मण महिला मंडळ,उत्तर भारतीय महिला मंडळ,मारवाडी महिला मंडळ,बहुउद्देशीय महिला मंडळ,ठाकूर महिला मंडळ समवेत अनेक महिला मंडळांना शाल श्रीफळ व मोमेंटो देऊन सन्मानित करण्यात आले. यात सीमा रुहाटिया, माही देशमुख, अनिता उपाध्याय,संगीता अटलानी, काजल राजवैद्य आदींनी सहकार्य केले. मान्यवर महिलांनी आपले मनोगत व्यक्त करीत रामनवमी शोभायात्रा समिती व जानकीवल्लभो मातृशक्तीच्या वतीने आयोजित हा उपक्रम मातृशक्तीच्या वैभवशाली संस्कार व समृद्धी व परंपरेसाठी उपयुक्त असल्याचे प्रतिपादन करून या उपक्रमात आपल्या शुभेच्छा बहाल केल्यात. प्रास्ताविक अर्चना शर्मा यांनी करून या वार्षिक उपक्रमाची माहिती दिली. संचालन जया भारती, मनीषा भुसारी यांनी तर आभार पुष्पा वानखडे यांनी मानलेत.यावेळी चंदाताई शर्मा,रेखा नालट, सारिका देशमुख,कल्पना अडचुले,दिपाली वराडे,संगीता मानकर,प्रीती बुरकुटे,मनीषा देशपांडे,मीरा वानखडे, संतोषी शर्मा,मुक्ता फाफट,चित्रा फाफट, वैशाली शेगोकार,मुक्ता पुरी,चित्रा खेलपांडे,आशा वळस्कर, दिपाली शिंदे, मालती रणपिसे, सुरेखा नबापुरे, गंगाबाई नबापुरे,मीना बाजेरिया, दर्शना गोयनका, मंजुश्री झुंजूनवाला, ममता खेतान,अनीता गांधी,कविता ढोरे, कल्पना देशमुख, प्रतिभा देशमुख,सीमा देशमुख,अश्विनी देशमुख,संजीवनी देशमुख सुचिता देशमुख, शशिकला खटोड, कविता मालू, मीरा बजाज,मंजू गट्टानी, शोभा बियाणी,अनिता उपाध्याय समवेत समवेत विहिप-रामनवमी शोभायात्रा समिती व जानकीवल्लभो मातृशक्ती च्या बहुसंख्य सेवाधारी उपस्थित होत्या.

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक- प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १०६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# चैन स्नॅचिंगचा आंतरराज्यीय गँग गजाआड

## वर्धा येथिल धडक कारवाई: ११ गुन्हे उघडकीस, २०.९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा पोलिसांनी अवघ्या काही तासांत आंतरराज्यीय चैन स्नॅचिंग गँगचा पर्दाफाश करत १० चैन स्नॅचिंग व १ मोटरसायकल चोरीसंबंधी ११ गुन्हे उघडकीस आणले. या कारवाईत १२६ ग्रॅम ३७० मिली सोने, दोन मोबाईल व एक बजाज पल्सर मोटरसायकल जप्त करण्यात आला. अंदाजित मूल्य २०,९०,०००/- रुपये.

**AI व सिसिटीव्ही तपासातून निष्पन्न आरोपी हसन अली**

पोलीस अधीक्षक, सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक, सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने चार पथक तयार केले. तिन्ही चैन स्नॅचिंगच्या ठिकाणांचा रोड मॅप तयार करून सिसिटीव्ही फुटेज तपासले गेले. ᳚६ तंत्रज्ञान वापरून आरोपींची ओळख निश्चित केली गेली. हसनैन उर्फ हसन अली (वय २१, भुसावल, जि. जळगांव) हा सराईत गुन्हेगार अमरावतीतून ताब्यात घेतला गेला.

**आरोपीने कबूल केले १० चैन स्नॅचिंग प्रकरणे**

हसन अलीने २०२४ ते २०२६ दरम्यान पुलगांव, रामनगर, वर्धा शहर, यवतमाळ आणि मध्य प्रदेशातील मंडला, भोपाळमध्ये १० चैन स्नॅचिंग प्रकरणे व एक मोटरसायकल



चोरी केली. सन २०२४ व २०२५ मध्ये केलेल्या गुन्हयांत त्याचा साथीदार आतंक उर्फ सादिक इबादत अली आणि सन २०२६ मध्ये मोहंमद अली हैदु अली सहभागी होता.

**चोरीचा मुद्देमाल जप्त, विक्रीवर तपास सुरू**

आरोपीने चोरी केलेले सोने, मंगळसूत्र व मोबाईल जप्त केले. काही मुद्देमाल गहाण ठेवला गेला तर काही भागाची विक्री साथीदारांनी केली होती. जप्त केलेला मुद्देमाल १२६ ग्रॅम ३७० मिली सोने, दोन मोबाईल (एक ग्इप्दहा), बजाज पल्सर मोटरसायकल यांचा समावेश आहे.

**फरार गुन्हे अजून उघडे, पोलिसांचा सतत शोध**

हसन अली जळगांव जिल्ह्यातील ५ चैन स्नॅचिंग प्रकरणांत अद्याप फरार असून त्याच्यावर एकूण १८ गुन्हे नोंद आहेत. स्थानिक गुन्हे शाखा व सायबर शाखेच्या पथकांनी आरोपीचा शोध सुरू ठेवला आहे.

**धडक कारवाईत सहभागी पोलीस कर्मचारी**

स्थानिक गुन्हे शाखा व सायबर शाखेतील पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि इतर कर्मचारी विनोद चौधरी, विजयसिंग गोमलाडु, नरेन्द्र पाराशर, सचिन इंगोले, चंद्रकांत बुरंगे, संजय राठोड, भुषन निघोट, प्रमोद पिसे, पवन पन्नासे, अमोल नगराळे, दिपक साठे, मिथुन जिचकार, मंगेश चावरे, सुगम चौधरी, शुभम राऊत, अरविंद इंगोले, दिनेश बोधकर, गोविंद मुंडे, अक्षय राऊत, स्मिता महाजन, अखिल इंगले व रितेश गेटमे यांनी जबरदस्त कार्य केले.

**पोलिसांचा सतर्कतेचा इशारा**

वर्धा पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले की, सार्वजनिक ठिकाणी सतर्क राहावे, संशयास्पद हालचाली लगेच पोलीस ठाण्यात कळवाव्यात आणि स्वतःची सुरक्षा सुनिश्चित करावी.

# गुढी उभारली स्वच्छतेची : मोझरीत नववर्षाची सुरुवात श्रमदानाने

## युवकांचा पुढाकार; गावकऱ्यांचाही उत्स्फूर्त सहभाग

**मोझरी (शेकापूर)/ जनमाध्यम**

गुढीपाडव्याच्या पवित्र निमित्ताने मोझरीत यंदा फक्त गुढीच उभारली नाही, तर स्वच्छतेचीही पताका अभिमानाने फडकवली गेली. सकाळच्या पहाटेपासून गावातील युवकांनी एकत्र येत सामूहिक स्वच्छता अभियान राबवून सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.

नववर्षाची सुरुवात स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी वातावरणात व्हावी या उदात्त हेतूने गावातील मुख्य रस्ते, मंदिर परिसर, सार्वजनिक ठिकाणे आणि गल्लीबोळ झाडून काढण्यात आले. हातात झाडू आणि फावडे घेऊन युवकांनी



कचरा संकलन करत गावाला नवे रूप दिले.युवकांचा हा जोश पाहून गावातील ज्येष्ठ नागरिकही घराबाहेर पडले आणि त्यांनीही या उपक्रमात खांद्याला खांदा लावून सहभाग घेतला. स्वच्छ गाव सुंदर गाव हा संदेश केवळ घोषणांपुरता न राहता प्रत्यक्ष कृतीतून साकारला गेला.या उपक्रमामुळे गावाच्या विकासाला चालना मिळत असल्याचे मत ग्रामपंचायत सदस्य अमोल पंधराम यांनी व्यक्त केले. तसेच भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांची परंपरा कायम ठेवण्याचा निर्धार युवकांनी केला.दरम्यान, बुधवारी सायंकाळी पार पडलेल्या बैठकीत गावविकासासाठी लोकसहभाग वाढवण्याचा ठाम संकल्प व्यक्त करण्यात आला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांच्या नेत्यांना गावाच्या विकास आराखड्याबाबत जाब विचारण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.गुढीपाडव्याच्या या स्वच्छता अभियानामुळे मोझरीत सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असून, स्वच्छता हीच खरी सेवा हा संदेश प्रत्येकाच्या मनात रुजला आहे.

# ज्ञानदीपाची १५६ वर्षे; 'गीतरामायण'ने उजळणार सांस्कृतिक सोहळा

**वर्धा/ जनमाध्यम**

ज्ञान, संस्कृती आणि वाचनपरंपरेचा वारसा जपणाऱ्या सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालयाचा १५६ वा वर्धापन दिन यंदा श्रीरामनवमीच्या निमित्ताने विविध सांस्कृतिक उपक्रमांनी साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर २२ ते २५ मार्च २०२६ दरम्यान 'अजरामर गीतरामायण' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, चार दिवस ग्रंथालय परिसरात भक्तीमय आणि सांस्कृतिक वातावरण अनुभवायला मिळणार आ

महाराष्ट्रातील अजरामर काव्यकृती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'गीतरामायण'ची निर्मिती प्रख्यात कवी ग. दि. माडगूळकर यांनी केली आहे. प्रभू श्रीरामांच्या जीवनावर आधारित असलेले हे काव्य आजही रसिकांच्या मनात घर करून आहे. या कार्यक्रमात गीतरामायणातील निवडक प्रसंगांचे सादरीकरण गायन आणि नृत्याच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.कार्यक्रमाचे आयोजन ग्रंथालयाच्या सभागृहात दररोज सायंकाळी ६ वाजता करण्यात आले आहे. या कार्यक्रमात भैरवी काळे, केतकी कुळकर्णी कवीनेसन, नितिन वाघ, प्रशांत दुधाने आणि मनीष खडतकर हे गायक आपली कला सादर करणार आहेत. तसेच सुरमणी वसंत जळीत, नरेंद्र माहुलकर, शाम सरोदे, राजेंद्र झाडे आणि शैलेश देशमुख हे वादक साथ देणार आहेत.कार्यक्रमात गीतरामायणातील विविध प्रसंगांचे नृत्यरूप सादरीकरणही विशेष आकर्षण ठरणार आहे. नृत्य संयोजन चंद्रकांत सहारे यांनी केले असून, हर्षदा वसाके, चंचल डगवार, आनंदी वानखेडे, अनुश्री खंगार, उर्वी सिंगम, ऐशिता बेले, वृषाली मोहनापूरे आणि उपासना मेश्राम हे नृत्य कलाकार सहभागी होणार आहेत.ग्रंथालयाच्या १५६ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीचा साक्षीदार असलेला हा वर्धापन दिन सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध करण्यासाठी आयोजकांनी विशेष पुढाकार घेतला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत रामकथा आणि मराठी सांस्कृतिक वारसा पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.या चार दिवसीय कार्यक्रमाला वर्धेकर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आकाशातील घटना समजून घ्या, अंधश्रद्धेला बळी पडू नका : गजेंद्र सुरकार

**वर्धा/ जनमाध्यम**

आकाशगंगेतील विविध खगोलीय घटना या नैसर्गिक प्रक्रियेचा भाग असून त्यांचा मानवी जीवनावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही. त्यामुळे या घटनांकडे भीतीने नव्हे तर वैज्ञानिक व चिकित्सक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले.

शहरातील पीएमश्री दर्जा प्राप्त नगर परिषदेच्या चित्तरंजनदास प्राथमिक शाळेत 'एक्स्पर्ट टॉक' अंतर्गत खगोलीय ग्रह, तारे यांची ओळख या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते मार्गदर्शन



करत होते.सुरकार यांनी आपल्या भाषणात तारे तुटणे, धूमकेतू, सूर्यग्रहण, चंद्रग्रहण, अमावस्या व पौर्णिमा यांसारख्या घटना लाखो वर्षांपासून घडत असल्याचे सांगितले. मानवाच्या अस्तित्वापूर्वीही या घटना घडत होत्या, त्यामुळे त्यांचा मानवी जीवनावर कोणताही वाईट परिणाम होत नाही, हे त्यांनी स्पष्ट केले. ग्रहण किंवा इतर खगोलीय घटना या केवळ सावल्यांचा खेळ असून त्यामागे वैज्ञानिक कारणे आहेत,असे त्यांनी नमूद केले.यावेळी त्यांनी खगोलशास्त्राची मूलभूत माहिती, सौरमालेची रचना, पृथ्वीची निर्मिती, तसेच सजीव सृष्टीचा विकास याविषयी सविस्तर माहिती दिली. कोपर्निकस, ब्रुनो व गॅलिलिओ यांसारख्या शास्त्रज्ञांचे योगदानही त्यांनी अधोरेखित केले. पावर पॉइंट सादरीकरण व ॲनिमेशन व्हिडिओच्या साहाय्याने त्यांनी विद्यार्थ्यांना विषय सोप्या व रंजक पद्धतीने समजावून सांगितला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मुक्ता कोठेकर होत्या. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तळवडेकर, पालक समिती सदस्या पूनम कुरसंगे,रविता मेश्राम तसेच अंनिसचे सोशल मीडिया विभाग प्रमुख भूषण खैरकार उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मुक्ता कोठेकर यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षिका रश्मी भोयर यांनी केले तर आभारप्रदर्शन भूषण खैरकार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निशा श्रीवास्तव, रंजना तांबुलकर, सुनिता धोंगडे,शीतल शोक्कळवार यांनी परिश्रम घेतले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्यास मदत झाली असून अंधश्रद्धेविरोधात जागरूकता निर्माण झाली आहे.

# पाडव्याच्या पहाटे स्वरांची उधळण; वर्धा येथे सांस्कृतिक सुरांनी नववर्षाचे स्वागत



**वर्धा/ जनमाध्यम**

गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या मंगलमय निमित्ताने वर्धा शहरातील सोशालिस्ट चौकात 'पाडवा पहाट' या बहारदार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेच्या कोवळ्या प्रकाशात सुमधुर संगीताच्या सुरांनी वातावरण भारून गेले आणि नववर्षाच्या स्वागताला एक वेगळीच सांस्कृतिक झळाळी लाभली.

या कार्यक्रमाला वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी उपस्थित राहून कलाकारांच्या सादरीकरणाचा मनमुराद आस्वाद घेतला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह लाभला. यावेळी माजी खासदार दत्ताजी मेघे तसेच माजी खासदार सुरेश वाघमारे यांचीही उपस्थिती लाभली.'पाडवा पहाट' या उपक्रमात विविध गायक-वादकांनी सादर केलेल्या सुरेल गीतांनी उपस्थित श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. पारंपरिक आणि आधुनिक संगीताचा संगम साधत नववर्षाची सुरुवात आनंददायी वातावरणात झाली.गुढीपाडव्याच्या पवित्र सणानिमित्त आयोजित या कार्यक्रमाने वर्ध्यातील सांस्कृतिक परंपरेला उजाळा देत नव्या वर्षाच्या सुरुवातीला उत्साह, आनंद आणि एकतेचा संदेश दिला.

**नियमभंगाचा फटका**

# बोर व्याघ्र प्रकल्पात ४ जिप्सी व ४ गाईड निलंबित

## वेळेपूर्वी बाहेर पडणे, उशिरा प्रवेश व बफरमध्ये भटकंती महागात

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील बोर धरण परिसरातील बोर व्याघ्र प्रकल्पात जंगल सफारीदरम्यान वनपर्यटनाच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी चार जिप्सी चालक व चार निसर्ग मार्गदर्शकांवर वनविभागाने कडक कारवाई करत दहा दिवसांसाठी निलंबित केले आहे. पर्यटकांच्या सुरक्षिततेशी संबंधित बाब गंभीर मानून हा निर्णय घेण्यात आला असून संबंधितांना २६ मार्चपर्यंत पर्यटन क्षेत्रात प्रवेशबंदी घालण्यात आली आहे.

बोर व्याघ्र प्रकल्पातील समृद्ध जैवविविधता, व्याघ्र दर्शनाची शक्यता आणि शांत वनपरिसर यामुळे जिल्ह्यासह राज्यातील पर्यटक येथे मोठ्या संख्येने येतात. सफारीदरम्यान वाहनांची हालचाल, वेळापत्रक, मार्ग आणि वर्तनाबाबत वनविभागाने कठोर नियम निश्चित केले आहेत. मात्र १६ मार्च रोजी सकाळच्या फेरीत बोरधरण पर्यटन गेटवरून कोअर क्षेत्रात गेलेल्या काही जिप्सींनी या नियमांना बगल दिल्याचे आढळले.वन अधिकाऱ्यांच्या नोंदीनुसार एमएच-३२ एएच-१२३५, एमएच-१२ क्यूएम-०१०१, एमएच-३२ एएच-१३०७ आणि एमएच-३२ एएच-२४४१ या जिप्सींचे चालक तसेच त्यांच्यासोबत असलेले मार्गदर्शक विक्रम चिकराम, सचिन लोखंडे, मंगेश खोब्रागडे व मनोज वाघमारे यांनी पर्यटकांना निर्धारित वेळेपूर्वीच पर्यटन क्षेत्रातून बाहेर काढले. काही वाहनं बफर क्षेत्रात विनाकारण फिरताना आढळली, तर एका जिप्सीने निर्धारित वेळेपेक्षा सुमारे १५ मिनिटे उशिरा प्रवेश केल्याचे निदर्शनास आले.या घटनांमुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होऊ शकतो तसेच वन्यजीव व्यवस्थापनावर परिणाम होऊ शकतो, असा नष्किर्ष काढत वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी संबंधित चालक व गाईड यांना १७ ते २६ मार्च या कालावधीसाठी निलंबित केले आहे. निलंबन काळात संबंधित वाहनांना आणि गाईडना कोअर किंवा बफर अशा कोणत्याही पर्यटन क्षेत्रात प्रवेश देण्यात येणार नाही. बोरधरण व अडेगाव या दोन प्रवेशद्वारांतून कोअर क्षेत्रात जंगल सफारीची परवानगी दिली जाते. बोरधरण



गेटवरून दररोज सुमारे १५ तर अडेगाव गेटवरून ८ जिप्सी प्रवेश करतात. मात्र अडेगाव गेटवरून जाणाऱ्या काही चालक-गाईडांकडून नियमभंग होत असल्याची चर्चा पर्यटकांमध्ये सुरू आहे.

काही प्रकरणांमध्ये सफारीदरम्यान वाहनांच्या काचा उघडून धोकादायक पद्धतीने बसणे, निर्धारित मार्ग सोडणे किंवा वन्यजीव दर्शनाची माहिती देण्यासाठी प्रतिबंधित क्षेत्रात मोबाईलचा वापर करणे अशा प्रकारांबाबतही तक्रारी असल्याचे सांगितले जाते.वनविभागाने वनपर्यटनाचे नियम सर्वांसाठी समान असून पर्यटकांची सुरक्षा आणि वन्यजीवांचे संरक्षण सर्वोच्च असल्याचे स्पष्ट केले आहे. या कारवाईमुळे सफारी व्यवस्थेत शिस्त राखण्याचा संदेश देण्यात आला असून भविष्यात नियमभंग करणाऱ्यांवर आणखी कठोर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे.

**निलंबितावर आरोप?**

वनविभागाच्या कारवाईत समाविष्ट चार जिप्सी व गाईडवर वेगवेगळे आरोप ठेवण्यात आले आहेत.एमएच-३२ एएच-१२३५ (विक्रम चिकराम) पर्यटकांसह सुमारे २ तास आधी क्षेत्राबाहेर आल्याचा आरोप एमएच-१२ क्यूएम-०१०१ (सचिन लोखंडे) अडीच तास आधी बाहेर पडल्याचा ठपका एमएच-३२ एएच-१३०७ (मंगेश खोब्रागडे) दीड तास आधी क्षेत्र सोडल्याचा आरोप एमएच-३२ एएच-२४४१ (मनोज वाघमारे) १५ मिनिटे उशिरा प्रवेश केल्याचा आरोप.

## संक्षिप्त

### लोखंडी पट्टी, रॉडने मारहाण

**वर्धा** - पिपरी मेघे भागातील शिव पार्वती मंगल कार्यालयासमोर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी दोन जणांवर लोखंडी पट्टी व रॉडने हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला असून दुसऱ्याला किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी आदित्य अजय खत्री (रा. इतवारा, वर्धा) यांच्या तक्रारीवरून रामनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिरजू मोतीराम जाधव व सुरेश मोतीराम जाधव (दोन्ही रा. गजानन नगर) यांच्याविरुद्ध कारवाई सुरू आहे. हल्ल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### नातवास भीती दाखविणाऱ्यास रोखल्याने मारहाण

**हिंगणघाट** - तालुक्यातील सातेफळ येथे नातवाला धमकावणाऱ्यांना जाब विचारल्याच्या रागातून महिलेसह तिच्या मुलावर तिघांनी हल्ला केल्याची घटना घडली. यात शकुंतला विठ्ठल पावडे व गजानन पावडे हे जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी अरुण बलखंडे, मंदा बलखंडे व विकास बलखंडे (रा. सातेफळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस करीत आहेत.

### ंशियास्पद मृत्यूचे गूढ उलगडले

**समुद्रपूर** - तालुक्यातील शेडगाव येथे आढळलेल्या संशयास्पद मृत्यूच्या प्रकरणाचा उलगडा झाला आहे. पियुष अरुण वैद्य (रा. मांडगाव) याचा मृतदेह शेतात कुजलेल्या अवस्थेत आढळून आला होता. सुरुवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र शवविच्छेदन अहवाल व तपासाअंती त्याचा मृत्यू शेतातील तारेच्या कुंपणात सोडलेल्या विजेच्या प्रवाहामुळे झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी संबंधितांवर बीएनएसएसच्या कलम १०५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### चार ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या चोरी

**अल्लीपूर** - अज्ञात चोरट्यांनी उभ्या असलेल्या चार ट्रॅक्टरच्या बॅटऱ्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. शेतकऱ्यांच्या मालमत्तेवर डल्ला मारणाऱ्या चोरट्यांमुळे परिसरात चिंता व्यक्त होत आहे. या प्रकरणी धनराज रामराव सुपारे (रा. अल्लीपूर) यांनी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करून तपास सुरू केला आहे. चोरी गेलेल्या बॅटऱ्यांची किंमत मोठी असल्याचे सांगण्यात येत आहे. ग्रामीण भागात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

### अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर जप्त

**आष्टी** - पोलिसांनी खडकपूरा-आष्टी मार्गावर नाकेबंदी करून अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला. तपासादरम्यान रेती चोरीची असल्याचे समोर आले. पोलिसांनी अजय उर्फ रोहित राजू थोरात (रा. तळेगाव ठाकूर, तिवसा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत ट्रॅक्टर व रेतीसह सुमारे ६ लाख ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे अवैध रेती व्यवसायावर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

### भरधाव कारची पादचाऱ्याला धडक

**समुद्रपूर** - तालुक्यातील नंदोरी शिवारात भरधाव कारने पादचाऱ्याला धडक दिल्याची घटना घडली. ट्रकचे डिझेल संपल्याने चालकाचा मुलगा डिझेल आणण्यासाठी पायी जात असताना हा अपघात झाला. यात संबंधित तरुण जखमी झाला असून त्याला उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी रामदयाल पचकौडी धुर्वे (रा. जुरतरा, मध्यप्रदेश) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

### पेट्रोलपंपातून ४२ हजारांची चोरी

**पुलगाव** - पुलगाव-वर्धा मार्गावरील पेट्रोलपंपातून अज्ञात चोरट्याने रात्रीच्या सुमारास ४२ हजारांची रोकड चोरून नेल्याची घटना घडली. पेट्रोल विक्रीची रक्कम कार्यालयातून लंपास करण्यात आली. या प्रकरणी आदित्य अजित पाटणी (रा. नाचणगाव) यांनी तक्रार दिली आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. चोरीच्या वाढत्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

### जुन्या वादातून मारहाण

**पुलगाव** - बोदड मलकापूर येथे जुन्या वादातून एका तरुणाला मारहाण केल्याची घटना घडली. तेजस बंडू गावंडे हे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी प्रेम बुरांडे व राहुल मिसार (रा. मलकापूर बोदड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरकोळ वादातून अशा प्रकारच्या घटना घडत असल्याने चिंता व्यक्त होत आहे. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### शेतकऱ्याची आत्महत्या

**सिंदी** -परिसरातील पळसगाव बाई येथे शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. विजय आनंद पिसुर्डे असे मृताचे नाव आहे. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या वाढत्या समस्यांमुळे चिंता व्यक्त केली जात आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ११२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# आजच्या युगात विद्येसोबत भक्ती-शक्तीची जोड आवश्यकः डॉ.श्रीकांत चेंडके

## विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयात वैद्य वि.गं.हिर्लेकर स्मृती पुरस्कार वितरण सोहळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** वैद्यकीय क्षेत्रामध्ये शिक्षण घेतांना विद्येसोबत भक्ती आणि शक्तीची जोड आजच्या युगात अत्यावश्यक आहे. कारण वैद्यकीय क्षेत्रात ज्ञानासोबत भावना सुद्धा महत्वाची असते. रुग्णांवर उपचार करणे ही सेवा असून या सेवा क्षेत्राला बळ देण्याकरिता भक्ति आणि शक्ती विकसित करा असे मार्गदर्शन श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके यांनी केले तसेच विद्यार्थ्यांनी बौद्धिक उंचीबरोबर चारित्र्य, साधना व सेवाभाव जोपासण्याचे आवाहन केले.

श्री ह.व्या.प्र. मंडळ द्वारा संचालित विदर्भ आयुर्वेद महाविद्यालय, अमरावती येथे वैद्य वि. गं. (भैय्यासाहेब) हिर्लेकर स्मृती न्यास व श्री हव्याप्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने गुणवंत विद्यार्थी व कर्मचारी पुरस्कार २०२६ हा वार्षिक हिर्लेकर स्मृती पुरस्कार वितरण समारंभ दिनांक १३ मार्च २०२६ रोजी उत्साहात संपन्न झाला. ह्या कार्यक्रमाला अध्यक्ष व प्रमुख मान्यवर म्हणून डॉ. श्रीकांत चेंडके, डॉ. जयंत पांढरीकर, डॉ. रविंद्र वाघमारे व डॉ. संजय चोपकर यांची उपस्थिती लाभली. धन्वंतरी पूजन, मान्यवरांचा परिचय, हिर्लेकर न्यास विषयी माहिती व विविध शैक्षणिक पुरस्कारांचे वितरण असे सोहळ्याचे स्वरूप होते.



प्रथम वर्षापासून अंतिम वर्षापर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांना एकूण ३४ विविध पुरस्कार वितरित करण्यात आले. यामध्ये प्रत्येक वर्षातील सर्वप्रथम क्रमांक, विषय प्राविण्य (शरीर रचना, शरीर क्रिया, संस्कृत, रसशास्त्र, द्रव्यगुण, रोगनिदान, पंचकर्म, शल्यतंत्र इ.), आदी विषयांचा समावेश होता. प्रथम वर्षात सर्वप्रथम क्रमांक - तनुश्री चोपडे, दुसऱ्या वर्षात सर्वप्रथम क्रमांक मानसी हरीणखेडे, चौथ्या वर्षात सर्वप्रथम क्रमांक - वैष्णवी धुळे यासह इतर गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांना वैद्य गंगाधर सखाराम हिर्लेकर, वैद्य पुरुषोत्तम सखाराम हिर्लेकर, वैद्य श्रीनिवास पुरुषोत्तम हिर्लेकर आदि प्रभृतींच्या नावाने तसेच विविध दात्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ - रोख रक्कम, पुस्तके व स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले. हे पुरस्कार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व सर्वांगीण विकासा करीता प्रोत्साहन देतील. उत्कृष्ठ महाविद्यालयीन कर्मचारी पुरस्कार चंद्रकांत वनजकर व उत्कृष्ठ रुग्णालयीन कर्मचारी पुरस्कार – जयश्री मेटकर यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संयोजन डॉ. विलोभ भारतीय यांनी केले. त्यांनी हिर्लेकर स्मृती न्यासाचा परंपरागत वारसा आणि या पुरस्कारांचे महत्त्व स्पष्ट केले. यानंतर श्रीरंग हिर्लेकर यांनी न्यासाच्या कार्याचा परिचय करून दिला. डॉ. जयंत पांढरीकर यांनी मुलांनी आपल्या ज्ञानासोबत सामाजिक बांधिलकी देखील वाढवावीं अशी प्रभावी भूमिका मांडत, समाजाशी संवेदनशील नातं ठेवणारं, जबाबदार व समतोल व्यक्तिमत्त्व घडविण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे संचलन कांक्षिणी पोहने यांनी केले.

# एटीएम कार्डची अदलाबदल करून ५८ हजारांची फसवणूक

## -वृद्धाला गंडविले; शाम चौक येथील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाणे हद्दीतील शाम चौक परिसरात एटीएम कार्डची अदलाबदल करून ७० वर्षीय वृद्धाच्या खात्यातून ५८ हजार ७०० रुपये काढल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना २८ फेब्रुवारी रोजी घडली असून, पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार सैयद शौकत सैयद हबीब (वय ७०, रा. आसमा कॉलनी, नागपुरी गेट) हे २८ फेब्रुवारी रोजी पैसे काढण्यासाठी शाम चौक येथील एसबीआय बँकेच्या एटीएमवर गेले होते. त्यांनी मशीनमध्ये कार्ड टाकून दोन ते तीन वेळा पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पैसे निघाले नाहीत. यावेळी त्यांच्या मागे उभ्या असलेल्या एका अज्ञात व्यक्तीने 'मी पैसे काढून देतो' असे सांगून विश्वास संपादन केला. सैयद शौकत यांनी त्याच्यावर विश्वास ठेवून एटीएम कार्ड दिले. आरोपीने काही वेळ प्रयत्न केल्याचे नाटक करत एटीएम कार्डची अदलाबदल केली. दरम्यान, ३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी खात्याची शिल्लक तपासल्यावर ५८ हजार ७०० रुपये कमी असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी बँकेत चौकशी केली असता त्यांच्या जवळ असलेले एटीएम कार्ड हे अरुण सालुंखे यांच्या नावाचे असल्याचे समोर आले. तसेच त्यांच्या मूळ एटीएम कार्डद्वारे पाच वेळा एकूण ५८ हजार ७०० रुपये काढण्यात आल्याचे उघड झाले. या प्रकरणी सैयद शौकत यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# वीर चौकडे ची नवोदय विद्यालयाकरीता निवड



**नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः-** स्थानिक एकलव्य गुरूकुल स्कूल या विद्यालयात वर्ग पाचवी मध्ये शिकत असलेला नांदगाव खंडेश्वर येथील वीर उमेश चौकडे या विद्यार्थ्याची नवोदय विद्यालयाकरीता निवड झाली. नुकत्याच झालेल्या नवोदयच्या परीक्षेमध्ये या विद्यार्थ्याला ९३.७५ टक्के मार्क मिळाले असल्यानेहा विद्यार्थी शहरी विभागातून नवोदय विद्यालयाकरिता पात्र ठरला. शाळेच्या शिक्षकांसह सर्व स्तरावरून या विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. तो या यशाचे श्रेय आई वडील व शिक्षकांना देत आहे.

# विद्याभारती महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधी :-** स्थानिक विद्याभारती महाविद्यालयाच्या कला विभागाच्या वतीने शिक्षक–पालक मेळाव्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या मेळाव्यास कला शाखेच्या विद्यार्थ्यांचे पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मुलामुलींच्या शैक्षणिक प्रगतीची माहिती जाणून घेतली. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा येनकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा मेळावा संपन्न झाला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांची उपस्थिती, शैक्षणिक प्रगती, अभ्यासातील अडचणी तसेच महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सोयी-सुविधांची माहिती पालकांना देण्यात आली. करिअर



काऊन्सिलिंग सेल, स्पर्धा परीक्षा विभाग तसेच प्लेसमेंट सेलमार्फत सर्व शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्यांबाबत कला विभागाचे समन्वयक डॉ. गजानन बनसोड यांनी सविस्तर माहिती दिली.

ग्रंथालयातील विविध सुविधा तसेच 'विद्यानिकेतन स्टडी सेंटर'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उपलब्ध होणाऱ्या अभ्यास सुविधांबाबत डॉ. ए. डी. चव्हाण, डॉ. एस. डी. वाकोडे व डॉ. एम. एम. खेरडे यांनी मार्गदर्शन केले. इंग्रजी विभागामार्फत राबविण्यात येणारे संवाद कौशल्य व मुलाखत तंत्र प्रशिक्षण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कसे उपयुक्त ठरते, याविषयी डॉ. व्ही. पी. शेकोकार यांनी माहिती दिली. या मेळाव्याचे यशस्वी आयोजन डॉ. डी. एस. रंगाचार्य, डॉ. अमित इंगोले व प्रा. अजय वासेकर यांनी केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली.

यावेळी पालक व प्राध्यापक यांच्यात मुक्त संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पालक व महाविद्यालय यांचे परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या पालक मेळाव्यामुळे पालक व महाविद्यालय यांच्यातील संवाद अधिक दृढ होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस निश्चितच चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# किरण महल्ले यांची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** किरण उमेश महल्ले यांची राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी ही नियुक्ती केली असून, या निवडीमुळे अमरावती जिल्ह्यासह संपूर्ण राज्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर चमकले आहे.



किरण महल्ले यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना ही मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या मागासवर्ग आयोगावर काम करण्याची संधी मिळाल्याने, मागासवर्गीयांच्या समस्या आणि प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी या नियुक्तीचा मोठा उपयोग होणार आहे. त्यांच्या या निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रामायण वाचन-श्रवणाने पापमुक्ती होतेः प्रा.डॉ.अलका बेडेकर

## डॉ.हेडगेवार हॉस्पीटल व जनकल्याण सेवा संस्थेचा उपक्रम

### रामायण कथा २६ मार्चपर्यंत

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री वाल्मिकी रामायणाचा प्रारंभ होतो तो बालकांडाने , बालकांडात ७७ सर्ग असून वाल्मिकी ऋषींनी तपःसामर्थ्याने राम चरित्र जाणून घेतले.वाल्मिकी रामायणातील 'बालकांड' हे पहिले आणि महत्त्वाचे कांड आहे, ज्यात प्रभू रामाचा जन्म, बालपण, शिक्षण, विश्वामित्रांसोबतचा प्रवास, ताटकेचा वध, अहल्या उद्धार आणि सीता स्वयंवराची कथा वर्णन केली आहे . रामकथा वाचन व श्रवणाने पापमुक्त होऊन इच्छित फलप्राप्ती होते . म्हणून राम नवरात्रात रामायण श्रवण , पठण करू या , असे आवाहन वाल्मिकी रामायण उलगडताना प्रा . डॉ. अलका बेडेकर यांनी केले .





जनकल्याण सेवा संस्था संचालित अंबागेटच्या आत दत्त मंदिरात डॉ . हेडगेवार हॉस्पीटलचे होमिओ व सुजोक उपचार केंद्र रुग्णसेवा सदनात श्री राम नवरात्रात प्रा. डॉ. अलका बेडेकर यांच्या वाल्मिकी रामायणा वरील व्याख्यानाचा श्री गणेशा झाला . या प्रसंगी डॉ . बेडेकर बोलत होत्या . व्यासपीठावर डॉ . बेडेकर , संस्थेचे सचिव गोविंद जोग आणि माजी नगरसेविका कंचन उपाध्याय होत्या .

अतिथींचे स्वागत गोविंद जोग आणि सेवाव्रती वनिता कविमंडन यांनी केले .

रामायणात निसर्ग, आयुर्वेद ,राजवंशाचे वर्णन ,शुभ अशुभ, शकुन अपशकुन, राजकारण, अर्थकारण ,पुत्रधर्म, राजधर्म, अथर्ववेदातील मंत्र तंत्र, व्यवहार कुशलता व धर्मशास्त्र या सगळ्यांवर प्रकाश टाकणारे असल्यामुळे यावतचंद्र दिवाकरौ असे मार्गदर्शक ठरणारे आहे . राक्षसांचा निःपात करणारी ही रामकथा म्हणजे वाल्मिकी रामायण होय.

बालकांड, अयोध्या कांड, अरण्यकांड , सुंदरकांड, युद्धकांड आणि उत्तरकांड असे ७ कांड असून अनेक महत्त्वाच्या कथा यामध्ये आहेत . रावण वध , अधर्म नाश करून श्रीरामाने रामराज्य निर्माण केले . प्रजेला सुखी केले . उद्या अयोध्या कांड वाचन व विवेचन होईल.

संचालन अनिता कुळकर्णी यांनी केले . कार्यक्रमाला सर्व स्तरातील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते . रामनवमी पर्यंत दि. २६ मार्चपर्यंत रोज दुपारी ३.४५ वा आयोजीत या रामायणाचा लाभ घेण्याचे आवाहन जनकल्याण सेवा संस्था व डॉ . हेडगेवार हॉस्पीटलने केले आहे.

# वऱ्हा ते माळेगांव रस्त्याची दुरावस्था



**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** गेल्या अनेक वर्षापासून वऱ्हा ते माळेगांव सहा किमी रस्त्याची भयानक अवस्था झाली असून रस्त्यावर जागोजागी खडे पडले आहे. दुचाकी वाहन धारकांना कसरत करावी लागते. केव्हा खड्यात गाडी पडेल व अपघात होईल याचा काही नेम नाही.

तसेच या रस्त्याने बरीच वाहतूक असून शेतकऱ्यांना कधीही शेतामध्ये जावे लागते. अशा वेळेस येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांमुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.तेव्हा संबंधीत विभागाने तसेच लोक प्रतिनिधी यांनी लक्ष वेधून वऱ्हा ते माळेगांव या सहा किमी ची दुरावस्था त्वरीत दूर करावी अशी मागणी वऱ्हा व माळेगांव जनतेची आहे.

# वाहतूक नियंत्रकाला शिवीगाळ; जीवे मारण्याची धमकी

## बडनेरा बस डेपोतील प्रकार-आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** बडनेरा बस डेपोतील एका चालकाने वाहतूक नियंत्रकाला व्हॉट्सअॅप ग्रुपवर अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची गंभीर घटना समोर आली आहे. ही घटना १६ मार्च रोजी घडली. या प्रकरणी बडनेरा पोलिसांनी आरोपी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

तक्रारदार अविका नागराज काकडे (वय ३६, रा. फॉरेस्ट कॉलनी, साईनगर, अमरावती) या बडनेरा बस डेपोमध्ये वाहतूक नियंत्रक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे टीटूए रजिस्टर भरण्याची जबाबदारी आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी चंदन शंकरसिंग पवार (वय ४२, रा. नवी बस्ती, बडनेरा) याने बीडी झालेल्या वाहनांची रोजची नोंद न दिल्यामुळे त्याचे ओव्हरटाईम काढण्यात आले नव्हते. याच कारणावरून त्याने काकडे यांच्याशी वाद घातला. 'माझा ओव्हरटाईम काढून द्या' अशी मागणी करत त्याने आक्रमक भूमिका घेतली. दरम्यान, १६ मार्च रोजी बस स्थानकातील कर्मचाऱ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर काकडे यांचे नाव घेऊन आरोपीने अश्लील शिवीगाळ केली. तसेच त्यांना जीवे मारण्याची धमकी देत बदनामीकारक संदेशही पाठवले. या प्रकरणी अविका काकडे यांच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी चालक चंदन पवार याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# सणांच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावर 'लक्ष'

## -कठोर कारवाईचा पोलिसांचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शांतता व सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. विशेषतः सोशल मीडियावर होणाऱ्या आक्षेपार्ह पोस्टिंगकडे पोलिसांनी बारकाईने लक्ष केंद्रीत केले असून, नियमभंग करणाऱ्यांवर थेट कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

१७ मार्च ते १५ एप्रिल या कालावधीत शहरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या काळात कोणत्याही प्रकारे तणाव निर्माण होऊ नये यासाठी मिरवणुका, शोभायात्रा व इतर सार्वजनिक कार्यक्रमांदरम्यान भडक घोषणाबाजी, आक्षेपार्ह फलक, उत्तेजक गाणी किंवा वादग्रस्त देखावे यावर बंदी घालण्यात आली आहे.

तसेच, सोशल मीडियावर जातीय किंवा धार्मिक भावना दुखावतील असे पोस्ट, व्हिडिओ किंवा संदेश प्रसारित केल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात येणार आहे. अफवा पसरविणे किंवा चुकीची माहिती व्हायरल करणे यालाही पोलिसांनी गंभीरतेने घेतले आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या निर्देशानुसार जारी आदेशात नागरिकांना संयम पाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सणांचा आनंद साजरा करताना कायद्याचे भान ठेवावे आणि कोणत्याही प्रकारे सामाजिक सौहार्द बिघडणार नाही याची खबरदारी घ्यावी, असेही सांगण्यात आले आहे. एकूणच, सणकाळात शहरात शांतता राखण्यासाठी पोलिसांनी 'अलर्ट मोड' घेतला असून, प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सुनिल टिंगणे यांचे निधन



**अंजनगाव बारी/प्रतिनिधीः-** येथील सुनिल गोविंदराव टिंगणे ( रा.अर्जून नगर,अमरावती) यांचे वयाच्या ६६ व्या वर्षी दि. १६ रोजी सकाळी १० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्याच्या पश्चात आई, एक मुलगा, एक मुलगी, तीन बहिणी व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमी अमरावती येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. ते इरिगेशन डिपार्टमेंट मधून सीनियर ऑडिटर ह्या महत्त्वपूर्ण पदावरून सेवानिवृत्त कर्मचारी होते.


# पाहिजे

अमरावती, अचलपूर व वरूड येथे नामांकित लॉ फर्म मध्ये युवक व युवतींना पार्ट टाईम काम करण्याची संधी.
शिक्षण- १२ वी पास
पगार- १०,०००+टिए डिए + कमीशन (ट्रेनिंग झाल्यावर पगार वाढ व ईतर इन्क्रिमेंट्स)
**संपर्क -**
**९६०७५८२०९४**



जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/१७मोप्र-१ दि.१८.१०.२०२३

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
***कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालय,***
**पाटबंधारे वसाहत, शिवाजी नगर, अमरावती**
**दुरध्वनी** क्र.०७२१-२६६२२८२/८३
Email : eedduwpamt@gmail.com

**ई-निविदा सुचना क्र.१८/सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती** जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास Web-http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | **उर्ध्व वर्धा वसाहती मधील ईमारती व कार्यालयाचे दुरुस्तीचे काम**<br>१) AID कॉलनी मधील C-1, C-2 गाळ्याचे काम<br>२) D-8 गाळ्याचे Tiles बसविण्याचे, प्लास्टर दुरुस्तीचे व Plumbing इत्यादीचे दुरुस्तीचे काम D-3 गाळ्याचे प्लास्टर Plumbing व Slab च्या Waterproofing इत्यादीचे दुरुस्तीचे काम<br>३) Chamber Line व Chamber दुरुस्तीचे काम<br>४) विभागीय कार्यालयाचे नुतनीकरण, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती वरील Waterproofing व ईतर दुरुस्तीचे काम व दक्षता पथक अमरावती कार्यालयामध्ये हिरकणी कक्ष तयार करणे, क्युबिकल तयार करणे तसेच VC ची सुविधा पुरविणे इत्यादीचे काम<br>५) A1, A2 गाळ्याचे दुरुस्तीचे व प्रसाधन गृहाचे काम व जुने गुणनियंत्रण ईमारतीच्या दुरुस्तीचे काम | अमरावती | ४,०४,२४,५८९/- |
| ०२ | उर्ध्व वर्धा वसाहत अमरावती येथे मुख्य अभियंता (ज.सं.) अमरावती यांचे निवासस्थानाचे बांाकाम. | अमरावती | २,६६,८४,१८६/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक २०.०३.२०२६ ते दिनांक २७.०३.२०२६**
**ई-निविदा उघडण्याचा दिनांक - दिनांक ३०.०३.२०२६**
Seek Clarification **कालावधी दिनांक २०.०३.२०२६ पासून ते २३.०३.२०२६ पर्यत**

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता,**
**उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग,**
**अमरावती**

**(जा.क्र.६१३/उवपावि/नि.लि./जाहीरात/२०२६, दिनांक १२.०३.२०२६)**



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १९१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ

# विधी विद्यार्थ्यांसाठी विविध क्षेत्रांत संधी-ॲड.गजानन पुंडकर

**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांनी काळानुसार स्वतःमध्ये बदल करून नेहमी अपडेट राहिले पाहिजे. विधी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आज विविध क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध असून त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजानन पुंडकर यांनी केले.डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय येथे आयोजित पदवी वितरण समारंभात ते बोलत होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या सूचनेनुसार सत्र २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांसाठी हा पदवी वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर होते. प्रमुख अतिथी म्हणून उपाध्यक्ष केशवराव मेतकर तसेच दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कीर्ती अर्जुन उपस्थित होत्या. यावेळी विशेष अतिथी म्हणून









निमंत्रित लेडी गव्हर्नर कमलताई गवई यांचा महाविद्यालयातर्फे कृतज्ञता सत्कार करण्यात आला.आपल्या मनोगतात कमलताई गवई यांनी जीवनातील विविध अनुभव सांगत विद्यार्थ्यांना महामानवांच्या विचारांचा वारसा जपण्याचे आवाहन केले. तसेच शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी विपश्यना सारख्या साधनेचा अवलंब करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.समारंभात महाविद्यालयातील विविध गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना कै.अण्णासाहेब वानखडे स्मृती पुरस्कार,कै. प्राचार्य एन सी देशमुख स्मृती पुरस्कार,कै. मनोहर भास्कर उपाख्य बाबुरावजी पांगरकर स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.तीन वर्षीय एलएलबी अभ्यासक्रमातील गुणवंत विद्यार्थ्यांची नावे डॉ.एन. के. रामटेके यांनी जाहीर केली, तर पाच वर्षीय एलएलबी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची नावे डॉ.राजेश पाटील यांनी घोषित केली. एलएलएम अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची नावे प्रा.संदीप वानखडे यांनी जाहीर केली, तर पीएचडी प्राप्त विद्यार्थ्यांचा नावांची घोषणा डॉ .प्रणय मालवीय यांनी केली. कार्यक्रमात सर्व पदवीधर विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला.प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यांनी प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केले. उपाध्यक्ष केशवराव मेतकर यांनी मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन डॉ. पंजाबराव देशमुख यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली, यामागील दूरदृष्टी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांनी महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजघडणीसाठी कार्य करण्याचा संकल्प करावा, असेही त्यांनी सांगितले.कीर्ती अर्जुन यांनी आपल्या भाषणातून कायद्याचे समाजातील महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा, असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्राची कडू यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.सपना विधळे यांनी करून दिला. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### आज शेतकरी मार्गदर्शन व संवाद कार्यक्रमाचे आयोजन

**टाकरखेडा संभू-** भातकुली तालुक्यातील टाकरखेडा संभू येथे श्रीराम मंदिर संस्थेच्या व कृषी विभाग अमरावती यांच्या संयुक्त




विद्यमाने शेतकरी मार्गदर्शन व संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमात सोयाबीन, तूर व कापूस पिकांच्या आधुनिक लागवड तंत्रज्ञानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. बदलत्या हवामान परिस्थितीत उत्पादनवाढ व खर्च कमी करण्यासाठी शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती दिली जाणार आहे.कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी कृषी विभाग अमरावती डॉ. पंकज चेडे तसेच हर्षल ठाकूर प्रमुख उपस्थिती म्हणून लाभणार आहेत. मार्गदर्शनासाठी कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर येथील कृषी शास्त्रज्ञ गजानन देशमुख उपस्थित राहून शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत.या कार्यक्रमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, खत व कीड नियंत्रण याबाबत मार्गदर्शन मिळणार असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मंगळवारी रोजगार मेळावा

**अमरावती-** पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'मध्ये, २४ मार्च रोजी स्वामी विवेकानंद भवन, संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती येथे रोजगार मेळावा होत आहे. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटरतर्फे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

### विनायक महाविद्यालयात व्याख्यान

**नांदगाव खंडेश्वर-** येथील विनायक महाविद्यालयाच्या महिला कक्षातर्फे 'मानसिक आरोग्य – काळाची गरज' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे आयक्यू ए.सी समन्वयक डॉ. अनंत वडतकर होते. प्रमुख वक्त्या म्हणून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथील मानसशास्त्र विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. वनिता राऊत उपस्थित होत्या.प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रतिभा महल्ले, प्रमुख -प्राणीशास्त्र विभाग यांनी केले. आपल्या व्याख्यानात डॉ. वनिता राऊत यांनी आजच्या काळातील मानसिक आरोग्याच्या समस्या, आनंदी जीवनासाठी आवश्यक असलेले 'हॅपी हार्मोन्स' आणि तणावमुक्त जीवन कसे जगावे याविषयी मार्गदर्शन केले.अध्यक्षीय भाषणात डॉ. अनंत वडतकर यांनी मानसिक आरोग्याच्या समस्या तरुणांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन वैष्णवी नेमाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अतीबा नूर शेख यांनी केले.या कार्यक्रमाला महिला कक्षाच्या समन्वयक डॉ. प्रीती देशमुख,तसेच सदस्य नम्रता खत्री, डॉ. नमिता सोनटक्के, करुणा सोनोने आणि अश्विनी अंबाडकर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## एडीफाय शाळेत IK एडी जोश लिटिल स्टार' स्नेहसंमेलन

**अमरावती/का.प्र.**

एडीफाय शाळा अमरावती येथे IK एडी जोश लिटिल स्टार' वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात झाले. 'एकता आणि सांस्कृतिक अभिमान' या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमात पूर्व प्राथमिक शाळेच्या चिमुकल्यांनी विविध सांस्कृतिक आणि शैक्षणिक सादरीकरणांद्वारे आपली कला व कौशल्ये सादर केली.



कार्यक्रम शाळेचे निदेशक प्राचार्य डॉ. जेकब दास यांच्या मार्गदर्शनास पार पडला. पाहुणे अंकिता विश्वकर्मा लोकमत सखी मंच अमरावती जिल्हा संयोजिका, शाळेचे अध्यक्ष डॉ. पुरणलालजी हबलानी, नम्रता हबलानी, रवी इंगळ, यश हबलानी, विशाखा हबलानी यांच्या स्वागताने झाली. त्यानंतर दीपप्रज्वलन व पाहुण्यांचे पुष्पगुच्छाने स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध नृत्य व नाटिका सादर करून उपस्थित पालकांची मने जिंकली. फळांवरील नाटिका, पाणी वाचवा, मोबाईलचा अति वापर टाळा, पर्यावरण संवर्धन आणि ऋतूंचे महत्त्व अशा सामाजिक संदेश देणाऱ्या नाटिकांमधून विद्यार्थ्यांनी महत्त्वाचे संदेश दिले. पंजाबी, गोवा, महाराष्ट्रातील वारकरी नृत्य, राजस्थानी व दक्षिण भारतीय अशा विविध प्रांतांच्या नृत्यप्रकारांचे आकर्षक सादरीकरण झाले. नृत्य प्रशिक्षण,विद्यार्थ्यांकडून पूर्वतयारी करून घेण्याकरिता पूर्व प्राथमिक विभागाच्या समन्वयक पुर्वा गरुड,स्नेहल इंगोले, वृषाली शिंदे, शिल्पा हिरुळकर,सुप्रिया गावंडे, भाग्यश्री लोखंडे,शरयू पाजनकर यांचे मोलाचे सहकार्य लागले.संस्थेचे अध्यक्ष डॉ.पुरणलालजी हबलानी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर भाषण केले.

कार्यक्रमाची रूपरेखा शाळेचे माध्यमिक विभाग ईशान कापडिया,प्राथमिक विभाग अंकिता कापडिया,सांस्कृतिक विभागाचे भारत मोंढे ,वित्त विभाग अतुल अंभोरे यांनी विशेष सहकार्य केले.संचालन मनीषा गवई ,प्रज्ञा जोशी यांनी केले. तसेच शाळेतील प्राथमिक आणि माध्यमिक विभागाचे शिक्षक वर्ग,शिक्षकेतर कर्मचारी, संगीत विभागाचे निरज गावंडे,पल्लवी शिरभाते कला विभागाच्या निधी कडू यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या कार्यक्रमाला पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

## उड्डाण २०२६ स्नेहमिलन सोहळा उत्साहात

**अमरावती/क्रा.प्र.**

उड्डाण इंजिनिअर्स मल्टीपर्पज सोसायटी तर्फे आयोजित 'उड्डाण २०२६' स्नेहमिलन सोहळा रंगोली लॉन, कठोरा नाका येथे अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला. अभियंत्यांनी स्थापन केलेली ही संस्था शैक्षणिक मदत, रोजगाराच्या संधी, उद्योजकता विकास आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नितीन देशमुख होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे उपस्थित होते. प्रास्ताविकात संस्थेचे अध्यक्ष इंजी. निलेश चौधरी यांनी संस्थेच्या स्थापनेपासून ते आतापर्यंतच्या वाटचालीचा आढावा घेतला. काकडे यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या अभिनव आणि समाजोपयोगी कार्याचे कौतुक करून भविष्यातही असेच कार्य सुरू ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमादरम्यान संस्थेची अधिकृत वेबसाइट तयार करण्यात आली असून ती इंजी. पियुष हांडे यांनी विकसित केली आहे. तसेच पराक्रमी महादजी शिंदे यांच्या जीवनावर आधारित एक प्रभावी आणि ऐतिहासिक नाट्यकृती सादर करण्यात आली, याशिवाय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला बळकटी देण्यात आली. विविध नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंट मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. या सोहळ्याला इंजी. गौरव मोहोड, इंजी. निलेश चौधरी, इंजी. अक्षय महल्ले, इंजी. मोहिनी धोंडे, इंजी. अश्विन पवार, इंजी. तुषार देशमुख, इंजी. शिवराज काळणे, इंजी. तुषार थोटे, इंजी. अभिजीत देशमुख, इंजी. राजू ठेंग, इंजी. मनोज साबळे, इंजी. मोहिनी देशमुख, इंजी. वैदेही वरघट यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची शोभा वाढली असून, संस्थेच्या कार्याला अधिक बळकटी मिळाल्याची भावना उपस्थितांमध्ये व्यक्त करण्यात आली.

या स्नेहमिलन सोहळ्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वगुणांवर आधारित प्रेरणादायी चर्चा घडून आली, ज्यातून तरुणांना मार्गदर्शन मिळाले. आजच्या तरुणांनी केवळ करिअरपुरते मर्यादित न राहता समाजासाठीही योगदान देण्याची भावना जोपासावी, असे आवाहन मान्यवरांनी केले.

## आयआयएमसीत नव माध्यम तंत्रज्ञानावर कार्यशाळा

### डॉ.पवन कौंडल यांचे मार्गदर्शन

**अमरावती/क्रा.प्र.**

आयआयएमसीत नव माध्यम तंत्रज्ञानावर आधारित तीन दिवसीय विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात विद्यार्थांनी कृत्रिम बुद्धीमत्ता, डिजीटल पत्रकारिता, चॅट जीपीटी, नोटबुकएलएम, जेमिनी यांसारख्या आधुनिक एआय साधनांचा पत्रकारितेतील उपयोग समजून घेत प्रात्याक्षिकातून ज्ञान व कौशल्य आत्मसात केले.




भारतीय जन संचार संस्थानात (आयआयएमसी) 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि डिजीटल पत्रकारिता' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात आयआयएमसी दिल्लीचे डॉ. पवन कौंडल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, डॉ. विनोद निताळे, डॉ. आदित्य मिश्रा, डॉ.प्रमोद गायकवाड, जयंत सोनोने, रोहन तायडे उपस्थित होते.डॉ. कौंडल म्हणाले की, एआय मुळे पत्रकारितेची गती, अचूकता आणि पोहोच मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, या तंत्रज्ञानाचा वापर करताना नैतिकता, वस्तुनिष्ठता आणि मानवी मूल्ये जपणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तंत्रज्ञानावर अवलंबून न राहता स्वतःची विश्लेषणात्मक क्षमता आणि सर्जनशीलता विकसित करण्याचे आवाहन यावेळी केले.याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा म्हणाले, पत्रकारिता धर्म जपण्यासाठी विश्वासार्हता महत्वाची आहे. आधुनिक काळात विद्यार्थ्यांनी पत्रकारितेत नव तंत्रज्ञानाचा उपयोग करत विश्वासार्हता जपावी.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. रोहन तायडे यांनी केले.संचालन नंदिनी कौरव आणि आयुष्य हिने केले तर आभार काजल घुटे हिने मानले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, नुरूजुमा शेख, भूषण मोहोकार, राजेश कुमार, अनंत नांदुरकर, मंदा पवार, नंदा तुप्पट आदींचे सहकार्य लाभले. कार्यशाळेत मराठी, हिंदी आणि इंग्रजी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## करंट लागून गाईचा मृत्यू

### विद्युत वितरण कंपनीवर शेतकऱ्याचा आरोप

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील कवठा कडू या ग्रामीण भागात करंट लागून एका गाईचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी निलेश लोमटे यांच्या मालकीची गाय शेत परिसरात असताना विद्युत तारेच्या संपर्कात आल्याने तिला करंट लागला. या घटनेत गाईचा जागीच मृत्यू झाला. या प्रकारामुळे लोमटे यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.या संदर्भात निलेश लोमटे यांनी विद्युत वितरण कंपनीवर गंभीर आरोप करत भोंगळ कारभारामुळे ही घटना घडल्याचे सांगितले. 'विद्युत ऊर्जा तारेच्या



निष्काळजीपणामुळे माझ्या गाईचा मृत्यू झाला,' असा आरोप त्यांनी केला आहे.दरम्यान, या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी विद्युत वितरण व्यवस्थेच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केले असून संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, तसेच नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

## पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसीत श्रमसंस्कार शिबिर

**अमरावती/क्रा.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) पथकाद्वारे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिर कामूजा येथे पार पडले. राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेली चळवळ असून, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची भावना जागृत करण्याचे कार्य करते. 'Not Me But You' या ब्रीदवाक्यानुसार NSS विद्यार्थ्यांना समाजासाठी कार्य करण्याची संधी उपलब्ध करून देते. या सात दिवसीय शिबिरादरम्यान विविध उपक्रम राबविण्यात आले.



शिबिराच्या पहिल्या दिवशी ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य तपासणी व औषध वितरण शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच गावातील परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या वेळी प्राचार्य डॉ. डी. बी. रुईकर,प्रशांत बुरंगे, डॉ. प्रसाद आर. देशमुख, डॉ. भूषण भोयर यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले व त्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमासाठी डॉ. एन. चौधरी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. चौथ्या दिवशी प्रथमोपचार व सीपीआर (CPR) विषयी माहिती देणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यासाठी डॉ. एस. गुल्हाणे व मिलिंद तायडे हे अतिथी म्हणून उपस्थित होते. पाचव्या दिवशी 'प्रशासकीय व स्पर्धा परीक्षा' या विषयावर श्रीधर मेंढे यांनी मार्गदर्शन केले.

तसेच 'तरुण आणि व्यसनमुक्ती' या विषयावर व्याख्यान व व्यसनमुक्ती जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली. महिला संरक्षण विषयक कार्यशाळा व लाठी-काठी प्रशिक्षणाचे प्रात्यक्षिक कौस्तुभ डकरे (शारीरिक प्रशिक्षक, P.R.P.P.I.S.) यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. तसेच PCOD व कर्करोग जनजागृती विषयावर डॉ. शरयू गायकवाड (स्त्रीरोग तज्ज्ञ) यांनी व्याख्यान दिले. याच दिवशी प्रतिकूल औषध प्रतिक्रिया (ADR) जनजागृती रॅलीही काढण्यात आली.सातव्या दिवशी ग्रामस्थ व ग्रामसेवक यांच्या उपस्थितीत समारोप कार्यक्रम पार पडला. संपूर्ण शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ. दिप्ती बी. रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. अमित आर. जयस्वाल व प्रा. प्रगती आर. कातखेडे यांनी केले. या शिबिरात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

## दासटेकडीवर रामनामाचा अखंड निनाद

**तिवसा/वार्ताहर**

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेतून कार्यरत अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ, श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम मोझरी यांच्या वतीने यंदाचा 'श्रीरामकृष्णहरी मानवता मंदिर येथे 'गुढीपाडवा व रामनवमी महोत्सव' अत्यंत भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा होणार आहे. १९ते २६ मार्च या कालावधीत चालणाऱ्या या महोत्सवात अध्यात्म, संस्कार आणि सामूहिकतेचा सुंदर संगम अनुभवायला मिळणार आहे.

या महोत्सवाची सुरुवात आज १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या पवित्र दिवशी होणार असून या दिवशी तीर्थ स्थापना,अभिषेक, महापूजा आणि सामुदायिक ध्यान यांसारख्या धार्मिक विधींनी वातावरण पवित्र होईल. महोत्सवाचा मुख्य दिवस असलेल्या रामनवमीला रामकृष्णहरी अभिषेक, भव्य महापूजा, सामुदायिक ध्यान व चिंतन, गोपाळकाला, हरिपाठ व कीर्तन यांचे आयोजन करण्यात आले आहे. यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसाद व सामुदायिक प्रार्थना होणार असून हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा रंगणार आहे. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून त्यामध्ये डॉ. नंदकिशोर काळे, डॉ. डी.एस. निघोटं, उद्धवराव वानखडे, डॉ. पी.पी. पाडेकर, डॉ. खारोडे, डॉ. रघुनाथ वाडेकर, संजय देशमुख, आशिष कावडे, कैलास गिरी, पंकज देशमुख, तसेच सद्गुण ठोसर, जनसेवक जयस्वाल, जीवन डाके, अविनाश ठाकरे, बापूराव काळमेघ, सुभाषे सोनारे, बबलू मकरंदपुरे, विठ्ठल उमप यांच्यासह राजेंद्र भुरे, धनराज बारबुदे, हेमंत निखाडे आदींचा समावेश आहे. सर्व नागरिकांनी या सोहळ्यात सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे.

GHARKUL Masale
पाहिजेत
ब्रँडेड अगरबत्ती घरोघरी विक्रीकरिता महिला व पुरुष पाहिजे.
: संपर्क :
घरकुल मसाले फॅक्टरी,
एमआयडीसी. अमरावती

# चक्क रस्त्यावरच लिहिले महसूल अधिकाऱ्यांचे कारनामे

## तहसिलदार, एसडीओ वाळू माफिया असल्याचा उल्लेख



**खल्लार/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील वाळू तस्करीने आता सर्व मर्यादा ओलांडल्या असून संतापलेल्या नागरिकांनी थेट रस्त्यावरच महसूल प्रशासनाची लक्तरे वेशीवर टांगली आहेत.

अमरावती दर्यापूर भातकुली मार्गावर अज्ञात व्यक्तींनी चक्क डांबरी रस्त्यावर पांढऱ्या रंगाने मोठे अक्षरे खरडून, वाळू तस्करीमध्ये 'एसडीओ' आणि 'तहसिलदार' हेच खरे कंत्राटदार असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. या प्रकारामुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. नेहमीप्रमाणे वर्दळ असलेल्या या मार्गावर सकाळी प्रवाशांना रस्त्यावर लिहीलेला एक धक्कादायक मजकूर दिसला. यात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, वाळू माफिया एसडीओ व तहसिलदार ठेकेदार आहे. इतकेच नव्हे तर टाकळी, इचोरा आणि भुजबळा या भागात सध्या मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उत्खनन अवैध सुरू असल्याचेही यात जाहीरपणे सांगण्यात आले आहे. महसूल विभागाच्या सर्वोच्च पदस्थ अधिकाऱ्यांवरच थेट भ्रष्टाचाराचे आणि माफियांसोबत हातमिळवणी केल्याचे आरोप झाल्याने मोठी खळबळ उडाली आहे.

टाकळी, इचोरा आणि भुजवाळा परिसरातून दररोज शेकडो ब्रास वाळूची अवैध वाहतूक होत असतानाही स्थानिक प्रशासन आणि पोलिस विभाग गप्प का? असा संतप्त सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे. वारंवार तक्रारी करूनही कारवाई होत नसल्यानेच, त्रस्त झालेल्या नागरिकांनी किंवा वाळू माफियांच्या अंतर्गत वादातून हा प्रकार समोर आल्याची चर्चा आता दबक्या आवाजात सुरू आहे.

### आता तरी कारवाई होणार का?

भररस्त्यात अशा प्रकारे अधिकाऱ्यांची नावे लिहून जाहीर निषेध व्यक्त केल्याने महसूल विभागाची मोठी नाचक्की झाली आहे. या गंभीर आरोपांनंतर आता जिल्हाधिकारी काय पावले उचलतात, संबधित भागातील अवैध उत्खनन थांबणार का? आणि ज्या अधिकाऱ्यांवर हे आरोप झाले आहेत त्यांची चौकशी होणार का? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान या प्रकारामुळे महसूल विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

# गारपीटसह पावसाचा वनोजा बाग परिसराला तडाखा
## कांदा-गहू पिकांचे मोठे नुकसान, यात्रेतही गोंधळ





**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** तालुक्यातील वनोजा बाग परिसरात गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला अचानक झालेल्या गारपीटसह पावसाच्या सरींनी शेतकरी व भाविक दोघांनाही मोठा फटका बसला आहे. सध्या उन्हाचा चटका वाढलेला असतानाच मागील तीन दिवसांपासून हवामानात मोठी उलथापालथ होत असल्याचे चित्र दिसत होते. मात्र, बुधवारी सायंकाळच्या सुमारास आलेल्या या अवकाळी पावसाने परिस्थिती अधिकच बिकट केली.

अचानक कोसळलेल्या गारपिटीमुळे कांदा आणि गहू पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांच्या शेतात काढणीला आलेला गहू आडवा पडला असून कांद्याच्या पिकावर गारांचा मार बसल्याने गुणवत्ता घसरली आहे. परिणामी उत्पादनात घट येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. 'हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावून नेला,' अशी हळहळ शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

वनोजा बाग परिसर हा प्रामुख्याने कांदा आणि गहू उत्पादनासाठी ओळखला जातो. यंदा सुरुवातीपासूनच हवामान अनिश्चित राहिल्याने शेतकरी आधीच चिंतेत होते. त्यातच या अवकाळी पावसाने त्यांच्या अडचणीत भर टाकली आहे. अनेक ठिकाणी शेतात पाणी साचल्याने ☞(पान २ वर)


# पंचवटी चौकात शेतकऱ्यांचे अन्नत्याग आंदोलन
## शासनाच्या अपयशाची प्रतिकात्मक गुढी उभारून निषेध



**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाच्या अपयशाची प्रतिकात्मक गुढी उभारून सकल शेतकरी समाजाने आज गुरुवार १९ मार्च रोजी पंचवटी चौकात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळया जवळ सामूहिक निषेध व्यक्त केले. एक दिवसीय अन्नत्याग आंदोलन शेतकऱ्यांनी केले. १९ मार्च १९८६ रोजी नापिकी कर्जबाजारी आणि शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे साहेबराव करपे यांनी पत्नी व मुला बाळासह पवणार आश्रम मध्ये सामूहिक आत्महत्या केली होती. या दुर्दैवी घटनेने संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी समाज हळहळला होता. तेव्हा पासून १९ मार्च रोजी शेतकऱ्यांच्या वतीने काळा दिवस साजरा केला जाते.प्रत्येक जिल्ह्यात, गावांगावात करपे परिवारास श्रद्धांजली अर्पण करून संवेदना व्यक्त केली जाते. गुरुवारी पंचवटी चौकात शेतकऱ्यांनी अन्नत्याग आंदोलन करून अपयशी शासनाचा सामूहिक निषेध व्यक्त ☞(पान २ वर)

# अकोट तालुक्यात अवकाळी पावसासह गारपीट
## रब्बी पिकांना फटका, शेतकऱ्यांची चिंता वाढली





**अकोट/प्रतिनिधीः-** तालुक्यात गुरुवारी सायंकाळी अचानक झालेल्या अवकाळी पावसाने आणि गारपीटीने ग्रामीण भागाला झोडपून काढले. सुमारे तासभर सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, काढणीस आलेल्या रब्बी पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

तालुक्यातील सावरा, पणज, देऊळगाव, रंभापूर, कालवाडी या परिसरात पावसासह गारपीट झाली. विशेषतः दर्यापूर व अंजनगाव मार्गावरील शेतांमध्ये गारांचा खच साचलेला दिसून आला. काही ठिकाणी गारांचा थर पांढऱ्या चादरीसारखा पसरल्याचे चित्र होते. या अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे कांदा, गहू, हरभरा तसेच संत्रा पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक शेतांमध्ये काढणीस आलेले पीक जमिनीवर आडवे पडल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः संत्रा बागांमधील फळगळ वाढल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

शहरीं भागात पावसाचा प्रभाव कमी असला तरी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर गारपीट झाली. दर्यापूर व अंजनगाव मार्गावरील गावांमध्ये गारांचा ☞(पान २ वर)

# टरपेंटाईन ओतून व्यक्तीने स्वतःला पेटवले
## कुंभारवाड्यातील व्यक्तीचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंभारवाडा परिसरात ९ मार्च रोजी अभिजीत नारायणराव काळे (वय ४९) यांनी धक्कादायक पाऊल उचलले. दारूच्या नशेत असतानाच त्यांनी स्वतःवर टरपेंटाईन ओतून स्वतःला पेटवले. या घटनेत ते गंभीर जखमी झाले आणि ९ दिवस मृत्यूशी झुंज देताना अखेर १८ मार्च रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. मिळालेल्या माहितीनुसार, ९ मार्च रोजी संध्याकाळच्या सुमारास ही घटना घडली. घरचे सदस्य आणि परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत आग आटोक्यात आणली आणि काळे यांना जिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रकृती गंभीर असल्याने अपेक्षित उपचार प्रतिसाद मिळाला नाही. नंतर १६ मार्च रोजी त्यांना पीडीएमसी रुग्णालयात हलवण्यात आले, जिथे डॉक्टरांकडून अतिदक्ष उपचार सुरू होते. परंतु १८ मार्च रोजी त्यांचा मृत्यू झाला. खोलापुरीगेट पोलीसांनी या प्रकरणाची नोंद अपघाती मृत्यूच्या स्वरूपात केली असून, पुढील तपास सुरू आहे.

# केडिया नगरात दहशत माजवणारा तरुण जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील केडिया नगर चौक परिसरात पहाटेच्या सुमारास हातात धारदार शस्त्र घेऊन नागरिकांमध्ये भीती निर्माण करणाऱ्या तरुणाला राजापेठ पोलिसांनी ताब्यात घेतले. प्रेम श्रीकृष्ण कुंजाम (वय २१, रा. गडगडेश्वर मंदिराजवळ, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या या जलद कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे सुमारे १.३० वाजता पोलीस☞(पान २ वर)

# विद्युत तारेच्या संपर्कात आल्याने गाईचा मृत्यू



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** तालुक्यातील कवठा कडू येथे करंट लागून एका गाईचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून शेतकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शेतकरी निलेश लोमटे यांच्या मालकीची गाय शेत परिसरात असताना विद्युत तारेच्या संपर्कात आल्याने तिला करंट लागला. या घटनेत गाईचा जागीच मृत्यू झाला. या प्रकारामुळे लोमटे यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

या संदर्भात निलेश लोमटे यांनी विद्युत वितरण कंपनीवर गंभीर आरोप करत भोंगळ कारभारामुळे ही घटना घडल्याचे सांगितले. विद्युत तारेच्या निष्काळजीपणामुळे माझ्या गाईचा ☞(पान २ वर)

# सी.सी.आय.च्या कापुस खरेदीस मुदतवाढ द्या
## बाजार समितीच्या सभापती कविता गावंडे यांची मागणी



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** सी.सी.आय.ची कापूस खरेदी १३ मार्च २०२६ ला बंद करण्यात आली. त्यामुळे सध्या ही खरेदी प्रक्रिया सुरू नाही. मुदतवाढीत प्रत्यक्ष खरेदीचे दिवस कमी मिळाल्याने आणि अनेक शेतकऱ्यांचा कापूस विक्रीविना शिल्लक असल्याने,शेतकरी हवालदिल झाला असून आर्थिक संकटात सापडला आहे.त्यामुळे सी.सी.आय.च्या कापुस खरेदीस मुदतवाढ देण्यात यावी,अशी मागणी जिल्हाधिकारी अमरावती व सी.सी.सी.आय.विभागीय कार्यालय अकोला यांच्याकडे निवेदनाद्वारे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती कविता श्रीकांत गावंडे यांनी केली आहे.

सी.सी.आय. अंतर्गत होणारी शासकिय कापूस खरेदी १३ मार्च पासून बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाकडे अजुनही कापुस शिल्लक आहे. त्यामुळे आधिच अडचणीत असलेला शेतकरी अजुन अडचणीत सापडलेला आहे.खुल्या बाजारात कापसाचे भाव अत्यंत कमी आहे.क्विंटल मागे जवळपास एक ते दीड हजार कमी दराने कापूस विकावा लागत आहे.तसेच कापूस उत्पादक शेतकरी सी.सी.आय. अंतर्गत होणारी शासकिय कापूस खरेदी केव्हा सुरू होणार? अशी विचारणा बाजार समितीकडे करीत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे हित जोपासण्यासाठी सी.सी.आय.अंतर्गत कापुस खरेदी तात्काळ सुरू करावी,अशी मागणी धामणगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती कविता श्रीकांत गावंडे यांनी केली आहे.

# शेतीसाहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश
## -२ आरोपी अटकेत, ११ गुन्हे उघड




**तिवसा/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांच्या शेतातील केबल, मोटरपंप व स्प्रिंकलर चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश अमरावती ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने केला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत तब्बल ११ चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. ☞(पान २ वर)

# घरफोडीत २ लाख ५ हजारांचा ऐवज लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घारफळ गावात बुधवारी सकाळी धक्कादायक घरफोडीची घटना उघडकीस आली. अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून लोखंडी पेटीसह सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा एकूण २ लाख ५ हजारांचा ऐवज चोरून नेला. घारफळ येथील ६९ वर्षीय रंजना महादेव निंघोट घराबाहेर गेल्या असताना ही चोरी घडली. बुधवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास घरात आल्यावर वरच्या खोलीत ठेवलेली लोखंडी पेटी गायब असल्याचे लक्षात आले. सदर पेटीत सुमारे ६ ग्रॅम, दोन डोरले मनीपोत अंदाजे १० ग्रॅम, सोन्याची अंगठी ३ ग्रॅम अशा एकूण १९ ग्रॅम सोन्याचे दागिने (अंदाजे १ लाख ९० हजार रुपये), १५ हजार रुपये रोख रक्कम तसेच महत्त्वाची कागदपत्रे ठेवलेली होती. घराबाहेरील व परिसरातील शोध घेण्यानंतर गावातील एका खंडार घरात लोखंडी पेटी आढळून आली, मात्र पेटीतील दागिने, रोख रक्कम व कागदपत्रे गायब होती. लोणी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास चालू आहे.

# शेगावमध्ये मातृ संस्कार समागम २८-२९ मार्च ला
## -विश्व मांगल्य सभेचे आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** विश्व मांगल्य सभेच्या वतीने मातृसंस्कार समागम चे आयोजन येणाऱ्या २८ व २९ मार्च रोजी शेगांव येथील संत गजानन महाराज इंजीनियरिंग कॉलेज सभागृह येथे करण्यात आले असल्याची माहिती आज गुरुवार १९ मार्च रोजी आयोजित पत्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली. २८ मार्च सकाळी ९ वाजता विसावा फक्त निवास संकुल शेगाव येथे एकत्रीकरण होणार आहे. यानंतर कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. हे अधिवेशन संस्कार सामर्थ्य सदाचार आणि सेवा या मूल्यांवर आधारित असून मातृसंस्कार समागम परंपरा प्रगती परिपक्वतेचे संगम राहणार आहे. समाजात मातृशक्तीची सशक्त भूमिका स्थापित करण्याचे प्रयत्न याद्वारे केले जाणार आहे. अधिवेशन मध्ये विशेषज्ञ आणि प्रभावी वक्तांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळणार आहे. भारतीय जीवनशैली वर आधारित सांस्कृतिक प्रदर्शनी , सप्त मातुका सन्मान सोहळा, महिलांची सांस्कृतिक नगर परिक्रमा सह इतर कार्यक्रम घेतले जाणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेमध्ये☞(पान २ वर)

# धमकी देऊन जाळली पानटपरी



**अमरावती/प्रतिनिधीः-** सर्वत्र रोजगाराची भीषण समस्या भेडसावत आहे. रोजगार न मिळाल्याने अनेक सुशिक्षित युवक स्वतःचा छोटा धंदा थाटून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात परंतु काही लोकांना हे पाहवल्या जात नाही. खोलापूरी गेट पोलीस स्टेशन अंतर्गत म्हाडा कॉलनी परिसरात अरविंद गांजरे यांना धमकी देऊन त्यांची पानटपरी जाळली आणि बळजबरीने त्यांचा रोजगार हिसकावून घेतला.

या संदर्भात गांजरे यांनी पोलिसांमध्ये तक्रार दिली आहे. तक्रारी अनुसार म्हाडा कॉलनी निवासी ऋषिकेश बोंडे काही दिवसापासून त्यांना तुझा पानठेला जाळतो अशी धमकी देत होता .यासंदर्भात गांजरे यांनी त्याच्या धमकीला भीक घातली नाही. गुरुवारी सकाळी जेव्हा ते आपला पानठेला उघडण्यास गेले तर पूर्ण पानठेला जळून खाक झाला होता . पानठेला मधील पान मटेरियल, सिगरेट आणि साहित्य जळले होते. खोलापुरी गेट पोलिसांनी आरोपीवर प्रतिबंधक कारवाई केली आहे. वास्तविक पाहता एखाद्याचा पानठेला जाळणे म्हणजे क्रूर कृत्य असूनही पोलिसांनी गंभीरतेने दखल घेतली नाही. या घटनेने म्हाडा कॉलनी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# तिवसा हद्दीतील वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश लावा
## -भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे पोलिस प्रशासनाला निवेदन



**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा शहरात गेल्या काही दिवसांपासून लहान-मोठ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. छोट्या उद्योगांच्या दुकानांत चोरी करणे, बसस्थानक परिसरात प्रवाशांचे खिसे कापणे, तसेच महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावण्याच्या घटना वाढत आहेत.याशिवाय, तालुक्यातील शेतशिवारातही चोरीचे प्रकार वाढले असून स्प्रिंकलर नोझल, विद्युत सिंचन पंप, मोटारी, विजेचे केबल तसेच पिकांचे वन्यजीवांपासून संरक्षण करण्यासाठी लावण्यात आलेल्या झटका मशीनची चोरी होत आहे. या घटनांमुळे शेतकरी व नागरिक मोठ्या ☞(पान २ वर)

# मोर्शीत गजानन महाराजांच्या मंदिरातील चोरी
## -अट्टल चोरट्याला पोलिसांनी केली अटक

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी शहरात पोलिसांनी तत्पर कारवाई करत एका अट्टल चोरट्याला अटक केली असून, त्याच्याकडून गजानन महाराजांच्या मूर्तीवरील चांदीची छत्री आणि कळस असा एकूण २ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई बुधवारी (दि.१८) रात्री उशिरा पार पडली. अटक करण्यात आलेला आरोपी गोपाल मोहन युवनाते (वय ४२, रा. पांढरघाटी, ता. वरूड, जि. अमरावती) आहे.

पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाला संशयास्पद इसमांवर लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार पथक शहरात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहितीच्या ☞(पान २ वर)

# शिरखेड येथे वंचितची मोर्चा संदर्भात आढावा बैठक



**काटपूर/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील ग्राम शिरखेड येथे वंचित बहुजन आघाडी मोर्शीची बैठक घेण्यात आली . येत्या २३ मार्च सोमवार ला नागपूर येथील आर.एस.एस. च्या मुख्यालयावर ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात काढण्यात येणाऱ्या भव्य मोर्चा मध्ये मोर्शी तालुक्यातील शेकडो कार्यकर्त्यांसह विविध स्तरातील जनतेचा समावेश करून घेण्यासाठी गावा - गावात जाऊन प्रचार व प्रसार करण्यासाठी आढावा बैठक घेऊन कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आले .

या बैठकिला वंचित बहुजन युवा आघाडी चे महासचिव सागर भवते, भारतीय बौद्ध महासभा मोर्शी चे संघटक प्रकाश इंगळे, वंचित बहुजन आघाडी मोर्शी तालुका अध्यक्ष अमोल सरवटकर , महासचिव ऊमेश इंगळे,☞(पान २ वर)